

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

## मा. यशवंतराव चव्हाण यांना २५ व्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.



२५ नोव्हेंबर २००९

# वार्तापत्र






सन २००८ चा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त आपले विचार मांडताना मा. माधवन नायर, सोबत व्यासपीठावर मा. रवींद्र बापट, मा. अरुण गुजराथी, मा. रघुनाथ माशेलकर, मा. शरद काळे, मा. अजित निंबाळकर इ.



सन २००८ चा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार इस्रो या संस्थेस प्रदान करताना मा. रघुनाथ माशेलकर सोबत व्यासपीठावर मा. माधवन नायर, मा. रवींद्र बापट, मा. अरुण गुजराथी, मा. शरद काळे व मा. अजित निंबाळकर इ.

खासदार सुप्रिया मुळे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्राचे युवा धोरण तयार करावे यासाठी यशवंतराव चव्हाण केंद्राच्या नव महाराष्ट्र युवा अभियान व विविध सामाजिक युवा संघटनांचे एक शिष्टमंडळमुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना विधानभवनात भेटले. महाराष्ट्राचे राज्य संघटक निलेश राउत विभागीय संघटक विश्वास ठाकूर व दिनेश शिंदे, अमित सावंत व इतर उपस्थित मान्यवर





अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजिका मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते नागपूर येथे अपंग लाभार्थ्यांना तीन चाकी सायकलीचे वाटप करण्यात आले. सोबत विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. गिरीश गांधी, मा. दत्ता बाळसराफ इत्यादी.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच./बी.ओ.एम.-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.



## * विश्वस्त मंडळ सदस्य *

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. हुसेन दलवाई | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. अरूण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श.गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. डॉ. रवींद्र बापट | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. मोहन धारिया | |
| ७. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ८. | मा. प्रा. पी. बी. पाटील | |
| ९. | मा. श्री. राम प्रधान | |
| १०. | मा. श्री. लक्ष्मण माने | |
| ११. | मा. श्री. गुलाम गौस | |
| १२. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १३. | मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे | |
| १४. | मा. सौ. सुप्रिया सुळे | |
| १५. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १६. | मा. श्री. अजित निंबाळकर | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१७. मा. श्री. नितीन करीर
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव

१८. मा. श्री. एस. बी. धात्रक
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

## * कार्यकारिणी मंडळ सदस्य *

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरूण गुजराथी
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. बापूसाहेब काळदाते
१०. मा. श्री. रा. सु. गवई
११. मा. श्री. एन. के. पी. साळवे
१२. मा. श्री. के. बी. आवाडे
१३. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१४. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१५. मा. सौ. सुप्रिया सुळे
१६. मा. डॉ. वसंतराव पवार
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., शिरोळ
१९. मा. श्री. शामराव पा. पाटील
मा. अध्यक्ष, सह्याद्री सहकारी
साखर कारखाना लि., कराड (पदसिद्ध)
२०. मा. श्री. यशवंतराव गडाख
२१. मा. श्री. माणिकराव पाटील
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

## * कार्यकारी समिती *

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरूण गुजराथी
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. श्रीनिवास पाटील
७. मा. सौ. सुप्रिया सुळे

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. राम प्रधान |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | डॉ. राम ताकवले |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | डॉ. जर्नादन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | डॉ. रा. सु. गवई |
| मुख्य कार्यालय | आर्थिक सल्लागार | श्री. ल. रा. खुपराव |
| सृजन | संकल्पना व संयोजिका | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. कुमुद बन्सल |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| अपंग हक्क विकास मंच | समन्वयक | श्री. विजय कान्हेकर |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. बी. डी. पवार |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| वार्तापत्र | मानद् संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथपाल | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर - श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य विपणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परिक्षक | | मे.सी.व्ही.के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मे. वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउन्टंट |

Website : www.ybchavanpratishthan.org E-mail: ybchavan@bom3.vsnl.net.in

# विचारधन



''वैयक्तिक जीवनामध्यें जशी आपण प्रगति करतो तशीच ती सार्वजनिक जीवनांतहि करावयाची असते. राज्यकारभारामध्ये सुधारणा व प्रगति करण्याचे ठरवून तुम्ही आणि मी जरी काम करणार असलो, तरी आत्मसंशोधनाची, आत्मटीकेची आपल्याला फार जरूरी आहे. राज्यकारभार चांगला करावयाचा असेल तर तो चांगला करण्याची सतत काळजी घेतली पाहिजे. एक क्षणभर जरी आपल्या मनांत अशी कल्पना आली की 'नाही, आता बरे चालले आहे', आणि ह्या विचाराने आपण बेसावध राहिलो, निष्क्रिय राहिलो, तर पुढच्याच क्षणापासून वाईट होण्याची प्रक्रिया सुरू होईल, ती सुरू होण्याची भीति उत्पन्न होईल. म्हणून आपल्याला सतत जागरूक राहण्याची फार आवश्यकता आहे.''

स्व. यशवंतराव चव्हाण

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रं. |
|---|---|
| संपादकीय | ५ |
| स्व. यशवंतराव चव्हाण - लेख | ६ |
| सन्मानपत्र | १२ |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान - कार्यवृत्त | १४ |
| अपंग हक्क विकास मंच - कार्यवृत्त | २० |
| शिक्षण विकास मंच - कार्यवृत्त | २१ |
| यशस्विनी अभियान - कार्यवृत्त | २४ |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम - कार्यवृत्त | २७ |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ - कार्यवृत्त | ३० |
| सृजन - कार्यवृत्त | ३२ |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय - कार्यवृत्त | ३३ |
| विभागीय केंद्र रत्नागिरी - कार्यवृत्त | ३४ |
| विभागीय केंद्र नागपूर - कार्यवृत्त | ३६ |
| विभागीय केंद्र औरंगाबाद - कार्यवृत्त | ४१ |
| कृषी सहकार व्यासपीठ व विभागीय केंद्र पूणे - कार्यवृत्त | ४४ |
| विभागीय केंद्र कराड - कार्यवृत्त | ४९ |
| विभागीय केंद्र नाशिक - कार्यवृत्त | ५३ |
| विभागीय केंद्र लातूर - कार्यवृत्त | ५७ |
| माहिती व तंत्रज्ञान प्रबोधनी - कार्यवृत्त | ६१ |
| विशेष उपक्रम | ६३ |
| प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने | ६४ |



वर्ष : तेरावे

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे वार्तापत्र**

खाजगी विनामूल्य वितरणासाठी

- प्रकाशन
  २५ नोव्हेंबर २००९
  मा. यशवंतराव चव्हाण
  यांची पुण्यतिथी
- सल्लागार
  मा. शरद काळे
  मा. रवींद्र बापट
  मा. ज्ञानेश्वर खैरे
- मानद् संपादक
  दत्ता बाळसराफ
- उप संपादक
  सुरेश पाटील
  मिनल सावंत
- सहाय्यक
  मिनल सावंत
  शमीम खान

- **आभार**

प्रतिष्ठानचे सर्व अधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

अंक : २४वा

- **अक्षरजुळणी आणि छपाई**

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-संपादक श्री दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता,
प्रिन्टो ग्राफी सिस्टम (इं.) प्रा.लि.
२८ मुंबई समाचार मार्ग,
राजाबहादूर बिल्डींग, फोर्ट,
मुंबई-४०० ०२३
फोन नं.: ४०७८ ५६५६
येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र,
जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - २१ येथे प्रकाशित केले
नोंदणी क्र. ७१५८७/९९

## विनम्र अभिवादन

### मा. यशवंतराव मोहिते

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे संस्थापक सदस्य महाराष्ट्राचे माजी मंत्री मा. यशवंतराव मोहिते यांचे शनिवार दि. २२ ऑगस्ट २००९ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले.

मा. यशवंतराव मोहिते यांचा जन्म कराड तालुक्यातील रेठरे बुद्रुक येथे ७ नोव्हेंबर १९२० रोजी सधन शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी आपले सर्व शिक्षण कोल्हापूर येथे पूर्ण केले. त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात पुढाकार घेतला व १९५२ साली ते शे.का.प.च्या वतीने दक्षिण कराडमधून ते विधान सभेवर निवडून आले. त्यानंतर १९५७ साली ते कामगार किसान पक्षाच्या वतीने पुन्हा विधान सभेवर निवडून आले. स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले त्यावेळी त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. विषयांची अभ्यापूर्ण मांडणी करण्याच्या वैशिष्ट्यामुळे एक विचारवंत नेते म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात गृहनिर्माण, राज्य परिवहन, अन्न व नागरी पुरवठा, वित्त, सहकार अशी खाती समर्थपणे सांभाळली. परिवहन मंत्री असताना 'गाव तेथे एस.टी.' ही योजना त्यांनी राबवली. गृहनिर्माण मंत्री असताना घर दुरूस्ती मंडळाची स्थापना सुरू केली. वित्त मंत्री असताना सुदान व इजिप्त या देशांचा अभ्यास करून कापूस एकाधिकार योजना राज्यात सुरू केली. वित्त मंत्री हे पद त्यांनी दीर्घकाळ सांभाळले.

मा. यशवंतराव मोहिते यांनी कृष्णा सहकारी साखर कारखान्याची उभारणी करून सहकार व साखर उद्योगाच्या क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले. सहकार व शेतीचे ते गाढे व कृतिशील अभ्यासक होते. स्वातंत्र्य लढ्यात त्यांचा सहभाग होता. त्यांनी तरूणांची 'दास्य विमोचक सेना' स्थापन केली होती. सर्वसामान्यांच्या जीवनात समृध्दी आणण्यासाठी ते झटत राहिले. समता आणि सहकार हाच त्यांचा मंत्र होता.

मा. यशवंतराव मोहित यांचा सुरूवातीपासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या कार्यात सहभाग व मोलाचा वाटा होता. त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक सक्रिय संस्थापक सदस्य व हितचिंतक गमावला आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

## विनम्र अभिवादन

### डॉ. विजया पाटील

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे संस्थापक सदस्य व महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या प्रथम संघटक आणि प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. विजया पाटील यांचे दि. १५ एप्रिल २००९ रोजी अपघाती निधन झाले.

डॉ. विजया पाटील यांचा जन्म मु.पो. करंजवडे, ता. वाळवा, जि. सांगली या एका खेडेगावात झाला. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुण्यातील संरक्षण दलाच्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्या संरक्षण दलाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या पहिल्या विद्यार्थीनी होत्या. त्यानंतर त्यांनी लंडनमध्ये उच्च शिक्षण घेतले. स्त्रीरोगाबाबत त्यांनी लिहिलेले प्रबंध आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. वर्ल्ड गायनॅकोलॉजी कॉन्फरन्सच्या त्या सेक्रेटरी होत्या. जागतिक स्तरावरच्या अनेक वैद्यकीय परिषदांच्या आयोजनात त्यांचा सहभाग असे. लंडनच्या रॉयल कॉलेजमध्ये स्त्रीरोग विभागाच्या त्या समन्वयक होत्या.

मुंबईच्या परळ भागात त्यांचे रूग्णालय असून शहरातील नामवंत रूग्णालयांमध्ये अवघड शस्त्रक्रिया करण्यासाठी त्यांना बोलाविले जात असे. मुंबईमध्ये दि. २६-११-२००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये जखमी झालेल्यांवर उपचार करण्यासाठी त्यांनी शासकीय रूग्णालयामध्ये धाव घेऊन उपचार केले. वैद्यकीय क्षेत्राप्रमाणेच इतर क्षेत्रात त्या सक्रिय होत्या. महिला आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष पद त्यांनी भूषविले होते. राज्य महिला आयोगाच्या त्या सदस्या होत्या. तसेच श्रीसिध्दिविनायक मंदिर न्यासाच्या विश्वस्त असताना त्यांनी मंदिरात देणगी रूपाने जमा होणाऱ्या निधीचा जास्तीत जास्त वापर शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात व्हावा म्हणून पुढाकार घेतला होता. वाडा येथील 'जानकी इंटरनॅशनल' शाळेच्या त्या ट्रस्टी होत्या.

डॉ. विजया पाटील यांचा सुरूवातीपासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या कार्यात मोलाचा वाटा होता. त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने एक सक्रिय सदस्य व हितचिंतक गमावला आहे.

# संपादकीय

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री तसेच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांना २५ व्या पुण्यतिथी दिनानिमित्त अंत:करणपूर्वक अभिवादन. मा. यशवंतराव यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील महाराष्ट्राचा थोर वैचारिक वारसा पुढे नेला. सामान्य माणसात आत्मविश्वास जागवून त्याच्या संघटित कर्तृत्त्वातून आधुनिक महाराष्ट्राची पायाउभारणी करण्याचे महान कार्य त्यांनी केले आहे. त्यांनी दिलेल्या दिशा आणि दृष्टी कैक पिढ्यांना मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत. त्यांचे हे विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची स्थापना झाली आहे. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून वेगवेगळ्या विभागामार्फत घडणाऱ्या कार्यक्रमांचा लेखाजोखा या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. राज्यात प्रतिष्ठानची विविध ठिकाणी विभागीय कार्यालये असून त्यांच्यामार्फत घेण्यात आलेले विविध कार्यक्रम, परिषदा, मेळावे, चर्चासत्रे यांचा संक्षिप्त आढावा या अंकात घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षास सुरुवात झाली असून, पुरोगामी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याला अद्यापपर्यंत स्वतंत्र असे युवांसाठी कुठलेही धोरण नाही. प्रतिष्ठानच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्यावतीने गेल्या वर्षभरापासून युवा धोरणासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा दि. ८ ऑगस्ट २००९ रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. अशोक चव्हाण, उपमुख्यमंत्री मा. छगन भुजबळ यांना सादर करण्यात आला. याबरोबरच प्रतिष्ठानचे शिक्षण विकास मंच, यशस्विनी अभियान, अपंग हक्क विकास मंच, महाराष्ट्र महिला व्यासपीठ, प्रतिष्ठानची विभागीय केंद्रे यांच्या मार्फत अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येत असून त्यास समाजाचे व शासनाचे चांगले सहकार्य लाभते आहे. मात्र अजूनही ते वृध्दींगत होण्याची गरज आहे.

**'बदलते जागतिक हवामान'** हा सार्वत्रिक चिंतेचा विषय झाला आहे. समाजातील अनेक संस्था व व्यक्ती या समस्येबाबत चिंतन करत आहेत. तसेच त्याच्या सोडवणूकीची उपाययोजना मांडण्याचे आणि आपापल्या शक्ती व शक्यतेनुसार अंमलात आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. दोन वर्षापूर्वी प्रतिष्ठानने देशातील जागतिक स्तरावरील पर्यावरण तज्ञ मा. श्री. आर. के. पचौरी व श्रीमती पचौरी यांना व त्यांच्या कार्याला राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले आहे. प्रतिष्ठानने या वर्षी या गंभीर विषयाबाबत राज्यातील तज्ञ व कार्यकर्त्यांशी विचारविनिमय सुरु केला असून दिनांक ६ फेब्रुवारी २०१० रोजी निवडक निमंत्रितांची बैठक घेण्याचे योजिले आहे. त्याचप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांची पर्यावरण विषयक जाण वाढावी व त्यांनी छोट्या-छोट्या उपाययोजनांसाठी कृतिशील व्हावे म्हणून प्रशिक्षणाचा उपक्रम सुरू करण्याचे ठरविले आहे.

प्रतिवर्षी प्रमाणे दिला जाणारा यशवंतराव चव्हाण साहित्य-संस्कृति/कला, क्रीडा राज्यस्तरीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ गायिका **गानसरस्वती श्रीमती किशोरी आमोणकर** यांना प्रदान करण्यात येत आहे. श्रोत्यांवर मोहिनी घालणाऱ्या, अनुपम गायन शैलीने आणि त्यांच्या संगीताविषयाच्या सखोल चिंतनाने व प्रदीर्घ साधनेने त्यांना 'गानसरस्वती' असे म्हटले जाते. त्यांच्या जीवन व कार्याविषयी नोंद असणारे सन्मानपत्र वार्तापत्रात समाविष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान या कालावधीत दोन दु:खद घटना घडल्या. प्रतिष्ठानचे माजी संस्थापक सदस्य व महाराष्ट्राचे माजी मंत्री मा. यशवंतराव मोहिते यांचे वृध्दापकाळाने निधन झाले तर प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्या व महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या प्रथम संघटक आणि प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. विजया पाटील यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने प्रतिष्ठानने सक्रीय संस्थापक सदस्य व हितचिंतक गमावले आहेत. त्यांच्या जीवन व कार्याविषयी आम्हा सर्वांनाच आदर आहे. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

आपला

(मानद संपादक)

# लोकशाहीतील नियोजन

स्व. यशवंतराव चव्हाण

नियोजनासंबंधीचा आमचा दृष्टिकोन मी आज आपल्यासमोर मांडू इच्छितो. आमची नियोजनासंबंधीची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. योजनेच्या निर्मात्यांनी संमिश्र अर्थव्यवस्था पायाभूत मानून या योजनेची उभारणी केलेली आहे. या अर्थरचनेत सरकारी क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र या दोहोंचीही वाढ होत असली तरी सरकारी क्षेत्राची वाढ जास्त जोमदारपणे होत आहे. या संमिश्र अर्थव्यवस्थेमुळे, जिच्या गर्भात समाजवादी क्षेत्राची निश्चितपणे वाढ होत आहे अशी एक अर्थरचना तयार होत आहे. भांडवलशाही अर्थरचनेपेक्षा अगदी वेगळ्या प्रकारची अशी ही अर्थरचना या देशांत वाढीला लागली आहे. पोलाद, लोखंड, वीज, जळण यांसारख्या अत्यंत महत्वाच्या मूलभूत उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत ही समाजवादी अर्थरचना वाढीला लागली असून, तिची मुळे त्या धंद्यात पक्की होत आहेत. या अर्थरचनेची झालेली वाढ आणि तिचे समाजावरील परिणाम अद्यापि समाधानकारक नाहीत हे म्हणणे काही अंशाने खरे असेल, परंतु मला त्याबद्दल वाद घालावयाचा नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, लोककल्याणकारी राज्य निर्माण करणे आणि समाजाच्या सर्व थरांमधील सर्व प्रकारची विषमता नष्ट करणे हे जे आमचे अंतिम ध्येय आहे त्याच्याकडे जाण्याचा एक निश्चित असा मार्ग या अर्थरचनेमुळे तयार होत आहे. आणि या मार्गावरील आमच्या वाटचालींत होत असलेली प्रगति हीच या योजनेच्या यशस्वितेची खरी कसोटी आहे.

आमचे राष्ट्रीय उत्पन्न वाढले आहे ही गोष्ट खरी, परंतु वाढलेल्या उत्पन्नाचे काय होत आहे हे पाहिले पाहिजे. आपले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लोकसभेत हा प्रश्न उपस्थित केला असून या प्रश्नासंबंधाने त्यांच्या सूचनेप्रमाणे एक चौकशी समितीही नेमली जाणार आहे. मी तर याही पुढे जाऊन असे म्हणेन की, राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी योग्य प्रमाणात होत आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवण्याकरितां योजनेच्या कार्याच्या अंतर्गत एक कायमची यंत्रणाच निर्माण करण्यात आली पाहिजे. त्याशिवाय आमची योजना समाजवादाच्या उद्दिष्टाकडे जाऊ शकणार नाही.

आपल्या देशांत चाललेल्या योजनेच्या गुणावगुणांचे मूल्यमापन करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. आमची भूमिका ज्यांना मान्य नाही तेही या योजनेचे मूल्यमापन आपल्या दृष्टिकोनांतून करू शकतात, तसे करण्याचे त्यांना स्वातंत्र्य आहे. परंतु सोविएट रशियाच्या पंचवार्षिक योजना कशा चालल्या होत्या ? सोविएट रशियामध्यें या योजना चालू असताना स्टॅलिनला कोणीही विरोध करू शकत नव्हता. ज्या साधनांनी स्टॅलिननें आपल्या योजना कार्यान्वित केल्या तशी साधने आपल्याजवळ नाहीत. एक नवीन मार्ग आखून आम्ही आमची आर्थिक रचना उभी करीत आहोत. त्या बाबतीत मतभेद होणे संभवनीय आहे. पण आपल्याला एका मर्यादित क्षेत्रामध्ये विचार करावयाचा आहे. एका विशिष्ट तऱ्हेने एका सबंध आर्थिक रचनेचे रूप बदलून टाकावयाचे आहे. राष्ट्रीय उत्पन्न आणि कल्याणकारी राज्य यांचा संबंध जोडून या नियोजनाच्या बाबतीत टीका केली जाते. मजुरांची काय स्थिति आहे, ते अन्न किती खातात, त्यांना किती कपडा लागतो, त्यांच्या राहण्याची परिस्थिति कशी आहे याची चौकशी करा, असें पुष्कळ वेळा म्हटलें जाते. तसे पाहिले तर आमच्या मजुरांची परिस्थिती बरी आहे. सोविएट रशियामधील शेतकऱ्यांना व मजुरांना कसे काय वागवितात, आपल्याला काय माहीत ? परंतु सोविएट रशियाच्या पंचवार्षिक योजना आणि आपल्या पंचवार्षिक योजना यांची तुलना करणे योग्य होणार नाही, तशी तुलना होऊ शकत नाही. मी अपेक्षा करतो की, आपल्या योजनांकडे निराळ्या दृष्टिकोनांतून पाहिले जाईल. आपण एका संमिश्र काळामध्ये काम करीत आहोत. अशा काळामध्ये उद्योगधंद्यांची जी वाढ होते, औद्योगिक क्षेत्राचा जो विकास होतो, ती वाढ आणि तो विकास समाजवादी स्वरूपाचा म्हणजे समाजाच्या हितासाठी होतो किंवा नाही हे आपणांस पाहावे लागते. महत्त्वाचा प्रश्न आपल्यापुढे असा आहे की, आपल्या नियोजनाचे परिणाम काय होणार आहेत?

आमच्याजवळ जी साधने उपलब्ध आहेत ती घेऊन आम्हाला नव्याने एक आर्थिक शक्ति उभी केली पाहिजे. खाजगी क्षेत्रामध्ये

विकासाच्या ज्या शक्ति आहेत त्यांचाही उपयोग आम्ही केला पाहिजे. संमिश्र आर्थिक रचना करीत असताना आमच्याजवळ जी जी साधने असतील ती सर्व साधने वापरून तिच्या पाठीमागे सामर्थ्य उभे करावे लागते. केवळ सरकारी क्षेत्र समर्थ झाले की समाज पुढे जाणार आहे काय हा प्रश्न आहे. भोवतालची जी परिस्थिती असते तिचाही विचार करावा लागतो. यासंबंधीची माहिती आपल्या ह्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पुस्तकांत जे टिपण दिलेले आहे त्यामध्ये सापडेल. सरकारी क्षेत्राची आणि खाजगी क्षेत्राची वाढ कशी झाली याची माहिती त्यांत दिलेली आहे. पहिल्या योजनेत सरकारी क्षेत्रासाठी १९६० कोटी रूपये व दुसऱ्या योजनेमध्ये ४६०० कोटी रूपये मंजूर झाले होते, तर तिसऱ्या योजनेत सरकारी क्षेत्रासाठी ७२५० कोटी रूपये मंजूर करण्यात येणार आहेत. खाजगी क्षेत्रासाठी पहिल्या योजनेत १८०० कोटि रूपये व दुसऱ्या योजनेत ३१०० कोटि रूपये मंजूर झाले होते, आणि आता तिसऱ्या योजनेत खाजगी क्षेत्रासाठी ४००० कोटी रूपये मंजूर होणार आहेत. याचा अर्थ असा की, खाजगी क्षेत्रांपेक्षा सरकारी क्षेत्राची वाढ वेगाने होत आहे. समाजवादी मूल्यांवर माझा विश्वास आहे. म्हणून मला आश्वासन द्यावयास हरकत वाटत नाही की, या योजनेच्या विकासाची जी गती दिसत आहे ती पर्यायाने आपल्याला समाजवादाकडे घेऊन जाणारी आहे. याबद्दल मला शंका वाटत नाही.

येथे एक असा मुद्दा उपस्थित करण्यात आला की, योजनेमधून निर्माण होणारा फायदा समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचत नाही. काही अंशी या विधानाचा स्वीकार केला पाहिजे. कारण गोष्ट अशी आहे की, हा सगळा विकास समाजाच्यां सगळ्या थरांशी नेऊन पोहोचविणाऱ्या ज्या शक्ति हव्यात त्या आपल्यापाशी अजूनही नाहीत. मला वाटतें, योजनेची आणखी प्रगति झाल्यावर विकासाची प्रगती सर्व समाजाच्या थरांपर्यंत पोहोचते की नाही हे दिसून येईल.

शेतीच्या क्षेत्रासंबंधी असे सांगण्यात आले की, आम्ही आमचे धोरण सोडून देतो, आमच्या धोरणाविषयी मनात शंका येते. सहकारी शेतीबाबत नागपूरला काँग्रेसने जे तत्व स्विकारले आहे आणि ज्या योजनेचा स्वीकार केलेला आहे, त्यावर या सरकारचा विश्वास आहे, विश्वास आहे, विश्वास आहे असे मी त्रिवार सांगू इच्छितो. येत्या नोव्हेंबरच्या अधिवेशनामध्ये सीलिंगचे बिल येईल. नागपूरच्या ठरावामध्ये जे तत्व मान्य केले आहे त्याच्या पाठीमागे हाच उद्देश आहे. सीलिंगच्या पाठीमागे जे आमचे उद्दिष्ट आहे त्यासंबंधी वाद घालण्यात काही फायदा नाही. सीलिंग आल्यानंतर त्याचे काय परिणाम होतील ते दिसून येतील.

सहकारी शेतीबाबत मी सांगू इच्छितो की, आमच्या सन्मान्य दोस्तांचे त्यासाठी सहकार्य मिळाले पाहिजे. सहकारी तत्व हे असे आहे की, ते प्रत्येकाच्या मनोवृत्तीवर अवलंबून आहे. सहकार द्यावयाचा कसा ? सर्वसामान्यपणे सहमत असणाऱ्या माणसांच्या मनाची त्यासाठी तयारी करावी लागते. शेतीची जास्तीत जास्त जी शक्ति आहे आणि वापर न केल्यामुळे जी आज फुकट जात आहे ती शक्ति आपण फुकट घालवू नये. शेतीच्या विकासाकरितां आपले मनुष्यबळ जरी वापरले गेले, तरीसुद्धा शेतीची निश्चित अशी सुधारणा होईल, उत्पादन वाढेल, आणि त्यामुळे या देशाची आर्थिक शक्ति वाढेल व तीही मोठ्या जोमाने वाढेल, हे चित्र मलाही मंजूर आहे. पण आपणाला एकूण लोकांना घेऊन जावयाचे आहे, त्यांच्या मनाची तयारी करावयाची आहे. त्यांचे मनःपूर्वक सहकार्य मिळवावयाचे आहे. ही गोष्ट आपणांला कदापि विसरून चालणार नाही.

उत्पादनवाढीच्या दृष्टीने कष्टकरी जनतेसाठी जी गोष्ट कल्याणकारी असेल, आणि लोकशाही विचारांच्या कल्पनेला जर ती बाधक नसेल, तर ती मान्य करावयास मला तरी कोणतीच हरकत दिसत नाही. मला आर्थिक प्रगति जितकी महत्त्वाची वाटते तितकीच किंबहुना त्याहिपेक्षा जास्त लोकशाहीचीं मूल्यें महत्त्वाची वाटतात. या दोन्ही गोष्टींची विसंगति करून चालणार नाही आणि तसे करता देखील येणार नाही.

आज जगामध्ये आपण असे पाहतो की, भांडवलशाही राष्ट्रांनी देखील आपली यथोचित आर्थिक प्रगति करून घेतलेली आहे

आणि त्याचबरोबर कम्युनिस्ट राष्ट्रांनी देखील आपला आर्थिक विकास साधला आहे. परंतु या दोन्ही गटांतील राष्ट्रांच्या दृष्टिकोनांत लोकशाही पद्धतीचीं मूल्ये नव्हती. भांडवलशाही पद्धतीने ज्या देशांचा विकास झाला त्या देशांना लोककल्याणाची एवढी चिंता नव्हती आणि कम्युनिस्ट पद्धतीने ज्या राष्ट्रांनी आपला आर्थिक विकास करून घेतला त्यांनी देखील लोकशाहीचा हा मार्ग अंगिकारलेला नव्हता. परंतु भारत आज ज्या लोकशाहीच्या दृष्टिकोनांतून कल्याणकारी राज्याकडे जात आहे, ती दृष्टि फारच महत्त्वाची आहे. त्यात बऱ्याच अडचणी निर्माण होणे स्वाभाविक आहे. पण हा एक अद्भुत असा प्रयोग आहे. अशा प्रकारचा प्रयोग आज जगात कोणत्याही देशांत झालेला नाही. सांगण्याचा मुद्दा असा की, भांडवलशाही राष्ट्रे आणि कम्युनिस्ट राष्ट्रे यांच्यासमोर नियोजनाच्या द्वारा आर्थिक विकास करताना निर्माण झाली नाही अशी एक वेगळीच समस्या भारतासमोर आज निर्माण झाली आहे. तिचा विचार करूनच आपले नियोजन यशस्वी झाले की अयशस्वी झाले याचा आपणाला विचार केला पाहिजे. आज भारताची परिस्थिती भांडवलशाही व साम्यवादी राष्ट्रांपेक्षा अगदी भिन्न अशी आहे. आपणाला येथे लोककल्याणाची दृष्टि ठेवावयाची आहे आणि अशी दृष्टि ठेवूनच पुढे जावयाचे आहे. मी येथे असेही म्हणू शकेन कीं, आज एका अपघाताने हिंदुस्तानवर ही जबाबदारी येऊन पडलेली आहे. मी 'अपघाताने' हा शब्द या ठिकाणी मुद्दाम वापरीत आहे. नियोजनाच्या मदतीने आर्थिक विकासाची जबाबदारी या देशाने घेतलेली आहे. ती जबाबदारी लोकशाही मूल्यांची जपणूक करून पार पाडण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. आपण आज एका फार मोठ्या कठीण परिस्थितीमधून जात आहोत. कोणतीही गोष्ट पुस्तके वाचून आणि त्यांतील तत्त्वज्ञान सांगून होत नसते. तत्त्वांत आणि व्यवहारांत फार मोठे अंतर असते. कोणत्याही बाबीसंबंधाने तत्त्वज्ञान सांगणे ही एक गोष्ट आहे आणि तेच तत्त्व अंमलात आणणे ही निराळी गोष्ट आहे. तत्त्वज्ञानावर जास्त अवलंबून न राहता व्यावहारिक दृष्ट्या जी गोष्ट योग्य दिसते तीच गोष्ट आपणाला आपल्या या देशाकरिता करावयाची आहे. आपणांला असेच नियोजन करावयाचे आहे की, जे व्यवहारात बसू शकते. आणि हाच प्रश्न फार महत्त्वाचा आहे. आम्हाला आकाशात भराऱ्या मारावयाच्या नाहीत. आम्हाला जमिनीवर चालावयाचे आहे आणि येथे टिकावयाचे आहे. आणि त्याचबरोबर जमिनीवरून 'टेक ऑफ' उड्डाण कसे करता येईल, इकडे आमची दृष्टि सतत राहिली पाहिजे. येथे असेहि सांगण्यात आले की आमची ही योजना विमानांत बसणारांसाठी आहे. मला याबद्दल काही बोलावयाचे नाही. विमानांतून जावयाचे असेल तर सगळेच जण मिळून जाऊ. फायदा हा सामान्य जनतेला व्हावयाला पाहिजे. आमच्या योजनेचा उद्देशहि तसाच आहे. सामान्य जनतेला या योजनेचा फायदा होणार नसेल तर त्या 'टेक ऑफ'ला काहीच अर्थ नाही. जनतेसाठी जे काही होत आहे ते शेवटी रिॲलिटीकडेच-वास्तवतेकडेच आले पाहिजे.

सरकारी क्षेत्राला जर या राज्यांत उत्पादनाच्या दृष्टीनें साधने मिळू शकतील तर ती आवश्यक आहेत. येथे असे विचारण्यांत आले की, कापड गिरण्यांच्या बाबतीत आम्ही तसे का करीत नाही? मलाहि वाटते करावे, परंतु आम्हाला जे काही करावयाचे असेल ते करण्यापूर्वी सर्व दृष्टींनी ती गोष्ट आपणाला कोठपर्यंत फायदेशीर होईल हे पाहिले पाहिजे. अगोदर सरकारी क्षेत्राकरितां कापड गिरण्यांचे क्षेत्र उपयुक्त आहे की नाही हे आपणाला पाहिले पाहिजे. ही गोष्ट उपयुक्त असेल तर ती आम्ही हिंदुस्तान सरकारपुढे मांडू इच्छितो. सरकारी क्षेत्राच्या बाबतीत निव्वळ केंद्र सरकारकडेच त्याचे सर्वाधिकार असू नयेत. सरकारी क्षेत्राच्या बाबतीत राज्य सरकारांना देखील त्यांच्या परिस्थितीप्रमाणे त्या त्या क्षेत्रात वाढ करण्याची संधी दिली पाहिजे. इतके म्हणून सुद्धा सर्व गोष्टी सुरळीतपणे होतील असे थोडेच आहे ? आपल्या मनामध्ये पुष्कळ असते. आपण काही आकाशांत राहत नाही. जमिनीवर राहतो. म्हणून जे काही आपणांला करावयाचे आहे, त्याच्या साधनांचा आपणाला विचार करावा लागेल. त्याचबरोबर विकासाच्या इतर साधनाचा देखील विचार करावा लागेल. समोरच्या माझ्या मित्रांनी माझ्या या म्हणण्याला तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. त्यांनी शिक्षणाला फार प्राधान्य दिले गेले पाहिजे असे म्हटले आहे. ते मला मान्य आहे. नियोजनाची जी मूळ कल्पना होती ती मी

आपणांस सांगितली. शेवटी सरकारी क्षेत्रामध्ये जाण्याची आवश्यकता पडली तर या राज्याला युक्त क्षेत्र कोणते ते आपोआप दिसेल. हिंदुस्तान सरकारने आम्हाला संमती दिलेली आहे. आमच्याजवळ जी साधने आहेत त्यांचा आगोदर आम्हांला विचार करावयला पाहिजे. मी आपणांला माझ्यातर्फे आणि तसेच या शासनातर्फे असे सांगू इच्छितो की, या गोष्टींचा आम्ही सावधपणे विचार करू. या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये कोठे सरकारी क्षेत्राचा फायदा होईल, तिकडे आमची जागृत दृष्टी राहील, असे मी निक्षून सांगू इच्छितो. साधनांच्या उपलब्धतेकरिता जरूर पडली तर अभ्यास मंडळे देखील नेमू.

येथे अभ्यासमंडळाचे नाव निघाल्यामुळे मला एक खुलासा करावासा वाटतो. वर्तमानपत्रांत जे वृत्तांत आले आहेत त्यांत सामान्यपणे असे दाखविण्यात आले आहे की, या महाराष्ट्र राज्याची योजना ७९० कोटी रूपयांची होणार असा आम्ही नेमलेल्या अभ्यासमंडळाचा उद्देश होता. परंतु प्रत्यक्ष रूपांत कशाची शक्यता आहे आणि काय आवश्यक आहे या तत्त्वावर हा आराखडा आधारलेला आहे. तो तयार करतांना आर्थिक दृष्टिकोनांतून फारसा विचार केलेला नाही. समाजवादाकडे जाण्याचा नियोजन हा एक मार्ग आहे. त्या दृष्टीने आपल्या पहिल्या दोन योजना आखल्या गेल्या आणि त्याचप्रमाणे ही तिसरी म्हणा किंवा पुढे येणारी चौथी योजना म्हणा, आखली जाणार आहे. ह्या राज्याची तिसरी योजना आर्थिक दृष्ट्या किती मोठी असावी याचा विचार करून योजना सादर करा असे नियोजन मंडळाने सांगितलेले नव्हते, अशा प्रकारचे बंधन नियोजन मंडळाने घातलेले नव्हते. आर्थिक दृष्टया काय शक्य आहे याचा विचार मागाहून करता येईल असेच नियोजन मंडळाने म्हटलेले होते. आर्थिक दृष्ट्या किती मोठी योजना मंजूर करावयाची ते नियोजन मंडळ ठरविणार आहे. आर्थिक दृष्ट्या अमुक एवढ्या आकाराची योजना असली पाहिजे अशा प्रकारचे बंधन आम्ही अभ्यास मंडळावरही घातलेले नव्हते. अशा प्रकारची अट घालणे इष्ट नव्हते आणि तशी ती घालण्यात आलीही नव्हती. आपल्या गरजा भागविण्यासाठी कमीत कमी कशाची जरूरी आहे आणि प्रत्यक्ष रूपात काय शक्य आहे याचा विचार करून योजना सादर करा असे अभ्यासमंडळाला सांगण्यात आलेले होते. याचा अर्थ आम्ही या योजनेसाठी ७९० कोटी रूपयांची मागणी करणार आहोत असा नाही. आपल्या देशाच्या व राज्याच्या आर्थिक मर्यादेत बसेल एवढीच योजना सादर करावयास पाहिजे. या प्रश्नावर आम्ही भांडू शकत नाही, भांडू इच्छीत नाही. दुसऱ्या राज्याला कमी दिले किंवा जास्त दिले अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित करून आम्हाला भांडावयाचे नाही. सगळ्या गोष्टींचा फायदा कोणाला मिळतो याकरिता भांडले पाहिजे.

योजनेसाठी लागणारा पैसा कोठून मिळविणार हा देखील एक प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या ज्या पद्धति आहेत त्या पद्धतींना अनुसरून हा प्रश्न सोडविला जाईल. कर्जरूपाने आणि करांच्या रूपानें आपण रक्कम जमविली पाहिजे हे आपल्याला माहीत आहेच. आपल्या देशाच्या संविधानात जे मार्ग सांगितलेले आहेत त्या मार्गाचा अवलंब करून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. अर्थात् या गोष्टीचा विचार जेव्हा वेळ येईल तेव्हा करता येईल. हा प्रश्न सोडविणे कठीण पडेल असे मला वाटत नाही. राज्यावर जी जबाबदारी या बाबतीत टाकली जाईल ती पार पाडली जाईल. या जबाबदारीमुळे आमच्या राज्यावर अन्याय्य ओझे पडेल असे मानण्याचे काही कारण नाही असे मला वाटते. या गोष्टींचा विचार नियोजन मंडळानेच प्रामुख्याने करावयाचा आहे. नदी पार करून पलीकडे जावयाचे एवढे एकदा मनाशी पक्के केल्यानंतर ती कशा प्रकारच्या पुलावरून पार करावयाची यावर जास्त भर देण्याचे काही कारण नाही. आपल्या राज्याची तिसरी पंचवार्षिक योजना ७९० कोटी रूपयांची राहील अशा प्रकारचा उल्लेख वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्याचे मी पाहिले म्हणून हा सर्व खुलासा केला आहे. ज्या वेळी ही योजना नियोजन मंडळाकडे पाठविली जाईल त्या वेळी ही योजना ७९० कोटींची म्हणून पाठविली जाणार नाही, तर आमच्या किमान गरजा भागविण्याच्या दृष्टीने तयार केलेली योजना म्हणून ती त्यांच्याकडे पाठविली जाईल. तेव्हा या बाबतीत कोणताही गैरसमज होणार नाही अशी मला आशा आहे.

भूसंरक्षणासाठी काय करण्यात आले आहे हा एक मुद्दा आहे. भूसंरक्षणासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत पहिल्यांदा २ कोटी

८० लाख रूपयांची तरतूद केलेली होती. ती नंतर वाढवून ६ कोटी ४ लाख रूपयांपर्यंत नेली. त्याचप्रमाणे छोट्या पाटबंधाऱ्यांसाठी पहिल्यांदा ४ कोटी ६३ लाख रूपयांची तरतूद करण्यांत आलेली होती, परंतु प्रत्यक्ष खर्च जवळ जवळ १० कोटी रूपयांवर झाला. या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत १६ कोटी रूपये खर्च करण्याची आमची इच्छा आहे. शेती विकासासाठी शेतकी क्षेत्रांत खर्च होणाऱ्या एकूण रकमेच्या २५ टक्के एवढी ही रक्कम आहे. शेतकीच्या क्षेत्रांत एकूण ६२ कोटि रूपये खर्च होणार आहेत. एकूण ६२ कोटि रूपये खर्च होणार आहेत. पाटबंधाऱ्यांच्या मोठ्या योजनांवर २५ कोटि ६४ लाख रूपये खर्च होणार आहेत. म्हणजे हे प्रमाण ६२ टक्के पडते. ज्या ठिकाणी कोरडवाहू जमीन असून पाटबंधारे होण्याची शक्यता मुळीच नाही परंतु कोरडवाहू शेती होण्याचीच शक्यता आहे, अशा ठिकाणी भूसंरक्षणाचा प्रश्न प्रामुख्याने घेण्याचा सरकारचा विचार आहे. जेथे पाटबंधारे होऊ शकणार नाहीत तेथे दुसऱ्या मार्गाने जमिनीचा विकास केला पाहिजे. पाटबंधारे होण्याची शक्यता असेल त्या ठिकाणी पुन्हा भूसंरक्षणाच्या योजना हाती घेण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही. ज्या ठिकाणी पाटबंधारे होण्याची शक्यता नाही त्या पश्चिम महाराष्ट्रांत ही योजना घेण्याचा सरकारचा विचार आहे. कर्जत ते जतपर्यंतचा जो ४० लाख एकरांचा पट्टा आहे त्या पट्ट्यांत शक्य तितक्या लवकर भूसंरक्षणाची योजना पुरी करण्याचा सरकारचा विचार आहे. या पट्ट्यांत वर्षातून दहा-बारा इंच पाऊस आणि तोही पंचांगातील ग्रहांनी दगा दिला नाही तर पडतो. मात्र चांगला पाऊस पडला तर चांगले पिक निर्माण होते. या कर्जत-जत पट्ट्यांत सर्व लोक भूसंरक्षणाच्या कामास लागलेले आहेत असे चित्र पाहण्याची आमची इच्छा आहे. अशी परिस्थिती निर्माण करता आली तर ती तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत निर्माण करण्याची आणि हा मागासलेला भाग अधिक विकसित अधिक गतिमान असा झाल्याचे पाहण्याची आमची इच्छा आहे.

हे अविकसित भाग इतर भागांच्या बरोबरीस येण्यासाठी दहा वर्षांची कालमर्यादा असावी असे सांगण्यात आले. या बाबतीत अशी हटवादी भूमिका घेऊन चालणार नाही. दहा वर्षांच्या कालावधींतच या प्रदेशांचा विकास झाला पाहिजे अशा प्रकारची भूमिका घेता येणार नाही. अर्थात् सर्वसाधारण कालमर्यादा म्हणून दहा वर्षांची मर्यादा सांगितली असेल तर ती बरोबर आहे. परंतु त्याचबरोबर, बाकीच्या भागांची भरपूर प्रगती झालेली आहे असे आपल्याला म्हणतां येणार नाही. पूर्वीच्या विदर्भ विभागाकडे मध्य प्रदेशाकडून दुर्लक्ष झाल्याने तो अविकसित राहिला आणि हैद्राबाद सरकारच्या राजवटींत मराठवाडा विभागाकडे दुर्लक्ष झाले ह्या गोष्टी खऱ्या आहेत असे गृहीत धरले तरी महाराष्ट्राचा बाकीचा जो उरलेला भाग आहे तो अतिशय प्रगतिमान असा भाग आहे असे समजण्याचे काही कारण नाही. तेव्हा आम्हाला सर्व विभागांची प्रगति करावयाची आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

विदर्भात मनुष्यबळ जास्त आहे, तेव्हा त्याबाबत विचार झाला पाहिजे असे सांगण्यात आले. मनुष्यबळ जास्त असण्याचा मान मी फक्त विदर्भालाच देऊ इच्छीत नाही हे मला प्रथम सांगितले पाहिजे. कामाला लावता येईल असे मनुष्यबळ साऱ्या भारतात आहे आणि तसे ते आमच्या राज्यातही सर्व ठिकाणी विपुल प्रमाणात आहे. हा जो मनुष्यबळाचा अद्यापि उपयोगात न आणलेला साठा-बॅकलॉग आहे त्यावरच आपली सर्व साधनसामुग्री व शक्ति केंद्रित करण्याचा प्रयत्न केला, तर आपल्या राज्यात जे अविकसित भाग आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष होण्याची भीती आहे. म्हणून या भागांना विकसित भागांबरोबर आणण्यासाठी सर्वसाधारणपणे एक कालखंड ठरवून द्यावा असे जे सांगण्यात आले त्याप्रमाणे कालखंड ठरवून त्या भागांचा विकास झाला पाहिजे या मताचा मीहि आहे. त्याप्रमाणे कालखंड समोर ठेवून विकास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व त्याकरिता व्यवहार्य योजना आखल्या पाहिजेत. परंतु त्यासाठी त्या भागांत पूर्वी रस्त्यांचे मायलेज - रस्त्यांची एकंदर लांबी किती होती आणि दहा वर्षानंतर ती किती झाली या दृष्टिकोनातून मी पाहण्यास तयार नाही, किंबहुना या दृष्टिकोनांतून कोणीहि पाहू नये. त्या भागाचा मूलतः आर्थिक विकास किती झाला हे पाहिले पाहिजे. त्या भागात तांत्रिक शिक्षण किती वाढले, त्या भागाचे औद्योगीकरण किती झाले ह्यावर त्या भागाचा विकास अवलंबून आहे.

सामाजिक सुखसोयींकडे दुर्लक्ष होता कामा नये ही गोष्ट मी मान्य करतो, आणि त्यातल्या त्यांत शिक्षणाकडे तर मुळीच दुर्लक्ष होता कामा नये. मी 'च'च्या भाषेत बोलणार नाही, परंतु शिक्षणाची बाब इतकी महत्त्वाची आहे की त्यासंबंधी 'च' च्या भाषेत मला बोलावे लागत आहे. आपल्याला नवीन पिढी निर्माण करावयाची आहे. म्हणून मी सांगू इच्छितो की, शिक्षणाच्या बाबीकडे मुळीच दुर्लक्ष होणार नाही. मी ही गोष्ट मुद्दाम आग्रहपूर्वक सांगतो आहे.

दारूबंदीच्या प्रश्नांसबंधाने काही विचार व्यक्त करण्यात आले. दारूबंदीच्या प्रश्नाला काही सामाजिक बाजू आहेत, काही आर्थिक बाजू आहेत. दारूबंदी जेव्हा अस्तित्वात नव्हती तेव्हा मुंबईतील कामगारांचे जीवन किती भयानक होते याचा प्रत्यक्ष अनुभव मीहि घेतलेला आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी मला जेव्हा जेव्हा मुंबईत राहण्याचा प्रसंग येत असे तेव्हा तेव्हा दुसरीकडे राहण्याची सोय नसल्यामुळे मी कामगारांकडेच राहत असे. त्यामुळे मला त्यांच्या जीवनाचे जवळून निरीक्षण करण्याची संधि बरेच दिवस मिळाली आणि त्यांच्या अडचणी माझ्यासमोर साकार झाल्या. संध्याकाळ झाल्यानंतर कामगार वस्तीत काय भीषण प्रकार होत असत याची कल्पना त्या जीवनाचे ज्यांनी जवळून निरीक्षण केले आहे,त्या जीवनाचा ज्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे त्यांनाच येऊ शकेल, दुसऱ्यांना नाही. आज परिस्थिती अशी आहे की, सर्व कामगारांनी आपापल्या कुटुंबियांना मुंबईत आणले आहे, त्यांची मुले शाळेत जात आहेत. परंतु पंचवीस-तीस वर्षांपूर्वी काय स्थिति होती ? कामगारांच्या कमाईचा बहुतांश हिस्सा दारू पिण्यात खर्च होत असे. आज स्थिती अगदी वेगळी आहे. दारूबंदीमुळे कामगार वर्गाची परिस्थिती निश्चितपणे सुधारली आहे. त्यांच्यामध्ये सुबत्ता आली आहे असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. ज्यांना दारू पिऊन मरावयाचेच असेल त्यांना मरू द्यावे, असे जे म्हणतात त्यांना दारू पिण्यामुळे मनुष्याचे जीवन कसे यातनामय बनते याचा अनुभव नसावा. चार खोल्यांच्या ऐषआरामी फ्लॅटमध्ये राहून पोटभर जेवण झाल्यानंतर आरामात बसून पाठीमागे काही काळजी नसताना दारू पिणाऱ्यासंबंधाने मी सांगत नाही. अनंत अडचणींनी व्यापलेले ज्यांचे जीवन आहे असे लोक दारूच्या नशेत आपल्या काळज्या बुडवू पाहतात. कामगार दारू पिऊन घरी येऊन आपल्या मुलांच्या देखत बायकोला मारपीट करू लागला म्हणजे त्या मुलांच्या मनावर काय परिणाम होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. अशा प्रसंगांमुळे त्यांच्या संस्कारक्षम मनावर जे दुष्परिणाम होतील ते, शाळेत त्यांना कितीही चांगले शिक्षण देण्यात आले तरी दूर होणार नाहीत, त्या शिक्षणाचा त्यांच्या मनावर काहीही परिणाम होणार नाही. दारूबंदीमुळे असे प्रकार आता बंद झाले आहेत हे आपणांस मान्य केलेच पाहिजे. चोरून दारू गाळण्याचे प्रकार मुंबईत वाढले आहेत, नाही असे नाही. परंतु त्यांना आळा घालण्याकरिता काय केले पाहिजे याचा विचार सर्वांनी केला पाहिजे. दारूबंदीचे धोरण रद्द ठरविणे हा त्यावरील उपाय नाही.

आपण निरनिराळ्या राजकीय पक्षांमध्ये वाढलों असलो तरी देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामांतून आपली राजकीय क्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे. जनतेचे जीवन सुखी, समृद्ध आणि संपन्न व्हावे, त्या जीवनामध्ये नव्या शक्तींची वाढ व्हावी हा दृष्टिकोन, ही जी राजकीय क्षेत्रामध्ये काम करणारी माणसे आहेत त्यांचा असणारच. त्यांना मी आग्रहाने सांगू इच्छितो की, आम्ही लोक कल्याणाच्या यात्रेचा मार्ग पत्करला आहे. या यात्रेमध्ये कोणी ही मागे राहू नये. कदाचित आपल्या उद्दिष्टांकडे जाण्याच्या मार्गात फरक असू शकेल. काहींचे मार्ग अलग असतील, विचार निराळे असतील. त्या विचारांशी त्यांनी प्रामाणिक राहावे. मात्र लोककल्याणाच्या या यात्रेत त्यांची आणि आमची त्यांच्या विचारांची आणि आमच्या विचारांची कोठे तरी एकत्र गाठ पडल्याशिवाय राहणार नाही.

('सह्याद्रीचे वारे' या ग्रंथातून साभार)

## 'यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य-संस्कृति/कला, क्रिडा राज्यस्तरीय पारितोषिक २००९'
## माननीय श्रीमती किशोरी आमोणकर
## सन्मानपत्र

आपल्या संगीत विषयाच्या सखोल चिंतनाने, प्रदीर्घ साधनेने आणि श्रोत्यांवर मोहिनी घालणाऱ्या अनुपम गायन शैलीने ज्यांना सार्थपणे 'गानसरस्वती' असे म्हटले जाते त्या श्रीमती किशोरी आमोणकर यांचा जन्म मुंबई येथे १० एप्रिल १९३१ रोजी झाला. आपल्या पित्याचा सहवास त्यांना फार लाभला नाही. वयाच्या ६ व्या वर्षीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले.

त्यांनी स्वतः केलेल्या मार्मिक उल्लेखाप्रमाणे संगीताच्या विषयात त्या 'गर्भश्रीमंत' आहेत. कारण त्या गर्भात असतांना त्यांच्या मातोश्री व जयपूर घराण्याच्या विख्यात गायिका मोगुबाई कुर्डीकर अल्लादिया खाँसाहेबांकडे संगीताचे शिक्षण घेत होत्या. कोणत्याही व्यक्तीचा पहिला गुरु त्याची आई हीच असते. परंतु किशोरीताईच्या बाबतीत मोगुबाई कुर्डीकरांनी माता-पिता व आचार्य अशा तिन्ही भूमिका समर्थपणे पार पाडल्या. इतर संस्कारांबरोबरच माईनी (मोगुबाई कुर्डीकर) त्यांच्या कंठावर स्वरांचे संस्कार केले. त्यातून माईच्या गायकीचे संस्कार त्यांच्यावर झाले व पर्यायाने जयपूर घराण्याची शिस्त, कायदे, स्वरांचे शुध्द कंठयुक्त स्वरुप म्हणजे 'आकारयुक्त' गाणे, ताला-सुरांचे एकमेकांशी असणारे नाते व बंदिशीची विशिष्ट मांडणी यांचेही संस्कार त्यांच्या गळ्यावर झाले.

आपली कन्या अधिक ज्ञानवंत व्हावी या इच्छेने माईनी किशोरीताईना सुगम संगीताचे ज्ञान मिळण्यासाठी नामवंत गुरुकडे पाठविले. एके दिवशी हे गुरु माईना म्हणाले 'माई, तुझ्या मुलीचा आवाज म्हणजे शुध्द दगड आहे दगड! तो हलता हलत नाही.' हे शब्द कानावर पडल्यानंतर किशोरीताईनी निर्णय केला की, संगीतातील एकही प्रकार असा असता कामा नये की जो आपल्या कंठातून येणार नाही. भावगीत, नाट्यसंगीत, चित्रपट संगीत, गझल, भजन, अभंग हे सर्व प्रकार गाता आलेच पाहिजेत असा त्यांनी पण केला व या सर्व गायन प्रकारात अपूर्व कलात्मक उंची गांठून तो सिध्द करुन दाखविला.

कॉलेजमध्ये असतांना डॉक्टर होण्याची त्यांची इच्छा होती. परंतु त्यांच्या असंख्य चाहत्यांच्या सुदैवाने त्या संगीताकडे वळल्या. माईनी त्यांना अनेकांकडे शिकण्यास पाठविले. त्यामध्ये आग्रा घराण्याचे मरहूम अन्वर हुसेन खाँसाहेब यांच्याकडून स्वरांचा सखोल विचार आणि त्यानुसार तालाचा वापर हे वैशिष्ठ्य त्यांनी आत्मसात् केले. अंजनीबाई मालपेकर, हुस्नलाल या कलाकारांचेही मार्गदर्शन त्यांनी घेतले. मातोश्री मोगुबाई कुर्डीकरांसारख्या गानतपस्विनी यांच्याकडे घरीच शिकण्याची संधि हा कलाकाराच्या कुंडलीतील भाग्ययोगच. कोमल, हळुवार आणि तार सप्तकातल्या पंचमापर्यंत लीलया जाणारा आर्जवी

सूर, सूक्ष्म लयींचे सुंदर बोलआलाप, आलापीच्या अंगाने येणारी अलगद सम, प्रचंड दमसासाच्या ताना ही मोगूबाईच्या गाण्याची कांही वैशिष्ट्ये. माईच्या सहवासांत त्या केवळ संगीत कलेत निष्णात झाल्या नाहीत तर कलेकडे आणि जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अधिकाधिक प्रगल्भ झाली. त्यांच्या सांगीतिक वाटचालीत त्यांचे पति कै. श्री. रवींद्र आमोणकर यांनी अखंड साथ दिली.

श्रीमती किशोरी आमोणकर यांची मैफल ऐकणं हा रसिकांसाठी स्थलकालातीत नेणारा असा अनुभव असतो. आजच्या ताणतणावांच्या आणि कोलाहलाच्या जगात मनाला शांतता आणि आनंद देण्याचं विलक्षण सामर्थ्य त्यांच्या गाण्यात आहे. सुरेल झंकारणाऱ्या तानपुऱ्यांच्या सुराशी एकजीव होऊन अकृत्रिम आणि मोकळ्या आवाजात त्यांचा षड्ज 'आकारतो' तेव्हा संपूर्ण सभागृह त्या षड्जानं भरुन जातं. रागाच्या भावाला साद घालणारे, चैतन्यानं सळसळणारे, अचूक श्रुतिस्थाने सांभाळून श्रोत्यांशी जणू हितगुज करणारे सूर, अगणित मनोहारी स्वराकृतींनी नटलेली आलापी, लयीच्या हातात हात घालून येणारे व रागमूर्तीला सजवणारे बोलआलाप, विविध प्रकारच्या वेधक ताना हे सारे मोहून टाकणारे असते. रागाचे भावसौंदर्य 'या हृदयीचे त्या हृदयी' पोहोचवण्याची त्यांची किमया केवळ अजोड आहे.

श्रीमती किशोरी आमोणकर यांनी अव्याहत व्यासंग, दीर्घ साधना व मूलगामी चिंतन यातून आपला 'स्वरार्थरमणी' अर्थात् 'रागरससिध्दान्त' हा संगीतविषयक मौलिक ग्रंथ नुकताच प्रसिध्द केला आहे. स्वरभाषा, रागकाव्य, रागरीती, स्वरांचे स्वभाव, माध्यम, रागरसोत्पती, कलेचे प्रयोजन, रागाचे भावसौंदर्य अशा विविध विषयांवरचे त्यांचे विचार यात शब्दबध्द झाले आहेत. साधक-बाधक प्रतिपादनानंतर त्यांनी असा निष्कर्ष मांडला आहे की, 'भारताचे शास्त्रीय संगीत हे लोकरंजनापेक्षा, मनोरंजनापेक्षा आत्मरंजनासाठी आहे किंवा आत्मशोधासाठी, आत्मानंदासाठी आहे, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल.' संगीताचे अभ्यासक आणि रसिक यांच्या कलाविषयक जाणिवा समृध्द करण्यासाठी 'स्वरार्थरमणी' हा ग्रंथ निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

संगीतातील अपूर्व कामगिरीमुळे श्रीमती किशोरी आमोणकर यांना अनेक पुरस्कार व पारितोषिके मिळाली आहेत. त्यापैकी १९८५ मध्ये मिळालेले संगीत नाट्य अॅकॅडमी पारितोषिके मिळाली आहेत. त्यापैकी १९८५ मध्ये मिळालेले संगीत नाट्य अॅकॅडमी पारितोषिक, १९८७ मधील पद्मभूषण, १९९७ मधील संगीतसम्राज्ञी पारितोषिक व २००२ मधील पद्मविभूषण पुरस्कार विशेष उल्लेखनीय आहेत.

श्रीमती किशोरी आमोणकर यांना संगीत क्षेत्रातील असाधारण कर्तृत्वाबद्दल 'यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य-संस्कृति/कला, क्रिडा राज्यस्तरीय पारितोषिक २००९' देताना प्रतिष्ठानला विशेष आनंद होतो आहे.

मुंबई — शरद पवार

दिनांक : २५ नोव्हेबर २००९ — अध्यक्ष

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# नवमहाराष्ट्र युवा अभियान
## कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक श्री. विश्वास ठाकूर, संघटक श्री. निलेश राऊत हे पाहतात. तर कार्यालयीन संघटक म्हणून श्री. सुरेश पाटील व मिनल सावंत सहाय्यक म्हणून काम पाहतात.

अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य युवा धोरणाचा जाहीरनामा दि. ८ ऑगस्ट ०९ रोजी मा. मुख्यमंत्र्यांना मुंबई येथे सादर करण्यात आला. याकरिता या युवा धोरणात महाराष्ट्रातील युवांचा सहभाग असावा, या हेतूने राज्यभरात १२ युवा परिषदांचे आयोजन करण्यात आले होते.

**बुधवार दि. १८ फेब्रु. ०९**

या परिषदांमधील पहिली युवा परिषद (विषय :- महाराष्ट्र राज्य युवा धोरण : स्वरूप व आशय) पुणे येथे 'पूना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स' या संस्थेच्या सहकार्याने संपन्न झाली. या परिषदेचे उद्घाटन सिम्बॉयसेस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट या संस्थेचे संचालक डॉ. अरूण मुडबिद्री यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी डॉ. मुडबिद्री म्हणाले की, वर्तमान काळाला बरोबर घेत येणाऱ्या संकटाला सामोरे जाण्याचे बळ युवकांनी आपल्यामध्ये निर्माण करणे गरजेचे आहे, त्यासाठी वास्तवाकडे डोळसपणे बघण्याबरोबर त्यांनी स्वतःची ओळख निर्माण करणेही गरजेचे आहे. यावेळी अभियानाचे सहसंयोजक विश्वास ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. अन्वर शेख यांनी अध्यक्षीय समारोप केला. दिवसभराच्या या परिषदेमध्ये विचारमंथन गटाचे सादरीकरण संपन्न झाले. यामध्ये युवा धोरणातील उद्दिष्टे या विषयावर निलेश पुराडकर व भगवान केसभट यांनी, तर युवांची व्याख्या या विषयावर ॲड. असीम सरोदे, यांनी तसेच युवांची जबाबदारी या विषयावर प्रा. बी. ए. देशमुख तर युवांचे हक्क व कर्तव्य या विषयावर प्राचार्य नितीन घोरपडे यांनी सादरीकरण केले.

यानंतर महाराष्ट्रभरातून आलेल्या ४०० च्या वर विद्यार्थ्यांनी वरील विषयांनुसार आयोजित करण्यात आलेल्या गटचर्चेमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आणि वरील विषयांचा महाराष्ट्र राज्य युवा धोरणात कोणत्या मुद्द्यांना धरून समावेश असावा, या संदर्भात आपल्या सूचना व अभिप्राय सांगितले.

या परिषदेला समारोप प्रसंगी सकाळ समूहाचे कार्यकारी संचालक मा. अभिजीत पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हटले की, जागतिकीकरणाच्या गतिमानतेने बदलणाऱ्या काळात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक बदलांमध्ये सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र आणून सामाजिक सुरक्षितता जोपासण्याबरोबरच, ढासळती कुटुंब व्यवस्था, मूल्ये, यांची जपणूक करण्याची जबाबदारी युवकांनी स्विकारली पाहिजे. तरच प्रगतीचा विकासाचा आनंद आपल्याला उपभोगता येईल.

**इंडियन युथ डेव्हलपमेंट इंडेक्स माहिती कार्यशाळा विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) शनिवार, रविवार, दि. २१ व २२ मार्च ०९**

नॅशनल युथ फाऊंडेशन, युथ व्हाईसेस, लया या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने भारत सरकार (क्रीडा व युवक मंत्रालय) प्रस्तावित युथ डेव्हलपमेंट इंडेक्स यासंदर्भात माहितीकरिता एका महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन विशाखापट्टणम (अनकापल्ली) येथे करण्यात आले होते.

या कार्यशाळेस यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई. नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने अभियानाचे संघटक नीलेश राऊत उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये भारत सरकारने युवा मंत्रालयाच्या वतीने चेन्नई येथील राजीव गांधी राष्ट्रीय युवा संस्थेस देशाच्या युथ डेव्हलपमेंट इंडेक्सच्या उभारणीसंदर्भात आराखडा

तयार करण्यास सुचविलेले आहे. ही संस्था मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टिस) तसेच देशातील अन्य युवा संस्थांच्या मदतीने देशपातळीवर या आराखड्याला अंतिम रूप देण्याचे कार्य करीत आहे. या संदर्भात त्यांच्या पाच राज्यांमध्ये कन्सल्टिंग मिटिंग्ज संपन्न झालेल्या आहेत. त्यामध्ये देशातील नामवंत विचारवंतांनी सहभाग नोंदवून युथ डेव्हलपमेंट इंडेक्सची रचना कशी असावी, या संदर्भात आपले मत व्यक्त केले होते. याला अनुसरूनच राष्ट्रीय पातळीवर या निर्देशांकाचे निर्देशक काय आहेत, याची माहिती देशातील विविध राज्यांमध्ये युवां संदर्भात महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या संस्थांना मिळावी यासाठी सदरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत दोन्ही दिवस मा. प्रा. लता नारायण यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी इंडेक्स म्हणजे काय ? ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स, युथ डेव्हलपमेंट इंडेक्सची गरज, इंडेक्स ठरविण्याची रचना कशी केली गेली ? त्याचे निर्देशांक (इंडिकेटर्स) काय ? या संदर्भात विस्तृत पातळीवर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, केरळ, कर्नाटक, राजस्थान, तामिळनाडू या राज्यांमधील युवा संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**शुक्रवार, दि. १२ जून ०९** मुंबई येथे युवा धोरण माहिती परिषंदेचे आयोजन करण्यात आले. यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथील रंगस्वर सभागृहात ही परिषद सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत संपन्न झाली. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक खा. सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी मुक्त संवाद साधला. यावेळी महाराष्ट्र राज्य युवा धोरणासंदर्भात ठराव पारित करण्यात आला.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस ५० वर्षे पूर्ण होत असताना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या नावाने महाराष्ट्रात गेल्या पंचवीस वर्षापासून कार्यरत असलेल्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान या संस्थेतर्फे महाराष्ट्रातील युवांच्या विकासासंदर्भात महत्वाचा उपक्रम अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली हाती घेण्यात आलेला आहे. राज्य शासनाने अद्यापपर्यंत अधिकृत युवा धोरण जाहीर केलेले नसून शासनाने हे धोरण जाहीर करावे आणि महाराष्ट्रातील १३ ते ३५ वर्षे वयोगटातील युवा संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करावी, याकरिता अभियानातर्फे महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमाची सुरूवात करण्यात आलेली असून या अंतर्गत दि.१२ जानेवारी २०१० रोजी मुंबई येथे या संदर्भातील राज्याच्या युवा धोरणाचा आदर्शवत आराखडा व मसुदा प्रतिष्ठानतर्फे शासनाला सुपूर्द करण्यात येणार आहे.

विविध समविचारी संस्थांच्या सहकार्याने राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्याअंतर्गत कोअर कमिटी आणि ड्राफ्ट कमिटी गठित करण्यात आलेली आहे. परिषदेमध्ये अतुल देऊळगावकर, मॅथ्यू मट्टम, नीलेश पुराडकर यांनी राज्य धोरणाविषयी आराखड्यासंदर्भात मांडणी केली. महाराष्ट्रातील विभिन्न प्रदेशातून आलेल्या युवक-युवतींनी राज्य धोरणासंदर्भात मनोगत व्यक्त केली.

या परिषदेसाठी महाराष्ट्रातून सुमारे ३५० युवक-युवतींची उपस्थिती होती. प्रस्तावना नीलेश राऊत यांनी केली. सूत्रसंचालन महेंद्र रोकडे यांनी केले. उमाकांत जगदाळे यांनी आभार मानले.

यानंतर विधान भवनात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांशी शिष्टमंडळासह भेट घेऊन या संदर्भात मा. सुप्रिया सुळे यांनी युवा धोरण जाहीर करण्याच्या मागणीसंदर्भात निवेदन दिले. यावेळी मा.ना. मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी राज्य युवा धोरण जाहीर करण्यासंदर्भात सकारात्मक आश्वासन दिले. तसेच या सर्व धोरणांची अंमलबजावणी व जाहीर करण्याच्या प्रक्रियेत नवमहाराष्ट्र युवा अभियानास आमंत्रित केले. यावेळी पत्रकारांसोबत बोलताना मा. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ''नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे मागील सहा महिन्यांपासून आम्ही महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रम संपूर्ण राज्यभरात राबवत असून या प्रक्रियेमध्ये

महाराष्ट्रातील युवा संदर्भात कार्य करणाऱ्या २५ संस्था. संघटना सहभागी आहेत. यानंतर राज्य पातळीवर युवा परिषदा आयोजित करून तसेच महाराष्ट्रातील युवक-युवतींचे सर्वेक्षण करून या संदर्भातील अंतिम मसुदा दि. १२ जानेवारी २०१० रोजी मा. मुख्यमंत्र्यांना सादर केला जाईल,''

यावेळी शिष्टमंडळामध्ये अभियानाचे सहसंयोजक विश्वास ठाकूर, विजय कान्हेकर, दिनेश शिंदे, कोरोतर्फे महेंद्र रोकडे, युवातर्फे नीलेश पुराडकर, अमित सामंत यांची उपस्थिती होती.

**गुरूवार दि. २५ जून ०९** महाराष्ट्र राज्य युवा धोरण माहिती कार्यशाळा (यवतमाळ) सावित्री ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालयात पार पडलेल्या या कार्यशाळेसाठी मा. दत्ता बाळसराफ प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. नीलेश राऊत, मा. महेंद्र रोकडे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यशाळेच्या सुरूवातीला जिल्हा संघटक मा. मीनल जगताप यांनी प्रस्तावना केली. जिल्हा सहसंघटक मा. सीमा तेलंगे यांनी नवमहाराष्ट्र युवा अभियान व कार्यशाळेमागील भूमिका विषद केली. दुपारी १२ ते २.३० या वेळेत ही कार्यशाळा संपन्न झाली. मा. बाळसराफ यांनी उपस्थित युवांना नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या कार्याची ओळख करून दिली.

**गुरूवार, दि. २५ जून ०९** घाटंजी येथे तालुका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. रसिकाश्रय संस्था, फार्म हाऊस येथे पार पडलेल्या या कार्यशाळेसाठी डॉ. अमित नागरे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. राज्य संघटक नीलेश राऊत, जिल्हा संघटक मीनल जगताप, देवेंद्र गणवीर, महेश पवार यांची उपस्थिती होती.

कार्यशाळेच्या सुरूवातीला जिल्हा संघटक मा. मीनल जगताप यांनी प्रास्ताविक केले. नवमहाराष्ट्र युवा अभियानाची भूमिका व कार्याचे स्वरूप याविषयी डॉ. अमित नागरे यांनी उपस्थित युवांना माहिती करून दिली.

**शुक्रवार, दि. १० जुलै ०९** बुलडाणा येथे जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जिजामाता महाविद्यालय येथे पार पडलेल्या या कार्यशाळेसाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विचारमंचावर नरेंद्र लांजेवार, बुलडाणा जिल्हा संघटक नरेश शेळके, ॲड. दीपक पाटील, ज्योतीराव राऊत उपस्थित होते. कार्यशाळेच्या सुरूवातीला जिल्हा संघटक नरेश शेळके यांनी प्रास्ताविक केले. नीलेश राऊत यांनी युवा धोरण उपक्रमाबाबत मांडणी केली.

**शनिवार दि. ११ जुलै ०९** धुळे येथे जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विचारमंचावर धुळे जिल्हा संघटक अतुल कदमबांडे, प्रा. सुवर्णा शिंदे, व्ही. के. पाटील भदाणे मॅडम हे उपस्थित होते. कार्यशाळेच्या सुरूवातीला जिल्हा संघटक अतुल कदमबांडे यांनी प्रास्ताविक केले. नीलेश राऊत यांनी युवा धोरण उपक्रमाबाबत मांडणी केली. कार्यशाळेमध्ये सुमारे शंभर युवक-युवतींनी सहभाग नोंदविला.

**महाराष्ट्र राज्य युवा धोरण कार्यशाळा, लातूर**

युवक युवतीचे युवा धोरणाबाबत सुचना.

१) निवडणुकीतील ध्येय व धोरणे नंतरही अमलात आणावेत आणि युवा धोरणासंदर्भात राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यात उल्लेख असावा.

२) विद्यार्थ्यांचा इन्शुरन्स काढावा. व्यवसायासाठी विनाअट कर्ज द्यावे.

३) पुणे विद्यापीठासारखे अभ्यासक्रम नांदेड विद्यापीठात सुरू करावेत.

४) स्पर्धा परीक्षेचे निकाल लवकर लावावेत व त्यात पारदर्शकता आणावी. प्रत्येक तालुका स्तरावर स्पर्धा परीक्षा केंद्र असावी.

५) गुणवत्तेवर प्रवेश असावा.

६) भारताला आदर्श बनविण्यासाठी बालपणापासूनच प्रदर्शन, पिक शाळा, निसर्गशाळा राज्य व ग्रामीण स्तरावर निर्माण होणे आवश्यक आहे.

७) सामाजिक, आर्थिक प्रकल्प युवकांसाठी राबवावेत. युवांना स्थानिक, सामाजिक श्रम योजना आणाव्यात, श्रमाने कौशल्य, जागृती वाढेल.

८) तालुका स्तरावर करिअर मार्गदर्शन केंद्र असावेत. महाराष्ट्रात क्रिडा विद्यापीठ असावे, प्रत्येक विभागात युवा परिषदा घ्याव्यात. महिला बचत गटासारखे युवकांना आर्थिक स्थैर्य द्यावे.

**दि. १४-०७-०९** लॉ कॉलेज, उस्मानाबाद येथे जिल्हा कार्यशाळा सकाळी ११.३० ते ३.३० या वेळेत संपन्न झाली. या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे मा. सौ. वैशालीताई मोटे, निरीक्षक श्री. दिनेश शिंदे, प्रमुख वक्ते प्रा. ए. डी. जाधव सर, जिल्हा संघटक ॲड. विवेक घोगरे व प्रा. एस. एम. देशमुख सर उपस्थित होते. कार्यशाळेच्या प्रारंभी अभियानाचे जिल्हा संघटक ॲड. विवेक घोगरे यांनी प्रस्ताविकेतून युवा कार्यशाळेचा उद्देश विशद करून सांगितला, त्या संकल्पनेनुसारच उस्मानाबाद जिल्ह्यातील तरुणांच्या प्रश्नांचा अंतरभाव या धोरणात असावा अशी भुमिका देखील ॲड. विवेक घोगरे यांनी मांडली. प्रा. ए. डी. जाधव यांनी युवांना मार्गदर्शन करताना यशवंतराव चव्हाणांची दूरदृष्टी, वैचारीक व्यापकता व आधुनिक महाराष्ट्र बनवण्यासाठी घेतलेले कष्ट व राज्याच्या विविध विषयांच्या सोडवणुकीसाठी यशवंतराव चव्हाणांची भूमिका किती व्यापक स्वरूपाची होती या विषयाचे विस्तृत मार्गदर्शन केले. युवांच्या भविष्यातील व्यापक दृष्टिकोन कसा असावा व यांचे गांभीर्याने युवांनी चिंतन कसे करावे याबाबत देखील उदाहरणासह बहुमोल मार्गदर्शन केले. युवा अभियानाच्या राज्य विशेष निमंत्रित सदस्या मा. सौ. वैशालीताई मोटे यांनी युवा धोरण कसे असावे आणि त्यात तरुणांची भूमिका काय व महिलांच्या दृष्टिकोनातून या धोरणाचे महत्व या विषयावर आपले विचार मांडताना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. परंतु आज ही राज्याला युवा धोरण नसल्याने नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक खा. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा धोरण जाहीरनामा तयार करण्याचे काम राज्यभर सुरू असून, राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यातील युवांच्या प्रश्नांचा व सूचनांचा समावेश या धोरणात असावा. युवांनीच युवा धोरण करण्यासाठी पुढे यावे, अशी खा. सुप्रिया सुळे यांची संकल्पना असून त्याचाच भाग म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर उपस्थित सर्व युवक व युवतींशी खुला संवाद साधण्यात आला. युवा धोरणाची गरज काय, व्यसनमुक्त युवा, कृषीकडे पाहण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन, दारूबंदी, बेरोजगारी, शिक्षणातील अनेक अडचणी अशा विविध विषयांवर युवांनी प्रखरपणे चर्चा करून खुल्या संवादाद्वारे याचे विश्लेषण देखील केले. यामध्ये मुलींचे प्रमाण देखील अधिक होते जवळ-जवळ अडीच तास खुल्या चर्चेतून युवांनी ही कार्यशाळा यशस्वी केली. सदरच्या खुल्या संवादात युवांशी चर्चेतून श्री. दिनेश शिंदे यांनी काही प्रश्नांचा खुलासा करीत, काही महत्वाचे प्रश्न या धोरणात सामावून घेतले जातील असे सांगितले. या कार्यशाळेत जिल्ह्यातील सुमारे २०० युवांची उपस्थिती होती.

**राज्य युवा धोरण प्राथमिक मसुदा जाहीरनामा कार्यक्रम शनिवार दि. ८ ऑगस्ट ०९ रोजी** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभागृहामध्ये राज्य युवा धोरण प्राथमिक मसुदा जाहीरनामा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री मा. ना. छगन भुजबळ, मा. सुप्रिया सुळे, विशेष अतिथी क्रिडा व युवक कल्याण राज्यमंत्री डॉ. सतीश पाटील, अध्यक्षस्थानी हुसेन दलवाई, शरद काळे, प्रवीण पाटील (विशेष कार्यालय अधिकारी, भारत सरकार) यांच्यासह ड्राफ्ट कोअर टीमचे सदस्य मंचावर उपस्थित होते.

यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा शासनाला समारंभपूर्वक सादर करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना मा. छगन भुजबळ म्हणाले, प्रस्तावित महाराष्ट्र राज्य युवा धोरणाचा मसुदा सादर करून चालणार नाही, तर त्याला व्यापक आंदोलनाची जोड द्यावी लागेल. विविध वाहिन्यांवरून दैववाद व अंधश्रद्धा पसरविणाऱ्या मालिका दाखविल्या जात आहेत. त्यामुळे युवा पिढी भरकटत चालली आहे. युवा पिढीमध्ये विज्ञानवादाचा प्रसार करण्यासाठी युवा धोरणातून प्रयत्न झाले पाहिजेत. तरच भारत देशाचे महासत्ता बनण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल. राज्यात आजपर्यंत युवा धोरण नव्हते. ते आता होत आहे, ही चांगली बाब आहे. त्यामुळे सरकारच्या युवांसाठी असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होऊ शकेल. राज्यातील जवळपास अर्धी लोकसंख्या युवांची असताना त्यांच्यासाठी धोरण असणे ही काळाची गरज बनली आहे आणि ही गरज ओळखून सरकार या संदर्भात नक्कीच कार्यवाही करेल. युवक कल्याण राज्यमंत्री मा. ना. डॉ. सतीश पाटील म्हणाले की, युवांच्या धोरणासंदर्भात शासन सकारात्मक आहे. विशेषतः रोजगार व शिक्षण या संदर्भात युवांचे अनेक प्रश्न असून त्यांच्या सोडवणुकीसाठी स्वतंत्र युवा धोरण असणे गरजेचे बनलेले आहे. त्यासाठी सरकार त्याची निश्चितच अंमलबजावणी करेल.

मा. सुप्रिया सुळे यांनी युवा धोरण जाहीरनामा उपक्रमामागील भूमिका मांडली. त्या म्हणाल्या, युवांमध्ये प्रचंड शक्ती व ऊर्जा असते. ती विधायक मार्गी लागली नाही, तर त्यातून समाजविघातक कृत्यांना चालना मिळते. त्यासाठी युवांच्या गरजा व समस्या ओळखून त्यांच्या विकासासाठी शासनाकडून प्रयत्न झाले पाहिजेत. यासाठी युवा धोरण तयार करण्यात येत आहे. शहरी व ग्रामीण युवांमधील असणारी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय दरी कमी करण्याचा प्रयत्न याद्वारे आम्ही करण्याचा प्रयत्न करीत आहोत. राष्ट्रीय युवा दिनी म्हणजे १२ जानेवारी २०१० रोजी राज्य युवा धोरणाचा अंतिम मसुदा शासनास सादर करण्याचा मानस त्यांनी यावेळी बोलून दाखविला. यावेळी हुसेन दलवाई, शरद काळे यांचीही भाषणे झाली. युवा धोरण जाहीरनाम्यांतर्गत गठित करण्यात आलेल्या ड्राफ्ट कोअर टीममधील मा. नीलेश पुराडकर, मा.प्रा. लता नारायण, मा. मॅथ्यू मट्टम, मा. आर. आर. शिंदे, मा. दत्ता बाळसराफ, मा. विश्वास ठाकूर, मा. कौस्तुभ देवळे, मा. महेंद्र रोकडे यांचा यावेळी मा.ना. भुजबळ व मा.ना. सतीश पाटील यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. नीलेश राऊत यांनी केले. मा. नीलेश पुराडकर यांनी प्रास्ताविक केले. मा. सुषमा खिल्लारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला यवतमाळच्या चमूने युवा धोरणाची मागणी करणारे पथनाट्य सादर केले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचे सिंहावलोकन करणारी चित्रफित यावेळी दर्शविण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमानंतर अभियानातर्फे तयार करण्यात आलेला राज्य युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री मा. ना. अशोक चव्हाण यांना त्यांच्या निवासस्थानी सादर करण्यात आला. यावेळी शिष्टमंडळातील सदस्य नीलेश राऊत, उमाकांत जगदाळे, अभिजित राऊत, नितीन काळेल, डॉ. अमित नागरे, सुषमा खिल्लारे उपस्थित होते. राज्य शासनाने युवा धोरण जाहीर करावे, अशी विनंती मा. सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. राज्याचे आदर्श युवा धोरण कसे असावे, या संदर्भात नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे हा प्राथमिक मसुदा तयार करण्यात आलेला आहे. त्यात आवश्यक सूचना व शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. सरकारने याचा विचार करून युवा धोरण जाहीर करावे, असे मा. सुप्रिया सुळे म्हणाल्या. प्राथमिक मसुद्यातील शिफारशींचा अभ्यास करून त्या संदर्भात विविध

पातळ्यांवर त्याची अमंलबजावणी कशी करता येईल, याचा विचार शासन नकीच करेल, असे आश्वासन मा. अशोक चव्हाण यांनी दिले.

**महाराष्ट्र राज्य युवा धोरण रविवार दि. १२ जुलै ०९**

नंदुरबार (धडगाव) येथे जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विचारमंचावर नंदुरबार जिल्हा संघटक विक्रांत मोरे व स्थानिक शिक्षक उपस्थित होते. ही कार्यशाळा दुर्गम आदिवासी भागात असल्यामुळे उपस्थित सर्व युवा आदिवासी होते. कार्यशाळेच्या सुरुवातीला जिल्हा संघटक विक्रांत मोरे यांनी प्रास्ताविक केले. नीलेश राऊत यांनी युवा धोरण उपक्रमाबाबत मांडणी केली.

**नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पिनॅकल क्लब**

नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि ''पिनॅकल क्लब'' यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल ते ऑगस्ट २००९ दरम्यान गिर्यारोहणाचे कार्यक्रम राबविण्यात आले. फेब्रुवारी २००९ या महिन्यात कान्हेरीगुंफा येथे प्रस्तरारोहण शिबिर आणि कोकण पद्भ्रमण मोहीम-४ आयोजित करण्यात आली होती. या दोन्ही कार्यक्रमात एकूण ३९ गिर्यारोहक सहभागी झाले होते. मार्च महिन्यात तेलबैला, वाघेरा, यवरौली, सोनागिरी आणि हरिश्चंद्रगड यात एकूण ४४ गिर्यारोहक सहभागी झाले होते. एप्रिल २००९ या महिन्यात अर्नाळा किल्ला आणि माथेरान येथे दोन तसेच मे महिन्यात एक असे एकूण तीन साहस शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वय वर्षे ८ ते १५ या वयोगटाच्या एकूण १२८ बाल गिर्यारोहकांनी याचा लाभ घेतला. या शिबीरामध्ये प्रस्तारारोहण, प्रस्तारावतरण, झुमरिंग, दोऱ्यांच्या गाठी, तंबू उभारणे, रिव्हर क्रासिंग, जंगल कुकींग, अश्वारोहण यांच्या बद्दल माहिती आणि प्रत्यक्ष सराव करून घेण्यात आला. तसेच निसर्ग, झाडे, फुले, पशु-पक्षी यांच्या बद्दल माहिती करून देण्यात आली. प्रत्येक शिबिर तीन दिवसांचे होते. मे महिन्यांत अलिबाग किल्ला, केळवे येथील तीन किल्ले, जून महिन्यात कुणकेश्वर, बेडसे गुहा, जुलै महिन्यात नंदकेश्वर ते वैतरणा, वैभव रामेश्वर (पाली) ते नागोठणे, रामराज (अलिबाग), ऑगस्ट महिन्यात रूपगड, सोनगड (डांग गुजरात), देवाचा डोंगर (महाड) असे गिरिभ्रमणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा लाभ एकूण ११७ गिर्यारोहकांनी घेतला. संस्थेचे सदस्य श्री. पीटर डिसोजा आणि श्री. विजय शहा यांनी कॅन्सर पेशंटसाठी प्लेटलेट्स दान केले तसेच श्री. राजेश वरळीकर, श्री. महेश कांबळे, प्रमोद पवार यांनी गरजूंना रक्तदान केले. वरील सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. दत्ता बाळसराफ, श्री. सुरेश पाटील, श्री. संतोष कल्याणपूर, श्री. सचिन आयरे, श्री. राजेश वरळीकर आणि श्री. विजय शहा यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

तख्त कोणा एका व्यक्तीचे नाही, कोणा एका धर्माचे नाही, कोणा एका वर्गाचे नाही. ते या देशातल्या चाळीस-पंचेचाळीस कोटी लोकांचे आहे आणि त्याचे रक्षण करणे तुमचे-आमचे कर्तव्य आहे. तुमचे-आमचे हे तख्त जोपर्यंत चंद्रसूर्य उगवत राहतील तोपर्यंत कायम राहिले पाहिजे, कारण ते आमच्या स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे प्रतीक आहे. अशा तऱ्हेची देशभक्तीची भावना आपल्या मनात फुलली पाहिजे.

**स्व. यशवंतराव चव्हाण**

# अपंग हक्क विकास मंच
## कार्यवृत्त

अपंगांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाचे समन्वयक विजय कान्हेकर हे मंचाचे काम पाहतात. कार्यालयीन संघटक म्हणून शमीम ख़ान हे काम पाहतात. महाराष्ट्रातील अपंग व्यक्ती, संस्था, संघटना यांच्यासाठी शासन दरबारी, मंचाने समन्वयक म्हणून विविध प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रालय पातळीवर बैठका संपन्न केल्या. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रश्नांचा पाठपुरावा चालू असताना प्रलंबित एकूण सहा शासननिर्णय काढण्यात मंचाला यश मिळाले आहे. त्यामध्ये अंध अपंगांसाठी वाचन भत्ता, संस्थांचे घरभाडे, कर्मचाऱ्यांची रजा-प्रवास सवलत, अपंग गुणवत्ता कामगार पुरस्कार हे चार शासन निर्णय शासनाने दिनांक १९ मे २००९ रोजी काढले आहेत. त्यानंतर पुन्हा वेळोवेळी मंत्रालयात बैठका घेऊन राज्यातील मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती योजना लागू करणेबाबतचे दोन शासन निर्णय दिनांक १३ ऑगस्ट २००९ रोजी काढण्यात आले आहेत.

दिनांक १२ एप्रिल २००९ रोजी अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा व युवा विकास मंडळ यांच्या सहकार्याने विराटनगर मैदान, विरार येथे फिजिकली चॅलेंज कप २००९ साठी अस्थिव्यंग अपंग व्यक्तींची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली. सदर कार्यक्रमात युवा विकास मंडळाचे कार्याध्यक्ष सिद्धार्थ ठाकूर यांच्या हस्ते विजेता संघ व उपविजेता संघ यांना चषक आणि बक्षिस देऊन सम्मानित करण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांना विशेष बक्षिस देऊन सम्मानित करण्यात आले. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व अपंग व्यक्तींना प्रशस्ती प्रमाणपत्र देण्यात आली. सदर कार्यक्रमास मंचाचे अनिल चाळके तसेच मंचाचे कार्यालयीन संघटक शमीम खान उपस्थित होते.

दिनांक १८ जून २००९ जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, घाटी, औरंगाबाद येथे अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजिका मा. सुप्रिया सुळे यांचे हस्ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय वाघमारे, विभागीय केंद्राचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत अपंग लाभार्थ्यांना तीन चाकी सायकल, जयपूर फुट, कुबड्या, श्रवणयंत्र आदि साहित्य वाटप करण्यात आले.

दिनांक २३ जून २००९ नागपूर येथे अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजिका मा. सुप्रिया सुळे यांचे हस्ते आणि विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. गिरीष गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत एकूण दहा (१०) अपंग लाभार्थ्यांना तीन चाकी सायकलींचे वाटप करण्यात आले.

लोकशाही यंत्रणा तयार करणाऱ्या तज्ज्ञ मंडळींनी राजकीय सत्तेवर कायद्याची आणि इतर बंधने घालून ती सत्ता समतोल करून ठेवली आहे, परंतु आर्थिक सत्ता ही राजकीय सत्तेपेक्षाही अधिक शक्तिमान आहे. सत्ता हे शेवटी सर्वात मोठे सामर्थ्य आहे. मग ती सत्ता राजकीय असो अगर आर्थिक असो, आणि म्हणून सत्तेचे स्थान हे लोकांच्या कल्याणासाठी उभारलेली एक वेदी आहे, एक यंत्रणा आहे. ते एक मोठे जोखमीचे काम आहे, ही जाणीव सतत आपल्या मनात असली पाहिजे. यासाठी एकच मार्ग आहे आणि तो हा की, आपले हे काम लोकशाहीच्या पद्धतीने चालले आहे की नाही याचे कठोर आत्मनिरीक्षण नित्य झाले पाहिजे.

**स्व. यशवंतराव चव्हाण**

## शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने शिक्षणविषयक कार्यासाठी शिक्षण विकास मंचाची स्थापना केली असून गेल्या तीन वर्षापासून हा मंच कार्यरत आहे. मा. सुप्रिया सुळे या शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक म्हणून, तर राज्यात व केंद्रात शिक्षण विभागाच्या सचिव पदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळलेल्या व शिक्षण क्षेत्रात मानाचे स्थान असलेल्या डॉ. कुमुद बन्सल या प्रमुख संयोजक म्हणून या कार्याची जबाबदारी पाहतात. डॉ. वसंत काळपांडे हे विशेष सल्लागार, दत्ता बाळसराफ हे संयोजक, तर सुरेश पाटील सहसमन्वयक म्हणून मदत करतात. शिक्षण विकास मंचाच्या कार्यात वेळोवेळी राज्यातील शिक्षण क्षेत्रातील तज्ञांची मदत घेण्यात येते.

**गुरूवार दि. १८ जून २००९ :**

**मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता : औरंगाबाद येथील विभागीय कार्यशाळा**

दिनांक ११ सप्टेंबर, २००९ रोजी मुंबई येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता विकास कार्यक्रमावर एक कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत अनेक महत्त्वाच्या शिफारशी करण्यात आल्या असून त्या महाराष्ट्र शासनाला पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या. या कार्यशाळेत विषयनिहाय आणि विभागनिहाय काही कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात अशीही शिफारस करण्यात आली. याच शिफारशीचा एक भाग म्हणून मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता या विषयावर एक कार्यशाळा औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली होती.

१९५६ मध्ये मराठवाडा त्यावेळच्या मुंबई राज्यात आणि त्यानंतर १९६० मध्ये आजच्या महाराष्ट्र राज्यात आला. असे असले तरी मराठवाड्याचे इतर विभागांपेक्षा काही वेगळे प्रश्न आजही अस्तित्वात आहेत. ऑपरेशन ब्लॅकबोर्ड, १९९२ चा महाराष्ट्र शासनाने अंमलात आणलेला प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठीचा कृतिकार्यक्रम, जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम, सर्व शिक्षा अभियान या कार्यक्रमांमुळे प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात बरीच प्रगती झाली आहे. परंतु अजूनही या क्षेत्रात अनेक बाबतीत भरीव प्रयत्न करण्याची गरज आहे.

मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या गळतीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. प्राथमिक शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या या गुणवत्तेचा प्रश्नही गंभीर आहे. विद्यार्थ्यांची गळती आणि गुणवत्ता याचा विचार करताना मुलींच्या शिक्षणाचा वेगळा विचार करणे आवश्यक आहे. मराठवाड्यात ऊसतोडणीसाठी स्थलांतर करणाऱ्या कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नाकडेही विशेष लक्ष देण्याची गरज आहे. मराठवाड्यात अल्पसंख्याकांचे प्रमाण बरेच जास्त आहे. त्यांच्या शिक्षणाचाही स्वतंत्र विचार करण्याची गरज आहे. मदरशामध्ये देण्यात येणाऱ्या शिक्षणात गणित, विज्ञान आणि इतर विषयांचाही समावेश होऊन त्यांचे आधुनिकीकरण होण्याची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा गुरूवार दि. १८ जून २००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली होती.

या कार्यशाळेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती :-

१. मराठवाड्यातील प्राथमिक शाळांधील विद्यार्थ्यांची गळती कमी करण्यासाठी आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेऊन ती शून्यावर आणण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

२. मराठवाड्यातील प्राथमिक शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांची आढावा घेऊन तो वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३. मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणात मुलींचा सहभाग वाढवण्यासाठी आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांचा आढावा तो क्रमांक १ व २ वरील उदिदष्टांच्या संदर्भात वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

४. मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणात स्थलांतरीत कामगारांच्या मुलांचा सहभाग वाढविण्यासाठी आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांचा आढावा तो क्रमांक १ व २ वरील उदिदष्टांच्या संदर्भात वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे आणि मराठवाड्यातील अल्पसंख्याक गटांतील मुलांच्या शिक्षणाच्या सद्यःस्थितीचा आढावा घेऊन सध्याची व्यवस्था अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे.

या कार्यशाळेसाठीचे स्वागत आणि प्रास्ताविक शिक्षण विकास मंचाच्या संयोजक माजी शिक्षण सचिव डॉ. कुमुद बन्सल यांनी केले. शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रियाताई सुळे यांनी उद्घाटनपर भाषण केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष ज्येष्ठ शिक्षण तज्ञ तसेच राज्याचे माजी शिक्षण संचालक श्री. वि.वि. चिपळूणकर हे होते. त्यांनी सर्व प्रमुख उपस्थितांना सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्तेच्या अनुषंगाने मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र औरंगाबादचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल, कोषाध्यक्ष श्री. सचिन मुळे, औरंगाबादचे विभागीय शिक्षण उपसंचालक श्री. चौहाण, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे संचालक श्री. अ.मु. बेडगे, मा. आमदार श्री. सतिश चव्हाण, मा. आमदार श्री. विक्रम काळे इ. प्रमुख मान्यवर या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. अनेक शिक्षण अधिकारी, शिक्षण तज्ञ, पत्रकार तसेच शिक्षण विषयक आस्था असणारे विद्यार्थी, कार्यकर्ते असे एकूण ३०० ते ३५० मान्यवर या कार्यशाळेस उपस्थित होते. या कार्यशाळेचे आभार प्रदर्शन शिक्षण विकास मंचाचे सल्लागार डॉ. वसंत काळपांडे यांनी मानले.

**दि. २३ जून २००९ : विदर्भातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता : नागपूर येथील विभागीय कार्यशाळा**

१९५६ मध्ये जुन्या मध्य प्रांत व वऱ्हाडमधून त्यावेळच्या मुंबई राज्यात आणि त्यानंतर १९६० मध्ये आजच्या महाराष्ट्र राज्यात आला. असे असले तरी विदर्भाचे इतर विभागांपेक्षा काहीवेगळे प्रश्न आजही अस्तित्वात आहेत. ऑपरेशन ब्लॅकबोर्ड, १९९२ चा महाराष्ट्र शासनाने अंमलात आणलेला प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठीचा कृतिकार्यक्रम, गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी, यवतमाळ आणि चंद्रपूर या दोन जिल्ह्यामध्ये युनिसेफने अंमलात आणलेला पीप प्रकल्प, सर्व शिक्षा अभियान या कार्यक्रमांमुळे विदर्भातील प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात बरीच प्रगती झाली आहे. परंतु अजूनही या क्षेत्रात अनेक बाबतीत भरीव प्रयत्न करण्याची गरज आहे.

विदर्भातील प्राथमिक शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या गुणवत्तेचा प्रश्न गंभीर आहे. याचे परिणाम माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांपर्यंत टिकून राहिल्याचे दिसून येते. नागपूर आणि अमरावती विभागीय मंडळांचे इयत्ता १० वी आणि १२ वीच्या सार्वजनिक परीक्षांचे निकाल राज्यात इतर विभागीय मंडळांच्या तुलनेत सर्वात कमी लागतात. याचा परिणाम इयत्या १० वी / १२वी नंतर ज्या-ज्या अभ्यासक्रमांना राज्यस्तरावर गुणवत्तेच्या आधारे प्रवेश दिले जातात त्या त्या ठिकाणी विदर्भातील विद्यार्थी माग पाडतात.

विदर्भात गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये आदिवासींचे प्रमाण बरेच जास्त आहे. भंडारा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्येही आदिवासींचे प्रमाण लक्षणीय आहे. आदिवासींची बोलीभाषा, त्यांची सांस्कृतिक, सामाजिक, भौगोलिक आणि आर्थिक पाश्वभूमी विचारात घेतल्याशिवाय त्यांच्यासाठीची अध्ययन-अध्यापन प्रक्रिया परिणामकारक होऊ शकत नाही आदिवासी विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते आणि त्यांच्या गुणवत्तेवरही विपरीत परिणाम होतो. आश्रमशाळांचा, तसेच आदिवासी क्षेत्रात शिकवणाऱ्या शिक्षकांचाही (प्रशिक्षण, सेवाशर्ती, शैक्षणिक अर्हतता इ. बाबतीत) या संदर्भात विचार होणे गरजेचे आहे.

विदर्भातील प्राथमिक शाळांमध्ये ऑपरेशन ब्लॅकबोर्ड, सर्व शिक्षा अभियान, राज्य शासनाच्या विविध योजना यामुळे उपलब्ध साधन-सुविधांबाबत खूपच सुधारणा झाली आहे. तरीही शाळांच्या इमारती, वर्गखोल्या, त्यांची देखभाल व दुरूस्ती, खेळाची मैदाने, प्रयोगशाळा, ग्रंथालये, इतर शैक्षणिक सुविधा या पुरेशा प्रमाणात आणि दर्जेदार कशा उपलब्ध करून देता येतील याचा विचार

करणे गरजेचे आहे. शासनाकडून शालेय पोषण आहार, मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश इ. सुविधा उपलब्ध होतात. त्या विद्यार्थ्यांपर्यंत वेळेवर कशा पोहचतील याचा विचार करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर येथे मंगळवार दि. २३ जून २००९ रोजी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठीचे स्वागत आणि प्रास्ताविक शिक्षण विकास मंचाच्या संयोजक माजी शिक्षण सचिव डॉ. कुमुद बन्सल यांनी केले. शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रियाताई सुळे यांनी उदघाटनपर भाषण केले. या कार्यशाळेसाठी प्रमुख अतिथी म्हणून विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. गिरीष गांधी हे होते. राज्याचे माजी शिक्षण मंत्री मा. वसंत पुरके यांनी यावेळेला मोलाचे मार्गदर्शन केले. नागपूर विभागीय केंद्राचे शिक्षण उपसंचालक श्री. गोविंद नांदेडे, विभागीय केंद्र अमरावतीचे शिक्षण उपसंचालक श्री. लक्ष्मीकांत पांडे, माजी शिक्षण संचालक श्री. देऊस्कर यांनीही यावेळेला विदर्भातील प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तावर आपले विचार मांडले. शिक्षण विकास मंचाचे सल्लागार डॉ. वसंत काळपांडे यांनी यावेळी आभार मानले. समन्वयक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. सुरेश पाटील तसेच इतर प्रमुख मान्यवर या कार्यशाळेस उपस्थित होते. या काळेशाळेसाठी २५० ते ३०० मान्यवर उपस्थित होते.

**प्रस्ताविक कार्यक्रम : विस्तार सेवा –**

या प्रस्तावित कार्यक्रमात सुरूवातीच्या टप्पयात १० जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा दत्तक घेण्याचा विचार असून या शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळा आणि ग्रंथालये यांचा विकास करण्यावर भर देण्यात येईल.

राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी अनेक योजना हाती घेतल्या असून त्यासाटी पुरेसा निधीही उपलब्ध करून दिला आहे. या योजनांची शाळांच्या योग्य रितीने अंमलबजावणी होत असल्याची खात्री करून घेणे, अंमलबजावणीशी संबंधित असणारी शालेय शिक्षण विभागाची विविध कार्यालये आणि शासनाचे इतर संबंधित विभाग यांचा परस्पर संबंध प्रभावी असणे या बाबींकडेही या कार्यक्रमाखाली विशेष लक्ष येईल. या शाळांच्या प्रगतीचा सातत्याने आढावा घेऊन अपेक्षित पातळी गाठण्यात काही अडथळे येत असतील तर स्वयंसेवी संस्था शालेय शिक्षण विभागाची विविध कार्यालये शासनाचे इतर संबंधित विभाग राज्यातील उदयोग यांचे गरजेनुसार सहकार्य घेऊन हे अडथळे दूर करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानामार्फत प्रयत्न करण्यात येतील.

धर्म हा व्यक्ती आणि परमेश्वर यांच्यामधला संबंध आहे. हिंदू आपल्या मंदिरात परमेश्वराला आळविण्याचा प्रयत्न करतो, तर मुसलमान आपल्या मशिदीत अल्लाशी संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. ख्रिस्ती आपल्या चर्चमध्ये परमेश्वराला हाक मारतो, तर शीख गुरूद्वारामध्ये परमेश्वराची प्रार्थना करतो. परंतु हे सर्व संपल्यानंतर, मंदिरातून, मशिदीतून, गुरूद्वारातून किंवा चर्चमधून जो माणूस बाहेर पडतो तो हिंदू नाही, मुसलमान नाही, शीख नाही आणि ख्रिस्ती नाही, तो फक्त भारतीय आहे ही भावना आपल्या मनात रूजली पाहिजे.

**स्व. यशवंतराव चव्हाण**

# यशस्विनी अभियान
# कार्यवृत्त

**व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा**

**मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २००९ :** सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट व यशस्विनी अभियान यांच्यात सामंजस्य करार झालेला असून मु.पो. लव्हाळे, ता. मुळशी. जि. पुणे येथे एक दिवसीय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ह्यात महाराष्ट्रातील विविध भागातील राज्यस्तरीय, विभागीय, जिल्हा तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या जिल्ह्यातील तालुका समन्वयकांनी सहभाग नोंदवला. या कार्यशाळेचे उद्घाटन मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सिम्बायोसिसच्या प्राचार्य तथा संचालक डॉ. विद्या येरवडेकर, सिम्बायोसिसचे संचालक डॉ. अरूण मुडबिद्री, प्रा. नीता जोशी, प्रा. संगिता डोके, डॉ. राहुल जोशी यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी बोलतांना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, बचत गट महिलांच्या वस्तूंना, पदार्थांना कॉर्पोरेट बाजारपेठ मिळण्याबरोबरच तिच्या कर्तृत्वाला व्यापक अवकाश, दिशा मिळावी हाच कार्यशाळा आयोजना मागचा हेतू आहे. डॉ. विद्या येरवडेकर म्हणाल्या की, सिम्बायोसिस बचत गटांच्या माध्यमातून पब्लिक सेक्टरमध्ये काम करण्यात यशस्वी होत आहे. बचत गटांचा सकारात्मक प्रतिसाद हीच आमची ऊर्जा आहे.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात प्रा. संगिता डोके यांनी बचत गटांच्या प्रशिक्षणाचे नेमके स्वरूप आणि त्यात महिलांचा सक्रीय संबंध यांचे महत्त्व विशद केले व यासाठी व्यवस्थापनातील कुठल्या घटकांचा उपयोग करता येईल याची माहिती दिली. डॉ. अरूण मुडबिद्री यांनी सांगितले की, कुठल्याही क्षेत्रात काम करत असतांना लागणारी कार्यक्षमता, स्वप्न पाहण्याची वृत्ती, संघभावना म्हणजेच यशस्वी होण्याची गुरुकिल्ली यांची सांगड घालावी व विविध क्षेत्रात यशस्वी व्यक्तिमत्वांचा परिचय आणि त्यांच्या यशाचे गमक यांचाही शोध घेतला पाहिजे.

शेवटच्या सत्रात 'म्युझिक क्लिनिक' हा अभिनव कार्यक्रम डॉ. राहुल जोशी यांनी सादर केला. त्यात त्यांनी 'स्वर संवेदना' हा विषय घेऊन संगीताचा मनावर, शरीरावर नेमका काय परिणाम होतो हे सप्रयोग स्पष्ट केले. संगीतातल्या सात सुरांनी आयुष्य, मानसिक आरोग्य कसं सुदंर करता येते, स्वरांमधून मिळणारे निरंतर सुख, ह्यातून मिळणारी ऊर्जा याची स्वरमय मांडणी केली. महिलांशी संवाद साधत कार्यक्रमाची रंगतही वाढवली.

संगीतातून स्वास्थ्य किती प्रभावीपणे मिळवता येते याचाच हा प्रयोग होता. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सिम्बॉयसिसच्या शितल पुरंदरे, अलोक चित्रे, विजय ढोके, केदार रावणगावे, अनुजा कानडे, विश्वजीत पाटील आदींनी परिश्रम घेतले.

**सेल्फ कॉन्फिडन्स ॲण्ड ट्रस्ट प्रशिक्षण**

**शुक्रवार, २२ मे २००९ ते रविवार, २४ मे २००९** यशस्विनी सामाजिक अभियान व सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे यांच्यात सामंजस्य करार झालेला आहे. या माध्यमातूनच सिम्बॉयसिस नॉलेज व्हीलेज, ग्राम लव्हाळे, ता. मुळशी, जि. पुणे येथे यशस्विनी अभियानाच्या महिलांसाठी 'सेल्फ कॉन्फिडन्स ॲण्ड ट्रस्ट' या विषयावर प्रशिक्षण आयोजित केले होते. यात महिलांसाठी आऊटडोअर गेम्स, नेचर वॉक, मोटिव्हेशन कॅप्सुल व कॅम्प फायर, ट्रेक ॲण्ड ट्रेसर हॅट, जोहारी विंडो सारख्या खेळातून, व्याख्यानातून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रशिक्षण देण्यात

आले. त्यात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यशस्विनीच्या वाटचालीला बळ देणारा निश्चितच ठरेल. तीन दिवसाच्या शिबिरात खेळाच्या माध्यमातून आत्मविश्वास व व्यक्तिमत्व वाढीवर भर देण्यात आला. टीम वर्क, एकमेकांमधील समन्वय वाढीसाठी निरनिराळ्या आव्हानात्मक खेळांचा उपयोग करण्यात आला. त्यासाठी चांगला प्रतिसाद मिळाला. 'विन-विन' सारख्या खेळातून समजून घेण्याची क्षमता सकारात्मक विचार याचा पाठ मिळाला. 'अॅसीड वॉक' खेळातून कमीतकमी साधनांतून परिस्थितीतून मार्ग काढण्याचा मंत्र मिळाला. 'शेळी व मेंढपाळ' खेळातून मार्गदर्शकाची जबाबदारी आणि संघभावना याविषयी माहिती दिली गेली. सूचनांचे पालन म्हणजे काय ? याचाच हा परिपाठ होता. समोरच्या व्यक्तीच्या देहबोलीचे आकलन याचीच ही ओळख होती. 'आईस ब्रेकींग' मधून समोरच्या व्यक्ती बद्दलच्या सकारात्मक गुणाचा शोध घेण्याचा प्रयत्न मिळाला. 'नेचर वॉक' मधून निसर्गाशी नातं जोडा, असा मंत्र दिला गेला. 'मोटीव्हेशन कॅप्सूल' मधून अंगभूत प्रेरणा आणि त्याचा शोध घेण्याची क्षमता यांचाच वस्तुपाठ होता. 'कॅम्प फायर' मधून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील नाट्यगुण, कलागुणांना व्यासपीठ मिळाले. समारोपाप्रसंगी सहभागी समन्वयकांनी आपली मते व्यक्त केली. तसेच सहभागी महिलांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी सिम्बॉयसिसच्या प्रा. संगिता डोके म्हणाल्या की, तीन दिवसातील तुमचा प्रतिसाद आमचाही आत्मविश्वास वाढविणार आहे. सिम्बॉयसिस डॉ. अरूण मुडबिद्री यांनीही मार्गदर्शन व्यक्त करतांना म्हणाले की, तुमच्यातली क्षमता, उत्साह, तत्परता बघून आम्हाला काहीतरी नवीन शिकण्याची प्रेरणा मिळाली आहे. 'आत्मविश्वास आणि विश्वास' या कमवण्याच्या गोष्टी आहेत. त्यासाठी शिका, कष्ट करा व आपली यशाची गोष्ट दुसऱ्याला द्यायला शिका. आपला अंतरंग व बाह्यरंग एकच असावा. समोरच्या विषयी आस्था व प्रेम बाळगायला शिका. ध्येयाने प्रेरीत व्हा. २०-२० च्या यशाचा कप जिंकायचा आहे. त्यादृष्टीने मार्गक्रमण करा.

**बचत गटातील महिलांसाठीचा माहिती व तंत्रज्ञान शाळेचा प्रयोग यशस्वी**

**शनिवार, २५ जुलै २००९** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व सिम्बॉयसिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्विनी अभियानाशी जोडल्या गेलेल्या बचत गटातील महिलांसाठी पहिल्या व्हर्च्युअल सेंटरचा (आभासी वर्गाचा) प्रयोग यशस्वी झाला. बचत गटांच्या सर्वांगीण विकासासाठी मैलाचा दगड ठरलेल्या या उपक्रमाची सुरूवात म्हणजे महिलांना आत्मविश्वासाकडे नेण्याचे यशस्वी पाऊल ठरले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या गडचिरोली ते रत्नागिरी सुमारे ४१ व्हर्च्युअल सेंटरमधून या अभिनव प्रयोगाची सुरूवात म्हणजे एका ऐतिहासिक माहिती व तंत्रज्ञान युगाची खऱ्या अर्थाने नांदी ठरली आहे. गडचिरोली ते सिंधुदुर्ग असा व्यापक पट असलेल्या या प्रयोगात बचत गटातील ३०२४ महिलांनी सहभाग नोंदविला व आधुनिक इंटरनेट जगाशी आम्ही किती सहजपणे नातं जोडू शकतो, याचाही प्रत्यय दिला. माहिती व तंत्रज्ञानाची गंगा घरोघरी असा अनोखा मंत्रही दिला आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र पुण्याच्या अण्णाभाऊ साठे प्रशालेतून या अभिनव उपक्रमाची सुरूवात यशस्विनी अभियानाच्या संयोजिका मा. सुप्रिया सुळे, विद्यापीठाचे प्रकुलगुरू मा. डॉ. पंडित पलांडे व सिम्बॉयसिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटचे संचालक मा.डॉ. अरूण मुडबिद्री, यशस्विनी अभियानाच्या मुख्य समन्वयक मा.सौ. सुरेखाताई ठाकरे यांच्या उपस्थितीत झाली. डॉ. पंडित पलांडे यांनी व्हर्च्युअल सेंटरची ग्रामीण भागातील महिलांना असलेली गरज विषद केली. महिला कल्याणासाठी सरकार योजित असलेल्या योजनांबरोबरच तिच्या आजच्या काळाशी निगडीत मुलभूत गरजा तिच्यापर्यंत पोहोचणे किती महत्त्वाचे आहे, हे विषद केले.

या अनोख्या संवादाची सुरूवात गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातील महिलांपासून झाली. महाराष्ट्रातील बचत गटातील अनेक महिलांनी आपल्या विविध स्थानिक अडचणींबाबत तसेच त्यांच्याकडे मिळत असलेल्या मुलभूत सेवांचा अभाव, त्यांच्याकडे असलेले कला-कौशल्य, यशस्विनी अभियानामुळे त्यांच्या जीवनाला मिळालेले दिशादर्शक वळण यांविषयी मनोगत व्यक्त केले. यासाठी महाराष्ट्रातील ग्रामीण महिलांनी दिवसभर नोंदविलेला आपला सक्रिय सहभाग हे आजच्या प्रशिक्षणाचे खरे यश म्हणावे लागेल.

दुपारच्या सत्रात सिम्बॉयसिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या प्रा. संगीता डोके व प्रा. निता जोशी यांनी वस्तुंचा दर्जा, मार्केटींग व पॅकेजिंग या विषयावर सिम्बॉयसिसची भूमिका विषद केली. कच्चा माल, वस्तुची उपयुक्तता, व्यवसायासाठी लागणाऱ्या कर्जाची प्रक्रिया व परतफेड या संदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन केले. त्यानंतर प्रा.निता जोशी यांनी महिलांच्या व्यवसायसंदर्भातील महत्त्वपूर्ण प्रश्नांवर चर्चा केली यावेळेस महिलांनी अशाप्रकारचे प्रशिक्षण वैयक्तिक पातळीवर देण्याचा आग्रह धरला. खेडे आणि महानगर येथील विकासाची दरी बुजवण्याचे हे प्रयोगशील अभियान महिलांच्या विकासाला निश्चितच प्रेरणादायी व गती देणारे आहे. यावेळी सुप्रिया सुळे यांना महिलांनी विचारलेल्या अनेक अडीअडचणींसंदर्भातील प्रश्नांचे त्यांनी निराकारण केले व त्याबाबतीत उपलब्ध उपायोजनांची माहिती दिली.

आपल्याकडे निवडणुकी आल्या की आपण जागे होतो. मग कोण कोण कार्यकर्ते आहेत, कोणा कोणाच्या मनात बाशिंग बांधावयाचे आहे याच शोध सुरु होतो. परंतु अशी परिस्थिती असणे उपयोगाचे नाही. ग्रामीण पद्धतीने सांगावयाचे झाले तर पहिलवान असा तयार असला पाहिजे की, सांगेल तेव्हा तो कुस्तीला उभा राहिला पाहिजे. अगोदर करार करून आणि मग खुराक खाऊन अमक्या तारखेला कुस्ती लढतो असे म्हणणे ही कुस्ती नव्हे. बोलणे झाल्याबरोबर अर्ध्या तासाच्या आत तो मैदानात आला पाहिजे आणि कुस्ती झाली पाहिजे.

**स्व. यशवंतराव चव्हाण**

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम, मुंबई
## कार्यवृत्त

समाजातील गोर गरीब, दीन-दुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतूदीला अनुसरून भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केले आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम नावाच्या विभागांची निर्मिती केली आहे. या फोरमचे प्रशासकीय काम श्री. म.बा. पवार सदस्य सचिव हे पाहत आहेत. विधी साक्षरता कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये श्री. अनिल चिंदरकर हे ही मदत करतात. या विभागामार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते.

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता किंवा मोबदला न घेता मोफत तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नासंबंधी सखोल अभ्यास करून गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

४. पक्षकारांच्या तंट्यामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.

५. संबंधित न्यायालयाच्या सहकार्याने लोक न्यायालयाचे आयोजन करणे.

६. विधी विषयामध्ये संशोधन करून प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारूप तयार करून वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

७. प्रचलित कायद्यांची विशेष माहिती करून देण्यासाठी तज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करून देण्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.

९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकीलाची व्यावसायिक नीतीमत्ता या विषयावर परिसंवादाचे आयोजन करणे.

१. **फोरमच्या बैठका :–** योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात.

२. **उपसमितींच्या बैठका :–** एखाद्या विषयासंबंधी सखोल अभ्यास करून प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी वेगवेगळ्या समीत्या नेमल्या जातात. मागील सात महिन्यामध्ये खालील समीत्यांच्या बैठका झाल्या

   १. **'फॉर्म–अ' छाननी समीती** : दि. २७ फेब्रुवारी २००९ रोजी ग्रंथालयामध्ये सदस्यांनी सादर केलेल्या 'फॉर्म-अ'ची छाननी करण्यासाठी या समितीची बैठक झाली. ही बैठक श्री. एन.एम. राजाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला ३ सदस्य उपस्थित होते. आलेल्या सर्व फॉर्मची छाननी करण्यात आली.

   २. **ज्येष्ठ नागरिकांचे हॅन्ड बुक रिव्हीजन कमिटी :–** दि. ९-७-२००९ रोजी चव्हाण केंद्राच्या बोर्ड रूम मध्ये

मा. श्री. हुसेन दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची बैठक झाली. बैठकीला ६ सदस्य उपस्थित होते. बैठकीमध्ये २९ बाबी संबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

३. **सुकाणू समिती बैठक :-** ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांच्या प्रतिनिधींची बैठक मा. श्री. काळे सरचिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली १६ जुलै २००९ रोजी संपन्न झाली. ही बैठक चव्हाण केंद्राच्या बोर्ड रूममध्ये झाली. बैठकीला १२ सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये ३५ बाबीसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

४. **ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक :-** कुर्ला ते कर्जत-कसारा व नवी मुंबई या क्षेत्रामध्ये कार्यरत असेलल्या ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा २००९ च्या आयोजनाबाबत विचार करण्यासाठी विरंगुळा केंद्र, मुलुंड (पूर्व) येथे दि. २८ जुलै २००९ रोजी श्री. व्ही. एम. दाते यांच्या अध्यक्षतेखाली वरील क्षेत्रात कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक संपन्न झाली. बैठकीला अंदाजे ५० ज्येष्ठ नागरिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीमध्ये अंदाजे ३९ बाबी संबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

३. **कायदेविषयक सल्ला केंद्र :-** गोरगरिब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळात प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या सात महिन्यामध्ये या केंद्राच्या २७ बैठका झाल्या. या अवधीमध्ये १५५ लोकांनी या केंद्राचा लाभ घेतला. या केंद्राचे काम सर्वश्री म.बा.पवार, भुपेश सामंत, महेश गावडे, दिलीप तळेकर व प्रकाश ह्या वकिलांनी पाहिले.

४. **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :-** दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळात समुपदेशन व तडजोड केंद्राचे आयोजन करण्यात येते.

५. **आपल्या कायद्याची माहिती करून घ्या (Know your Law Lecture Series) :-** या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदेपंडितांचे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

६. **विधी साक्षरता कार्यशाळा :-** लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करून देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थाचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्थ, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी. गेल्या सात महिन्यामध्ये या सर्व घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

(६.१) न्यू लॉ कॉलेज, माहिम यांच्या संयुक्त विद्यमाने विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २१ फेब्रुवारी २००९ रोजी सकाळी ९.३० ते १२.०० वाजेपर्यंत ''वकिलांची व्यावसायिक नीतीमत्ता'' ह्या विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्य श्री. एन.एम. राजाध्यक्ष हे अध्यक्षस्थानी होते. श्री. म.बा. पवार यांनी प्रास्ताविक केले. २०० पेक्षा जास्त विधी शाखेचे विद्यार्थी कार्यक्रमांना उपस्थित होते. भाषेचे माध्यम इंग्रजी होते.

(६.२) रविवार दि. १२ एप्रिल २००९, राजश्री शाहू महाराज सहकारी संस्था, चेंबूर यांच्या संयुक्त

विद्यमाने महात्मा फुले नगर, चेंबूर येथे पूर्ण दिवस महिला व पुरूषांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला १०० पेक्षा जास्त स्त्री-पुरूष उपस्थित होते. या कार्यशाळेत ८ व्याख्याने झाली. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(६.३) दि. ३ मे, २००९ माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी एका माहिती तंत्रज्ञान साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला २८ ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान माननीय सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी भूषविले होते. या कार्यशाळेमध्ये ८ प्रकारच्या माहिती संबंधी ८ व्याख्याने झाली. हा कार्यक्रम माहिती व तंत्रज्ञान केंद्राच्या सभागृहात संपन्न झाला.

(६.४) रविवार, दि. २ ऑगस्ट, २००९ प्रतिज्ञा महिला मंडळ, भांडुप (प.) यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रिया-पुरूषांसाठी आयप्पा मंदिर सभागृह, भांडुप येथे एका विधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती विद्या शिंदे ह्या होत्या. या कार्यशाळेमध्ये एकूण ५ व्याख्याने झाली. कार्यक्रमाला १०० पेक्षा महिला व पुरूष उपस्थित होते. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(६.५) रविवार दि. ९ ऑगस्ट २००९, ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था, गोवंडी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवशक्ती केंद्र मंडळ सभागृह, देवनार म्युनि. कॉलनी, गोवंडी येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्ध्या दिवसासाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक (स्त्री-पुरूष) कार्यक्रमाला उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्ष श्री. प्रभाकर ठाकूर हे होते. भाषेचे माध्यम मराठी होते.

वरील विधी साक्षरता कार्यक्रमासाठी सर्वश्री म.बा.पवार, दिलीप तळेकर, नारायण राजाध्यक्ष, अजय केतकर, हेमंत केंजाळकर, निलेश पावसकर, प्रमोद ढोकळे, भूपेश सामंत, जे.बी. पाटील ह्या वकिलांनी व्याख्याने दिली.

७. **संशोधनाचे काम :-** वर सांगितल्याप्रमाणे फोरमतर्फे विधी संशोधनाचे कामसुद्धा केले जाते. त्यानुसार महाराष्ट्र हुंडाबंदी नियम २००३ यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी संशोधन करण्यात आले. सखोल संशोधन करून दुरूस्तीचे प्रारूप दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ रोजी महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात आले आहे.

राज्ये जी चालतात ती, राज्ये चालविणाऱ्या माणसांपेक्षा राज्यशक्तीच्या बाहेर जी माणसे असतात त्यांच्या पुण्याईने चालतात. ती माणसे ज्या परंपरा आणि ज्या शक्ति निर्माण करतात त्याच्या साहाय्याने ती चालतात.

**स्व. यशवंतराव चव्हाण**

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांसाठी वर्षभर वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. महिलांना वेगवेगळ्या प्रकारच्या स्वयंरोजगाराचे मार्गदर्शन आयोजित केले जाते,तसेच समाजाच्या विविध क्षेत्रात यशस्वी असणाऱ्या महिलांचा सत्कार करून इतर महिलांना त्यांच्याकडून अनेक चांगल्या गोष्टी शिकण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते.

**दिनांक १-४-२००९** दादर येथे अखिल भारतीय महिला परिषद दादर मांटुगा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ''महिला पत्रकारांचे कार्यकर्तृत्व आणि अनुभव'' या विषयांवर चर्चात्मक कार्यक्रम झाला या कार्यक्रमांत पत्रकार महिला मा. आसावरी जोशी (नवशक्ती) मा.राही भिडे (दैनिक प्रहार), मा. प्रगती बाणखेले (महाराष्ट्र टाईम्स) व मा. शिबाणी जोशी (मुंबई, दूरदर्शन) इत्यादींनी सहभाग घेतला. महिला व्यासपीठ-संयोजक रेखा नार्वेकर, ममता कानडे व सुलक्षणा निमगांवकर यांनी कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

**दिनांक १५-६-२००९,** गिरगाव येथे ५० महिलांची बैठक झाली या बैठकीत महिला व्यासपीठातर्फे शोभा लोंढे यांनी महिलांना बचत गट स्थापन करून कसा चालवावा हे सांगून त्यापासून महिलांना होणाऱ्या फायदयाबाबत माहिती दिली. तेथे जमलेल्या महिलांनी अंदाजे नवीन ४ बचत गट स्थापन करण्याचे आश्वासन दिले. व आपल्या प्रयत्नांना यश मिळून ऑगस्ट महिन्यातच हे बचत गट स्थापन करण्यात झाले. व्यासपीठातर्फे शोभा लोंढे यांनी स्थापन केलेले व मा. अल्पना पेन्टर यांच्या माध्यमातून झालेले बचत गट मिळून एकूण मुंबईतील बचत गट १२५ (एकशे पंचविस) झाले आहेत. कुलाबा, गिरगाव, नायगाव, वरळी, बांद्रा, कांदवली, मालाड, बोरवली, मुलुंड, कुर्ला, गोंवडी, वाशी, कोपरखैराने, नेरूळ येथील प्रत्येक बचत गटाने १००/- रूपये भरून, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ह्यांच्या यशस्विनी अभियान या संस्थेचे सदस्यत्व घेतले आहे. ह्या कामाची जबाबदारी शोभा लोंढे यांनी घेतली.

**दिनांक २५-७-२००९,** अधेरी येथे व्यासपीठातर्फे स्थापन केलेल्या अंदाजे ३० बचत गटातील प्रमुख महिलांकरिता एक दिवसीय शिबिर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, यशस्विनी अभियान यांच्या माध्यमातून घेण्यात आले होते. अंदाजे ६० महिला सहभागी होत्या. या कार्यक्रमांचे आयोजन राजस्थानी सेवा संघ हायस्कूलच्या प्राध्यापिका मा.व्ही. एस. वालेचा, शोभा लोंढे व वैजयंती वैरागडे (राज्यस्तरीय समन्वयक समिती) यशस्विनी अभियान यांनी केले.

**दिनांक १९-६-२००९ व २२-६-०९,** गोंवडी येथे व्यासपीठातर्फे बचत गटातील महिला करिता ''स्वयंरोजगार प्रशिक्षण'' शिबिर घेण्यात आले. या शिबिरात महिलांना जाम, सॉस, अत्तर, सरबत व चॉकलेट तसेच महिलांनी स्वतः व इतरांच्या स्वभावातील वाईट गुण बदलण्याचा कसा प्रयत्न केला पाहिजे याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमांत प्रशिक्षक मा. दिप्ती पटेल व मा. निता प्रधान होत्या. कार्यक्रमांचे आयोजन महिला व्यासपीठ-संयोजक ममता कानडे व शोभा लोंढे यांनी केले.

**दिनांक १३-८-२००९,** गिरगाव येथे व्यासपीठातर्फे बचत गटातील महिला करिता ''स्वंयरोजगार प्रशिक्षण'' शिबीर घेण्यात आले. या शिबिरात महिलांना मेणबत्ती, अत्तर व उटणे तसेच महिलांनी व्यवसाय सुरू केल्यानंतर मालाचे पॅकिंग व मार्केटिंग कशा प्रकारे करावे याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमांत प्रशिक्षक मा दिप्ती पटेल होत्या. कार्यक्रमांचे आयोजन महिला व्यासपीठ-संयोजक ममता कानडे व शोभा लोंढे यांनी केले. महिला घरगुती काम जास्त चांगल्या पद्धतीने कसे करू शकतील व कमीत कमी वेळात चांगल्यात चांगले काम करून आपला संसार तर

सांभाळतीलच त्या शिवाय दुसऱ्यांच्या संसाराला किंवा जेवणांची गरज भागवून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनू शकतील का ? ह्या संदर्भात समाजातल्या बऱ्याच महिलांशी व विचारवंताशी चर्चा केल्यानंतर श्री. शरद काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन ह्यांच्याशी चर्चा करून सर्व महिलांना उपयुक्त असे ''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण'' देण्याचे ठरविले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या हॉलमध्ये १६ जून २००९ पासून (९ आठवडे) प्रत्येक आठवड्यात मंगळवार, गुरूवार व शनिवार दुपारी ३.०० ते सायं. ६.०० ह्या काळात प्रशिक्षणास सुरूवात झाली. कुलाबा, गिरगाव, वरळी, माटुंगा, कोपरखैराने येथे वेगवेगळ्या गोष्टींचे म्हणजेच मेणबत्ती, उदबत्ती, परफ्युम बनविणे असे शिबिर आयोजित केले होते. त्या सर्व शिबिरामध्ये महिला व्यासपीठाच्या ह्या नवीन उपक्रमांची माहिती देण्यात आली. सर्व महिलांना ही कल्पना अतिशय आवडली व थोड्याच दिवसांत आम्हाला ३५ प्रशिक्षणांर्थी मुलाखती द्वारे निवडून मिळाले. अत्यंत अल्प दरात संपूर्ण प्रशिक्षण शिकविण्यात आले. ह्या प्रशिक्षणामध्ये २७ दिवस २७ विषय शिकविण्यात आले. स्वतःचे आरोग्य व स्वच्छता, स्वयंपाक घराची स्वच्छता, गॅसची काळजी व वापरण्याची दक्षता, महिलांचे कायदे, सर्व प्रकारच्या कपड्याची ओळख, काळजी व वापर. घरातील सर्व वस्तुची, पितळी-तांबे, चांदी लाकडी व इतरही भांड्याची काळजी सर्व विजेची उपकरणे व त्यांची काळजी, आर्थिक व्यवस्थापन, टेबल व बेड लावण्याची पद्धत तसेच अन्नपदार्थाचा योग्य वापर, वय, आजार व नैसर्गिक वातावरणाचा विचार करून कसे करता येईल या बद्दलचे मार्गदशन देण्यात आले. उपवासाचे पदार्थ, महाराष्ट्रीयन, पंजाबी, मुगलाई, चायनिज, इटालियन, दक्षिणात्य, मारवाडी, गुजराथी तसेच वेगवेगळे केक बनविणे असे जवळ जवळ १५० पदार्थ शिकविण्यात आले. या प्रशिक्षणांची कल्पना व उपयुक्त पटल्यामुळे कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन त्यांनी आमच्या सोबत हे प्रशिक्षण शिकविण्यासाठी पुढाकार घेतला. वरिल सर्व विषयापैकी काही विषय कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतनच्या १४ शिक्षिका व बाकी विषय समाजातील वेगवेगळ्या विषयांच्या तंज्ञाकडून शिकविण्यात आले. प्रशिक्षणांमध्ये सर्व विषयांच्या मराठी नोट देण्यात आल्या या नोट्स वरून महिलांची तोंडी परिक्षा घेण्यात आली. यशस्वी महिलांना ''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण'' कार्यशाळा संदर्भात ''प्रमाणपत्र'', महाराष्ट्र महिला व्यासपीठ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई व कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन या नावाने देण्यात आले. कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतनमध्ये प्रमाण पत्र वितरण कार्यक्रम घेण्यात आला. गृहव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेतील यशस्वी प्रशिक्षणांर्थीनीना प्रमाणपत्र मुख्य पाहुण्या महासंचालक-माहिती व जनसंपर्क संचानलाय (भारतीय प्रशासन सेवा) मा. प्राजक्ता लवंगारे यांच्या शुभ हस्ते, माजी मुख्य सचिव - महाराट्र राज्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विश्वस्त मा.श्री. अजित निबांळकर यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

अगदी साध्या प्रतीकाच्या भाषेत बोलावयाचे झाल्यास मला हिंदुस्थानचे हे चित्र दिसते आहे की, रस्ता डोंगराळ आहे, वेळ उन्हातान्हाची आहे, जवळपास पाणी मिळेलच याची खात्री नाही, साथीला माणसे असतीलच असा भरवसा नाही, परंतु खांद्यावर हे दोन्ही बोजे घेऊन वाटचाल ही केलीच पाहिजे. हिंदुस्थानची जी सफर चालू आहे त्या सफरीतला आजचा जो मुक्काम आहे त्याचे हे चित्र आहे.

स्व. यशवंतराव चव्हाण

# सृजन
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या, रंगस्वर विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाकरता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातून समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सन्मानीय सल्लागार म्हणून सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डगल्स जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग हे काम पहातात. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजन कार्यशाळा ९.०० वाजता चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात येते. श्री विद्याधर खंडे त्यांना सहाय्य करतात.

प्रमुख कार्यक्रम :

१ फेब्रुवारी २००९ रोजी फोटो जर्नलिस्ट श्री. सुधाकर ओवळे यांनी डॉक्युमेंटरीद्वारे मुलांना फोटोग्राफी या विषयाची ओळख करून दिली. वेगवेगळ्या कामामध्ये चित्रांचे महत्त्व कसे असते त्याचबरोबर वृत्तपत्रात किंवा मुद्रित पत्रामध्ये चित्रामुळे अनेक गोष्टींचा संबंध ऊठून कसा दिसतो अशी विविध प्रकारची माहिती दिली.

श्री. निशिकांत उजवणे, सुप्रसिद्ध मेकअपमन यांनी मेकअपमुळे माणसाच्या व्यक्तीमत्त्वात कसा फरक पडतो, व्यक्तीमत्त्व कसे खुलून दिसते या विषयी मुलांना माहिती दिली. निवडक मुलांचे मेकअप करून प्रास्ताविक दाखविले तर काही मुलांकडून प्रात्यक्षिक करून घेतले.

श्री. विवेक टेटविलकर यांनी टाकाऊ अशा विविध प्रकारच्या वस्तूच्या माध्यमातून कल्पकतेच्या दृष्टीकोनातून विचार करून वेगवेगळ्या उपयोगी वस्तू बनविता येतात याची प्रात्यक्षिके दाखवून, काही वस्तु मुलांकडून करून घेतल्या.

समयका अहिरे आणि अमरजित या सुप्रसिद्ध सिरेमिक आरटिस्ट असलेल्या दोन मैत्रिणींनी मातीकामा द्वारे मुलांमध्ये जाणिवा जागृती करून त्यांच्याकडून विविध वस्तू तयार करून घेतल्या.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, पुणे यांच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात आपले विचार मांडताना मा. अप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील सोबत व्यासपीठावर मा. अंकुश काकडे, मा. मोहन धारीया इ.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, पुणे यांच्या वतीने वारकऱ्यांच्या दिंडीला सहकार्य करतानाचा प्रसंग.



लोक नेते यशवंतराव चव्हाण यांच्या ९६ व्या जयंती उत्सव प्रसंगाच्या, मुख्य कार्यक्रमात संबोधीत करीत असताना स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे, व्यासपीठावर विभागीय केंद्राचे सचिव मा. हरिभाऊ जवळगे, अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे, पद्मभूषण डॉ. तात्याराव लहाने इ.



दिनांक ३१ ऑगस्ट २००९ रोजी सुप्रसिद्ध हिंन्दी लेखक प्रा. डॉ. सुर्यनारायण रणसुभे यांना आतापावेतो राज्य, देशपातळीवर त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचा सत्कार करताना विभागीय केंद्र, लातूरचे अध्यक्ष मा. जनार्दन वाघमारे व इतर मान्यवर.



कोकण विभागीय केंद्र रत्नागिरीच्या वतीने घेण्यात आलेल्या खाण उद्योग गरज व पर्यावरण संरक्षण परिसंवादात मा. अनिल नेवाळकर मार्गदर्शन करताना




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कोकण विभागीय केंद्र रत्नागिरीच्या वतीने १ जुलै ०९ रोजी कृषिदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी कोकण विभागीय केंद्राचा वार्षिक अहवाल प्रकाशीत करताना कुलगुरू मा. डॉ. विजय मेहता, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, आमदार श्री. उदय सामंत इ.



''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण'' ,कार्यशाळेतील प्रमाणपत्र-वितरण समारंभप्रसंगी मुख्यपाहुण्या महासंचालक-माहिती व जनसंपर्क संचालनालय मा. प्राजक्ता लवंगरे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. श्री. अजित निंबाळकर, निर्मला निकेतनच्या प्रिन्सिपल मंचेडो, संयोजिका ममता कानडे इ.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या, महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे घेण्यात आलेल्या 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' वर्गातील विद्यार्थीनी.



'तांदळा-एक मुखवटा' चित्रपट परिचर्चेत आपले विचार मांडताना मा. श्री. गिरीश गांधी डावीकडून श्री. सतीश पिंपळे, डॉ. रविंद्र शोभणे, डॉ. आशाताई सावदेकर, माधुरी अशिरगडे, अरुणा सबाने, डॉ. प्रमोद मुनघाटे इ.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने आयोजित केलेल्या 'बदलती सामाजिक परीस्थिती आणि आपली भुमिका' या विषयावर आपले विचार मांडताना मा. कुमुदिनी भार्गव.



मा. यशवंतराव चव्हाण यांची ९६ वी जयंती निमित्त मा. प्रा. बा. ह. कल्याणकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रतिष्ठानचे सरचिटणीस अक्षयकुमार काळे, डावीकडून : मा. अरुणा सबाने, मा. विजय जिचकार, मा. श्री. गिरीश गांधी, मा. श्री. दत्ता मेघे, प्रा. बा. ह. कल्याणकर व इतर.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र कराडच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी झालेले कराड तालुक्यातील भजनी मंडळी.





"आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान" या विषयावरील चर्चासत्रात बोलताना विभागीय केंद्र, कराडचे सचिव मा. मोहनराव डकरे व इतर.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र नासिकच्या वतीने आयोजित केलेल्या प्रकट मुलाखतीच्या कार्यक्रमात अभिनेते मा. अतुल कुलकर्णी, मुलाखतकार मा. किशोर कदम उर्फ कवी सौमित्र.







विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करीत असताना सदस्य सचिव श्री. म. बा. पवार सोबत श्री. भूपेश सामंत श्री. हेमंत केंजाळकर व इतर.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान, नागपूरच्या वतीने आयोजित केलेल्या 'महाराष्ट्र राज्य युवा धोरण माहिती कार्यशाळेत' उपस्थित मा. सुप्रिया सुळे, विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. गिरीश गांधी व इतर.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या, शिक्षण विकास मंचाच्या वतीने औरंगाबाद इथे आयोजित केलेल्या 'मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणातील गुणवत्ता कार्यशाळेत' मार्गदर्शन करताना निमंत्रक मा. सुप्रिया सुळे, सोबत व्यासपीठावर डॉ. कुमुद बन्सल, मा. वी. वी. चिपळूणकर व इतर.






यशस्विनी अभियानाशी जोडल्या गेलेल्या बचत गटातील महिलांसाठी पहिल्या व्हर्च्युअल सेंटरच्या (आभासी वर्ग) उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर मा. सुप्रिया सुळे, विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ. पंडित पलांडे आणि मा. डॉ. अरुण मुडबिद्री.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या, माहिती व तंत्रज्ञान प्रबोधनीतर्फे घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गात सहभागी झालेले विद्यार्थी.





यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या माहिती व तंत्रज्ञान प्रबोधनी अर्थात सी. डॅक च्या वर्गातील विद्यार्थी.

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण साहेब हे ग्रंथ प्रेमी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या विचारांना अनुसरून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे एक सुसज्ज ग्रंथालय सुरू करण्यात आले आहे. या ग्रंथालयामध्ये समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, इतिहास, कायदा संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, व आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश, विश्वचरीत्रकोश, गॅझेटीयर, ॲटलास, इअरबुक, डिक्शनरी, इ. संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. तसेच वेळोवेळी संबंधित विषयाला अनुसरून नविन पुस्तके ग्रंथालयासाठी घेण्यात येतात. ग्रंथालयामध्ये १९,४६८ इतका ग्रंथसंग्रह उपलब्ध आहे. सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाचे विषय असलेले आणि संदर्भाकरीता उपयोगी व्हावे या दृष्टीने यशवंतराव चव्हाण ग्रंथालयांने काही महत्वांच्या विषयासंबंधीची वृत्तपत्रीय कात्रणे काढून वाचकाना हाताळता यावी याकरिता व्यवस्थीत बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरीता ठेवली आहेत. विद्यार्थी, संशोधक यांच्याकरीता अद्ययावत माहीतीकरीता नियतकालीकांची बांधणी करून संदर्भाकरीता ठेवली आहेत. ग्रंथालयाचा वाचकांना जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. याकरीता पुस्तकांची यादी अद्यावत ठेवण्याकरिता संगणकीकरण करण्यात आले आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रंथालय व्यवस्थापनात अनेक बदल होत आहेत. ग्रंथालय सॉफ्टवेअरच्या मदतीने ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. ग्रंथालयामध्ये असलेली पुस्तके आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचकांना सहज उपलब्ध व्हावीत याकरीता 'OPAC' - (On line Public Access Catalogue) ग्रंथालयांनी वाचकांच्या माहिती सेवेसाठी सुरू केले आहे. यामध्ये लेखक, सहलेखक, ग्रंथनाम ग्रंथकार, विषय, वर्ष, प्रकाशन वर्गांक, यांचा वापर करून 'OPAC' च्या मदतीने वाचकांना माहिती व ग्रंथाची सूची मिळविता येते. ग्रंथालयामध्ये AACR-II ॲग्लो अमेरीकन कॅटलॉग रूल्स -२ प्रमाणे, संगणकीय तालीकीकरण करण्यात आले आहे. तसेच DDC-21 (डेव्ही डेसियल कमासीफकैशन) नुसार ग्रंथाचे वर्गीकरण केले असून DDC प्रमाणे (000-999) मुख्य वर्गांक आणि त्यांचे उपवर्ग यानुसार ग्रंथाची मांडणी केलेली आहे. सर्व ग्रंथ याच पद्धतीप्रमाणे कपाटामध्ये ठेवण्यात आले असून 'OPAC' च्या मदतीने माहिती मिळविले सोयीचे होते.

**सभासदत्व :**

अ) सर्वसाधारण सभासद करीता रू. २५०/- वार्षिक वर्गणी तसेच रू. २५०/- अनामत रक्कम भरून सभासदांना एकावेळी एक ग्रंथ देण्याची व्यवस्था केली आहे.

ब) महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांच्याकरीता त्यांना सवलत म्हणून वर्गणी रू. ५०/- व अनामत रक्कम १००/- रू. घेण्यात येत असून अशा विद्यार्थी, संशोधक यांना ग्रंथ, संदर्भग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयामध्ये बसून वाचण्यासाठी, संदर्भासाठी देण्यात येतात.

ग्रंथालयाचे आयोजन व व्यवस्थापन यांवर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले आहे. ग्रंथालय व्यवस्थापनाचे काम श्री. अनिल पाझारे करतात. सौ. प्रियंका देसाई आणि श्री. अनिल चिंदरकर हे सहकार्य करतात.

११ फेब्रुवारी २००९ ते ३१ ऑगस्ट २००९ या कालखंडामध्ये ग्रंथालयांनी काही महत्वाच्या पुस्तकांची खरेदी केली आहे. खालीलप्रमाणे

१) महाभारत युद्धकाळ / मेंडकी प्र.वा.
२) मराठी ग्रंथप्रकाशनाची २०० वर्षे / गोगटे, श.
३) नीलची शाळा/नील, ए.एस.
४) सामाजिक ज्ञानकोश खंड १, २,३, / जोशी बी.आर.
५) २६/११ ऑपरेशन मुंबई / कुलकर्णी अ.
६) समग्र काका भाग १,२,३/गाडगीळ का.
७) ....आणि दोन हात/श्रीखंडे, वि.ना.
८) शब्देविण संवादू/दूर्वे राणी
९) सेवानिवृत्त झालात ! पुढे काय ? नार्वेकर रा.
१०) संभाजीराजा/शिवदे स.
११) Science of the edge/Brockman, J.
१२) Little Man from the east/paul,M.K.
१३) The case of the Bonsaw Manager Gopalikrishan, R
१४) The inangural address/obama, B.
१५) Fitness & Beyond/shirlee, V.

# विभागीय केंद्र, रत्नागिरी
## कार्यवृत्त

कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्षपदी श्री. राजाभाऊ लिमये यांची नियुक्ती झाल्यानंतर विद्यमान जिल्हा अध्यक्ष श्री. चंद्रकांत बाईत यांचे नेतृत्वाखाली प्रतिष्ठानचे कार्य सुरू आहे.

कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. लिमये, उपाध्यक्ष तथा कोकण कृषी विद्यापीठाचे निवृत्त कुलगुरू डॉ. श्रीरंग कद्रेकर, विभागीय समितीचे सदस्य तथा कृषीभूषण रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या सुमारे चार-सव्वा चार वर्षांच्या कालावधीत शैक्षणिक, सामाजिक, बेरोजगारी निमूर्लन आणि स्वयंरोजगाराची निर्मिती, महिला बचत गटांची चळवळ आणि महिला सक्षमीकरण, पर्यटन, कृषी पर्यटन, कृषी-फलोत्पादन आणि वनौषधी लागवड, कला, क्रीडा, सांस्कृतिक, पीक स्पर्धा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, महिला व युवकांचे मेळावे, कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव असे विविध प्रकारचे उपक्रम आयोजित करून स्पर्धेत यशवंतरावजींचे विचारधन समाजमनापर्यंत पोहोचविण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेला आहे. परिणामी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्य अधिकाधिक जनताभिमुख होत आहे.

**दि. ०८ फेब्रुवारी २००९,** महिला औद्योगिक सहकारी संस्था, सावर्डे यांच्या संयुक्त विद्यमाने सावर्डे येथील सह्याद्री शिक्षण संस्थेच्या सभागृहात महिलांसाठी औद्योगिक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. स्वयंसिद्धाच्या संचालिका श्रीमती कांचनताई परूळेकर यांनी या शिबिरात महिलांना विविध प्रकारच्या हस्तकलाकृती आणि खाद्यपदार्थ तयार करण्यासंबंधी १९ औद्योगिक उत्पादनांचे प्रात्यक्षिकासहित प्रशिक्षण दिले. महिला बचत गटांद्वारे स्वयंरोजगार आणि आर्थिक विकास कसा साधता येईल या विषयीही त्यांना मौलिक मार्गदर्शन केले. सह्याद्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती अनुराधाताई निकम यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

**दि. १६ फेब्रुवारी २००९,** केंद्राच्या वतीने दापोली येथे एन.के. वराडकर कला आणि आर.व्ही. बेलोसे वाणिज्य महाविद्यालयात करियर गाईडन्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत मुंबईतील ख्यातनाम तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. किरण जोग यांनी दहावी व बारावीनंतर विद्यार्थ्यांची उज्ज्वल यशासाठी आवडीच्या क्षेत्राची निवड करण्यासाठी कोणते अभ्यासक्रम निवडावेत या विषयी मार्गदर्शन केले. सुमारे २५० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

**दि. ०८ व ०९ फेब्रुवारी २००९,** खेड येथील सहजीवन संस्थेत बारावीतील विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञ शिक्षकांमार्फत मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले. बारावीच्या प्रश्नपत्रिका कशा सोडवाव्यात, गणिताचा पेपर कसा सोडवावा आदि विविध विषयांवर प्रात्यक्षिकांसहित मार्गदर्शन करण्यात आले. दोन दिवसांच्या या शिबिरात २५० विद्यार्थी सहभागी झाले होते. उद्योजक श्री. हिराभाई बुटाला यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नाबार्ड व ध्येयपूर्ती महिला बहुउद्देशीय स्वयंरोजगार सेवा-उद्योग संस्था यांचे संयुक्त विद्यमाने रत्नागिरी येथे जागतिक महिला दिना निमित्ताने प्रदर्शनाचे ठिकाणी महिलांसाठी फनी गेम्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचे बक्षीस वितरण दि. ०८ मार्च रोजी सह्याद्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती अनुराधाताई निकम, केंद्राचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हा समिती अध्यक्ष श्री. चंद्रकांत बाईत यांच्या हस्ते करण्यात आले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

**दि. ०५ ते ०८ मार्च ०९,** जागतिक महिलादिनाचे औचित्य साधून नाबार्ड यांच्या संयुक्त सहकार्याने रत्नागिरी येथे उपरोक्त कालावधीत महिलांच्या बचतगटांनी केलेल्या विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शन आणि विक्रीचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. त्याचे उद्घाटन केंद्राचे प्रमुख मा. श्री. राजाभाऊ लिमये यांचे शुभहस्ते झाले. या उपक्रमात ३० महिला बचतगट सहभागी झाले होते.

**दि. ०८ मार्च ०९,** केंद्राच्या वतीने दापोली येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात येऊन ॲड. बाळासाहेब बेलोसे यांच्या हस्ते दापोली तालुक्यातील विविध क्षेत्रात विधायक कार्य करणाऱ्या सात कर्तृत्ववान महिलांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

**१२ मार्च, २००९,** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची ९६ वी जयंती रत्नागिरी येथील कार्यालयात साजरी करण्यात आली. स्व. यशवंतरावजींच्या प्रतिमेला पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विभागीय अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी स्व. यशवंतरावजींच्या जीवनचरित्रातील पैलू विशद करताना त्यांचे विचारधन नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज प्रतिपादन केली.

**१४ मार्च, २००९,** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी येथे 'खाण उद्योगांची गरज आणि पर्यावरण संरक्षण' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खाण उद्योजक आणि खाण उद्योगांशी संबंधित लोक उपस्थित होते. केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या परिसंवादात विभागीय सचिव श्री. अनिल नेवाळकर आणि तज्ज्ञांनी भाग घेऊन खाण उद्योगांच्या समस्या, स्थानिक जमीनमालक व शेतकऱ्यांच्या व्यथा, पर्यावरणाचे संरक्षण या बाबींवर खुली चर्चा होऊन परिसंवादातील सूचना पोहचविण्याचा निर्णय घेण्यात आला.

**दि. १५ ऑगस्ट २००९,** कोकणातील रातांबा या पारंपारिक फळझाडांची कोकणच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लागवड होऊन त्यातून स्थानिकांना कोकम सरबत, आमसुले, कोकणतेल यासारख्या कोकणी मेव्यातून रोजगार मिळविता यावा या उद्देशाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रत्नागिरी जिल्हा समितीने शालेय विद्यार्थ्यांमार्फत येत्या तीन वर्षात दीड लाख रातांबा रोपांची लागवड करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी लागणारी रोपे विविध स्वयंसेवी संस्था व महिला बचतगटांकडून तयार करून घेण्यात येत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला दोन रातांबा रोपे वाटप करण्यात येणार आहेत. या उपक्रमाचा शुभारंभ यावर्षीच्या १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी खेड येथून करण्यात आला.

**दि. ०१ जुलै २००९,** कोकणातील नागली व तूर या पारंपारिक पिकांकडे शेतकऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने ही पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्याकरिता केंद्रातर्फे गतवर्षीच्या खरीप हंगामापासून नागली व तूर पीक स्पर्धा आयोजित करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. गतवर्षीच्या स्पर्धेत नागली पिकासाठी १३६ आणि तूर पिकासाठी १५ अशा एकूण १५१ शेतकऱ्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांना कृषीदिन कार्यक्रमात कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय मेहता यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, बक्षीसे आणि प्रशस्तीपत्रके देऊन गौरविण्यात आले. यावर्षी सन २००९ या खरीप हंगामासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**वनौषधी लागवडींचा महत्त्वकांक्षी कार्यक्रम :-** केंद्राच्यावतीने कोकणातील दुर्लक्षीत वनौषधींचा खजिना पुन्हा समृद्ध करण्यासाठी गेले वर्षभर शेतकऱ्यांमध्ये जाणीव-जागृतीचे उपक्रम राबविण्यात आले. त्याला यश येऊन सन २००९ च्या पावसाळ्यात रत्नागिरी जिल्ह्यात प्रायोगिक स्वरूपात विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींच्या लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या लागवडीसाठी लागणारी रोपे आणि बियाणी कोकण कृषी विद्यापीठामार्फत लाभार्थींना उपलब्ध करून देण्यात आली आहेत. केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय मेहता, कृषी विद्यापीठाच्या वनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. संजय भावे, डॉ. दिगंबर मोकाट यांचे या महत्त्वकांक्षी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मौलिक सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे. या उपक्रमामुळे कोकणात वनौषधी लागवडीबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण होऊन दुर्मिळ औषधी वनस्पती पुन्हा समृद्ध होण्यास मदत होणार आहे.

**वाघावळे पर्यटन विकास केंद्रासाठी दळणवळण सुविधाः-** रत्नागिरी आणि सातारा जिल्ह्याला जोडणाऱ्या खोपी-रघुवीर मार्गे शिंदी वेळवण चतुरबेट वाघावळे (ता. सातारा) या निसर्गरम्य गावांचे पर्यटन केंद्रात रूपांतर व्हावे तसेच रत्नागिरी सातारा जिल्ह्याला जोडणारा खेड खोपी रघुवीर घाट मार्गे शिंदी वेळवल वाघावळे जि. साताऱ्याला जोडणारा मधील ५४० मी. चा रस्ता एस.टी. वाहतूकीसाठी योग्य व्हावा यासाठी या रस्त्याचे डांबरीकरण करावे म्हणून केंद्राकडून मा. अधिक्षक अभियता सातारा व रत्नागिरी यांजकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. स्वातंत्र्यानंतर ६० वर्षे उलटल्यानंतरही २० ते २५ गावांतील सुमारे ११००० लोकवस्तीतील लोकांना अद्याप एस.टी. सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे हाल होत आहेत. ही बाब लक्षात घेऊन तेथील लोकांच्या आग्रहास्तव त्यांच्या समस्या सोडविण्याचे दृष्टीने केंद्राकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

# विभागीय केंद्र, नागपूर
## कार्यवृत्त

**रविवार १५ फेब्रुवारी, २००९**

''नदी आणि वाकुडकर'' केंद्राच्या वतीने लोककवी श्री. ज्ञानेश वाकुडकर यांच्या 'नदी' या नवं-खंडकाव्यावर आधारित आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी उपस्थित होते. वाकुडकर यांच्या सखे-साजणीने अवघ्या मराठी मनाला वेड लावले. त्यांच्या विविध कविता क्लास पासून मास पर्यंत मैफलीपासून चळवळीपर्यंत सारख्याच लोकप्रिय आहेत. वाकुडकरांच्या 'नदी' या नवं खंडकाव्यावर गिरीश गांधी यांनी भाष्य केले. याप्रसंगी विदर्भाचे ज्येष्ठ नेते, विचारवंत व रसिक मा.श्री. जांबुवंतराव धोटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन केंद्राच्या कार्यकारिणीच्या सदस्या मनीषा साधू यांनी केले. याप्रसंगी कुमार सप्तर्षी, डॉ. मोहम्मद असदुल्लाह, डॉ. जुल्फीशेख, प्रा. कोमल ठाकरे आणि केंद्राचे डॉ. अक्षयकुमार काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

**दि. २७ व २८ फेब्रुवारी, २००९** स्नातकोत्तर मराठी विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कै. बाळ सीताराम मर्ढेकर ह्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ''बा. सी. मर्ढेकर यांचे साहित्य'' या विषयावर राज्यस्तरीय द्विदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. प्रा. सु. श्री. देशपांडे यांच्या हस्ते पहिल्या सत्राचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक डॉ. आनंद पाटील होते तर व्यासपीठावर चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. यशवंत मनोहर, केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, स्नातकोत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. अक्षयकुमार काळे यांनी मर्ढेकरांच्या साहित्यावर प्रकाश टाकला. संचालन प्रा. कोमल ठाकरे यांनी केले तर प्रा. समीधा चव्हाण यांनी आभार मानले. उद्घाटनानंतर दुसऱ्या सत्रात मर्ढेकरांच्या ''सौंदर्यशास्त्र व साहित्यविचार'' या विषयावरील चर्चासत्रात सुरेश देशपांडे, डॉ. अरुणा देशमुख व प्रा. देवानंद सोनटक्के यांनी सहभाग घेतला या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. कृष्णा राऊत यांनी केले. तिसऱ्या सत्रात ''अजून येतो वास फुलांना'' हा काव्यानुभवात्मक कार्यक्रम सादर करण्यात आला. संकल्पना व सादरीकरण श्याम माधव धोंड व अरविंद उपाध्ये यांचे होते.

**दि. २९ फेब्रुवारी, २००९** च्या चर्चासत्राचा विषय मर्ढेकरांच्या संगीतिका आणि नाटक असा होता. या सत्राचे अध्यक्ष आचार्य अ. द. वेलणकर होते. श्री. पराग घोंगे, डॉ. संध्या अमृते, डॉ. सुनील रामटेके या वक्त्यांनी यात सहभाग घेतला. सत्राचे सूत्रसंचालन डॉ. कृष्णा साकुळकर यांनी केले. ''मर्ढेकरांची कविता'' या विषयावरील चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत तिडके होते. या सत्रात डॉ. अशोक पळवेकर, डॉ. हेमंत खडके, प्रा. अमृता इंदूरकर आदी वक्त्यांनी सहभाग घेतला. या सत्राचे संचालन डॉ. श्याम मोहोरकर यांनी केले. मर्ढेकरांचे कादंबरीविश्व या विषयावरील चर्चासत्रात डॉ. प्रभा गणोरकर अध्यक्षा म्हणून लाभल्या. प्रा. पुरुषोत्तम माळोदे, डॉ. शैलेंद्र लाड या वक्त्यांनी मर्ढेकरांच्या कादंबरी विश्वावर प्रकाश टाकला. द्विदिवसीय चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी सूत्रसंचालन प्रा. दिलीप काकडे यांनी केले. या चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. मनोहर यांनी साहित्यिकदृष्ट्या मर्ढेकरांची प्रतिमा वादग्रस्त आहे. परंतु वैचारिकदृष्ट्या व्यक्ति आणि त्यांचे साहित्य दोन्ही महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. तर प्रमुख अतिथी प्रा. वसंत डहाके म्हणाले की, मर्ढेकर कलेकडे विशुध्द संवेदनशील अभिव्यक्तिच्या दृष्टीकोनातून पाहतात. मर्ढेकरांच्या मते कवितेला फक्त कवितेच्या दृष्टिकोनातून पहायला हवे या विषयी कोणतेही संदर्भ जोडण्याचा प्रयत्न करू नये. या द्विदिवसीय चर्चासत्रासंदर्भातील एकूणच माहिती डॉ. अक्षयकुमार काळे यांनी दिली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी केले तर आभार मिलींद साठे यांनी मानले. हे द्विदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र मराठीचे प्राध्यापक, साहित्याचे अभ्यासक, विद्यार्थी, रसिक, मर्ढेकर प्रेमी या सर्वांसाठी एक पर्वणीच ठरले. समारोपीय चर्चासत्राला डॉ. आशाताई सावदेकर, डॉ. आनंद पाटील, डॉ. प्रभा गणोरकर, प्रा. देवानंद सोनटक्के, डॉ. हेमंत खडके, डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रा. अनिल नितनवरे अशी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती.

रसिकराज यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशन सोहळा घेण्यात आला. मेजर हेमंत जकाते यांचा काव्यसंग्रह 'दोन घडीचा डाव' आणि सौ. सुलभा जकाते यांचा कथासंग्रह ''ह्याला जीवन ऐसे नाव'' या दोन्ही संग्रहाचे प्रकाशन केंद्राचे श्री. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या मा. शुभांगी भडभडे, कवी नीलकांत ढोले, साहित्यिक पत्रकार श्री. अविनाश पाठक हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

**गुरुवार दि. १२ मार्च, २००९,** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत मा. प्रा. बा. ह. कल्याणकर यांचे व्याख्यान आयोजित केले. याप्रसंगी वक्ता म्हणून बोलतांना ''यशवंतराव चव्हाण म्हणजे गुणांवर प्रेम करणारे लोकनेते होते. कलेचं कौतुक करणे हा त्यांचा स्वभाव अन् माणसं निर्माण करणारा तो माणूस होता.'' असे भावपूर्ण प्रतिपादन प्रा. बा. ह. कल्याणकर यांनी केले. यशवंतरावांचे संपूर्ण जीवनच चळवळीतून घडले असल्याने सामान्य माणसाचे प्रश्न आणि त्यांची अचूक उत्तरे त्यांना माहित होती. या लोकनेत्याने महाराष्ट्राचा जो शैक्षणिक पाया रचला, त्यातून खरे सामाजिक परिवर्तन घडले. यशवंतरावांच्या अशा अनेक विचारांना श्रोत्यांनी ग्रहण केले. मा. गिरीश गांधी म्हणाले की, यशवंतरावांनी जीवनमूल्य उराशी बाळगून पाहिलेल्या स्वप्नांची आज दैनावस्था झाली आहे. सध्याच्या राजकारणाची तिचं अवस्था आहे. राजकारणाची दिशा बदलल्याशिवाय यशवंतरावांना अपेक्षित बदल घडणार नाही. मराठी भाषेसारखे प्रश्न दुर्दैवाने मोठे ठरत असल्याचे मत व्यक्त केले.

याप्रसंगी ज्येष्ठ नेते मा. दत्ताभाऊ मेघे, केंद्राचे सदस्य डॉ. मोहम्मद असदुल्लाह, डॉ. चंद्रभान भोयर, डॉ. सुनील रामटेके उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे सरचिटणीस डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले. सूत्रसंचालन अरुणा सबाने यांनी केले. तर आभारप्रदर्शन विजय जिचकर यांनी केले.

**बुधवार दि. १८ मार्च, २००९,** केंद्राच्या वतीने बा. सी. मर्ढेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ''ह्या गंगेमधि गगन वितळले'' हा मर्ढेकरांच्या कवितेवर आधारित साहित्यमूल्य जोपासणारा काव्यमय आविष्कार सायंटिफीक सभागृहात घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी या कार्यक्रमाचे निर्माते तसेच विभागीय अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते. या संगीतमय काव्याविष्कारास आशा बगे, श्यामकांत कुळकर्णी, डॉ. आशाताई सावदेकर, विंग कमांडर अशोक मोटे, सुधीर देव, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, वसंत वाहोकर, प्रसेनजीत गायकवाड, अरुणा सबाने, आशा पांडे, शुभांगी रायलू, विजया ब्राह्मणकर, अशी साहित्य प्रेमी, मर्ढेकरप्रेमी, लेखक, कवी, साहित्याची जाण असणारे रसिक श्रोते उपस्थित होते. सौ. विजया मारोतकर यांनी सूत्रसंचालन केले.

**शनिवार ४ एप्रिल, २००९,** आकांक्षा मासिक, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''तांदळा-एक मुखवटा'' या पुरस्कारप्राप्त (गोवा फिल्म फेस्टीवल) मराठी चित्रपटावरील परिचर्चेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांनी ''चित्रपट निर्मिती हे संयमाचे काम असते. विदर्भातील एका स्त्रीने हे काम संयमाने, जिद्दीने पुर्णत्वास नेले.'' या शब्दात निर्माती माधुरी आशिरगडे यांचा गौरव केला. चर्चेतील वक्ते डॉ. आशाताई सावदेकर यांनी एकूणच चित्रपट माध्यमावर प्रकाश टाकला. कांदबरीला लागणारे निकष चित्रपटाला लागू शकत नाही. असेही त्या म्हणाल्या. डॉ. रविंद्र शोभणे यांनी चित्रपटातील नायिका 'सोनसळा' ही धर्म आणि धार्मिकतेच्या नावाखाली चिरडल्या जाणाऱ्या एकूणच स्त्रीचे प्रतिनिधित्व करणारी असल्याचा सूर त्यांनी व्यक्त केला. श्री. सतीश पिंपळे यांनी 'तांदळा-एक मुखवटा' या चित्रपटातून स्त्रीची विविध रुपे व्यक्त झाल्याचे म्हटले. या चर्चेत चित्रपटाच्या अनेक बाजुंवर विचार करण्यात आला. याप्रसंगी चित्रपट निर्मात्या माधुरी आशिरगडे व पटकथा लेखक प्रा. सुरेश द्वादशीवार उपस्थित होते. या परिचर्चेचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शुभा साठे यांनी केले. तर अरुणा सबाने यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

**रविवार १२ एप्रिल, २००९,** सप्तरंग नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. सुरेश भट यांच्या जयंतीनिमित्त गीत-गजल-काव्यसंध्येचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, १५ एप्रिल हा कवी स्व. सुरेश भट यांचा जन्मदिवस-भटांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला. भटांच्या रचना मराठी माणसांसाठी, मराठी काव्यासाठी, मराठी साहित्यासाठी फार मोलाच्या आहेत. माणसं नेहमी भविष्याची काळजी करतात. पण

भटांची जीवनशैली काही निराळीच होती. भविष्याची चिंता न करता पूर्णतः आपल्या काव्यात रमणारे, जगणारे कवी भटांचे व्यक्तिमत्व होते अशा अनेक स्मृतींना या प्रसंगी त्यांनी उजाळा दिला. देविदास इंदापवार, आशा पांडे, सुचित्रा कातरकर, शुभांगी रथकंठीवार, सुमती वानखेडे, मिलींद देशपांडे, विष्णू मनोहर, रसिका चाटी या विदर्भातील गजल-गायन क्षेत्रातील तीन पिढ्यांनी आपापल्या उत्तमोत्तम रचना सादर केल्या.

''मनातल्या मनात मी तुझ्या समीप राहतो'', ''देखावे बघण्याचे वय निघून गेले'', ''सुन्या-सुन्या मैफलीत माझ्या'', अशा शास्त्रोक्त संगीताची बैठक असलेल्या गीतांनी, गायनांनी रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. काव्यसंध्येचे सूत्रसंचालन मंगेश बागवसे यांनी केले. गजलकारांना त्यांच्या रचनांना साथ देत सुमती वानखेडे यांनी भटांच्या काव्यातील राधाभाव दाखवित निवेदनाने कार्यक्रमाची रंगत वाढविली. काव्यसंध्येचे प्रमुख पाहुणे श्री. कमलाकर धारप यांनीही भटांच्या अनेक आठवणी सांगून रसिकांना गतकाळात नेले.

**शुक्रवार १ मे, २००९,** ऋचा प्रकाशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. सौ. विजया मारोतराव ह्यांच्या ''सार्थक'' कथासंग्रह प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.गिरीश गांधी होते. प्रसिद्ध लेखिका सौ. शुभांगी भडभडे यांच्या शुभहस्ते कथासंग्रहाचे प्रकाशन झाले. डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. प्रज्ञा आपटे, कादंबरीकार सौ. विजया ब्राह्मणकर इत्यादी मान्यवर वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रा. सौ. विजया मारोतकर ह्यांच्या कथांमध्ये कादंबरीची बीजे सापडतात. असे शुभांगी भडभडे यांनी आपले मत व्यक्त केले. या संग्रहामध्ये लेखिकेने सामाजिक भान जपले आहे. असे सौ. प्रज्ञा आपटे यांनी व्यक्त केले. 'संवेदनशीलतेचा हुंकार म्हणजे सार्थक मधील कथा असे विजया ब्राह्मणकर म्हणाल्या. डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी कथाप्रकाराच्या निर्मितीवर प्रकाश टाकला. कथा लेखकाजवळ अनुभव समृद्धता आणि संवेदनशीलता असावीच लागते.असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. लिना निकम यांनी केले. सूत्रसंचालन शैल जैमिनी यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री. धनंजय मांडवकर यांनी केले.

**मंगळवार ५ मे, २००९,** केंद्राच्यावतीने ''ओंजळीभर पाणी'' या महाड येथील पाणी प्रश्नावरील लघु चित्रपट परिचर्चेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांनी लघु चित्रपट माध्यमांच्या मर्यादांकडे लक्ष वेधले. लघु-चित्रपटाचे एक वेगळे महत्त्व असते. या क्षेत्रात सातत्याने काम करणे महत्त्वाचे आहे. चित्रपट निर्मितीच्या संस्कृतीची विदर्भात रुजुवात होत आहे याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. ''ओंजळीभर पाणी'' हा चित्रपट महाड पाणी प्रश्नाच्या केंद्रवर्ती बिंदूवर आधारित होता. या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीवर त्यांच्या विचारांवरही प्रकाश टाकला. आजच्या तरुण पिढीला सामाजिक प्रश्नांची जाणीव नाही. अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. मा. प्रा. सुरेश द्वादशीवार मा. श्री. प्रदीप मैत्र, मा. डॉ. प्रदीप आगलावे इत्यादी मान्यवर वक्ते म्हणून उपस्थित होते. श्री. ताराचंद खांडेकर, डॉ. विनोद इंदूरकर, इ. मु. नारनवरे आदी मान्यवर अतिथी वक्ते म्हणून सहभागी होते. लेखक-दिग्दर्शक श्री. प्रभाकर दुपारे व नरेंद्र शिंदे ही द्वयी प्रामुख्याने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय भाकरे यांनी केले. कार्यक्रमास चित्रपटातील कलावंत आणि रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गुरुवार ११ जून, २००९** केंद्राच्यावतीने स्व. साने गुरुजी यांच्या पुण्यतिथिनिमित्त ''राष्ट्रविकासात प्राथमिक शिक्षण आणि शिक्षकाचे योगदान'' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ रंगकर्मी मा. श्री. गणेश नायडू होते. याप्रसंगी त्यांनी संस्काराची आजची गरज आणि स्व. साने गुरुजी यांच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्या साहित्याचा परिचय करून दिला.

शिक्षण विभागाचे उपसंचालक मा. श्री. गोविंद नांदेडे यांनी आपल्या व्याख्यानात शाळेच्या उंबरठ्यावरच राष्ट्रविकासाची सुरुवात होते असा सूर लावला. शिक्षक हा विद्यार्थी घडविण्यासोबतच राष्ट्र घडविण्याचे काम करीत असतो. शिक्षकाने विद्यार्थ्यांवर संस्कार करणे महत्त्वाचे आहे. तर शिक्षकांना प्रोत्साहन देण्याचे काम प्रशासनाने केले तर शिक्षण क्षेत्रातील समस्या सुटतील अशी आशावादी भूमिका स्पष्ट केली. केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी ते म्हणाले की, शिक्षकाचा संबंध हा राष्ट्रविकासात महत्त्वाचा असून

त्यांच्या संस्कारांची, आदर्शाची आज आपल्या समाजाला, राष्ट्राला नितांत गरज आहे. शैक्षणिक चर्चा, उपक्रम याकडे आपण डोळसपणे पाहिले पाहिजे. सूत्रसंचालन धनंजय मांडवकर यांनी केले. तर आभारप्रदर्शन डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी मानले.

**गुरूवार २१ जून, २००९,** दहावी-बारावीच्या निकालानंतर सर्व स्तरांतून त्यावर उमटणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांच्या, आशा-अपेक्षांचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम त्यांच्या समस्या, ताणतणाव अशा अनेक मुद्यांवर प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजा आकाश यांच्या ''परीक्षांचा निकाल आणि पालक, शिक्षक व समाजाची भूमिका'' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसोबतच आता विद्यार्थ्यांच्या आत्महत्या ही गंभीर समस्या आपल्यापुढे निर्माण झाली आहे. परीक्षांच्या निकालानंतर मुलांच्या आत्महत्त्येसाठी पालकांचे वागणे मोठ्या प्रमाणावर जबाबदार असते. पूर्वी शाळांमधून विद्यार्थी घडविणे मिशन समजले जायचे. आता शाळा पूर्णपणे व्यावसायिक बनल्या आहेत. म्हणूनच शिक्षक व शाळाही दोषी आहेत असे ते म्हणाले. डॉ. पल्लवी देशपांडे यांनी शिक्षण प्रतिनिधी म्हणून आपली भूमिका मांडली. विद्यार्थ्यांनी आपल्या समस्या प्रश्नाच्या स्वरुपात लिहून दिल्या. जतीन धिया व विहार मेश्राम या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले व श्री. मेश्राम यांनी पालक म्हणून थोडक्यात आपले विचार व्यक्त केले. डॉ. नामदेव सास्ते यांनी अध्यक्षीय भाषणात पालकांना मुलांबद्दल सकारात्मक भूमिका ठेवण्याचा सल्ला दिला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. प्रतिष्ठानच्या सदस्या सौ. मनीषा साधू यांनी प्रास्ताविक केले व सौ. रेखा दंडिगे यांनी संचालन केले. प्रा. कोमल ठाकरे यांनी आभार मानले. डॉ. चंद्रभान भोयर, डॉ. प्रमोद मुनघाटे हे देखील मंचावर उपस्थित होते.

**गुरुवार १६ जुलै, २००९,** विदर्भ साहित्य संघ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनयसम्राट निळू फुले यांच्या श्रध्दांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर होते. पडद्यावरचा खलनायक समाजाचा महानायक होता. अशा शब्दात श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी श्रद्धांजली वाहिली. श्री. गिरीश गांधी यांनी आपल्या प्रास्ताविकात निळूभाऊंच्या आठवणी सांगतांना म्हटले की, ''त्यांनी खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जपली.'' सामाजिक कृतज्ञता निधी हे त्यांचे फार मोठे कार्य आहे. त्यांच्या जाण्याने प्रबोधनाच्या चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रसंगी निळू फुले, शांताराम नांदगावकर, हबीब तन्वीर, मायकल जॅक्सन या दिवंगतांना प्रतिष्ठानतर्फे श्रध्दांजली अर्पण केली. रमेश थोरात, अरुणा सबाने, कमल वाघधरे या वक्त्यांनी निळूभाऊंच्या सामाजिक आणि कलेच्या क्षेत्रातील आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश ऐदलाबादकर यांनी केले. सभेच्या शेवटी उपस्थितांनी दिवंगतांना मूक श्रद्धांजली अर्पण केली.

**सोमवार २० जुलै, २००९,** कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कालिदास पर्व निमित्ताने सायंटिफिक सभागृहात ''आषाढस्य प्रथम दिवसे'' या नृत्यनाटिकेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे होते. ''आषाढस्य प्रथम दिवसे'' या कार्यक्रमासंदर्भात काही विद्वानांनी वाद घातला असला तरी त्या वादाकडे दुर्लक्ष करून कालिदासाचे साहित्य सामान्य लोकांपर्यंत कसे पोहोचेल त्यादृष्टीने वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे. कालिदासांची काव्ये ही पर्यावरणाशी संबंधित आहेत. कालिदास आपल्या भारतीय परंपरेचे आणि संस्कृतीचे प्रतिक आहेत. कालिदासांच्या काव्याला संपूर्ण जगात प्रतिष्ठा आहे असे श्री. गिरीश गांधी म्हणाले. नृत्यनाटिकेचे संयोजन आणि नृत्य दिग्दर्शन डॉ. साधना नाफडे यांनी केले. एकूण तीस कलावंतांचा या नृत्यनाटिकेत सहभाग होता. काव्य मुकुंद पुल्लीवार यांचे तर संगीत पुरुषोत्तम सामक यांचे होते. विद्यापीठाच्या संस्कृत विभागप्रमुख डॉ. नंदापुरी यांनी प्रास्ताविक केले. व्यासपीठावर श्री. विजय जिचकार, साधना नाफडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रेणूका देशकर यांनी केले. कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद होता.

**गुरूवार ६ ऑगस्ट, २००९,** महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. बाळकृष्ण दाभाडे यांच्या

जन्मशताब्दीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी म. ना. लोही वक्ते म्हणून उपस्थित होते. आपल्या व्याख्यानात प्रा. म. ना. लोही यांनी प्रा. दाभाडे यांच्या कार्याचा परिचय करून दिला. त्यांचे कलाविषयक लेखन, संशोधन यावर विवेचन केले व आठवणी सांगितल्या. डॉ. प्रमोद मुनघाटे त्यांच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, सांस्कृतिक क्षेत्रातील परिवर्तन व प्रगती यापेक्षा लौकिक क्षेत्रातील परिवर्तन व प्रगती याचीच चर्चा जास्त होते. त्यामुळे अनेक कला सेवक उपेक्षितच राहतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्रीकांत दाभाडे यांनी केले. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, नागपूरचे सचिव जगदीश जोशी यांनी आभार मानले. प्रकाश एदलाबादकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. याप्रसंगी केंद्राचे अध्यक्ष गिरीश गांधी मंचावर उपस्थित होते.

**रविवार १६ ऑगस्ट, २००९,** माग्रस यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन चर्चेचे आयोजन करण्यात आले. 'माग्रस' या ग्रंथवाचन चळवळीच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त आदिवासींच्या आरोग्याची काळजी घेणारे पद्मश्री व मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित डॉ. प्रकाश आमटे यांचे 'प्रकाशवाटा' आणि चंद्रकांत पाटील यांच्या 'कवितांतरण' या दोन पुस्तकांवर चर्चा करण्यात आली. वृंदा जोगळेकर यांनी 'प्रकाशवाटा' या पुस्तकावर चर्चा केली. श्री. प्रफुल्ल शिलेदार यांनी 'कवितांतरण' या पुस्तकावर चर्चा प्रस्तुत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघना वाहोकर यांनी केले. याप्रसंगी माग्रसचे प्रमुख सुधीर देव, श्रीमती अपर्णा देव प्रामुख्याने उपस्थित होते.

**मंगळवार १८ ऑगस्ट, २००९,** केंद्राच्यावतीने ''कवी-नवे, कवी-जुने'' - काव्यमैफलीचे आयोजत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. ज्ञानेश वाकुडकर होते. व्यासपीठावर सौ. मनीषा साधू, डॉ. कोमल ठाकरे, डॉ. चंद्रभान भोयर प्रामुख्याने उपस्थित होते. ''कवी-नवे, कवी-जुने'' - या काव्यमैफलीची सुरुवात श्रीकांत तनखिवाले यांनी 'फाशी' ही मराठी गजल तर सौ. मनीषा साधू यांनी 'रंगरेषा' आणि डॉ. यादव गावळे यांनी 'भेगा' तसेच बाळकृष्ण बन्नोरे यांनी 'पद्मज' कविता सादर केली. प्रसन्न शेंबेकर यांनी 'राजे तुम्ही कुठे आहात?......' ही कविता सादर करून वास्तवतेचा प्रत्यय दिला. बळवंत भोयर यांनी 'समुद्रवर्तुळ' तर तुषार जोशी यांनी 'पिंजऱ्यातील मैना' तसेच जयश्री अंबासकर यांनी 'पावसाचा आस्वाद' ही कविता सादर केली.

**२९, ३०, ऑगस्ट, २००९,** बोधी नाट्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने द्विदिवसीय नाट्य लेखन कार्यशाळेचे दि. २९, ३० ऑगस्ट, २००९ रोजी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ रंगकर्मी राम जाधव, यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्या दिवशीच्या सत्राचे अध्यक्ष नाट्य समीक्षक सुरेश मेश्राम, प्रमुख अतिथी, मा. गिरीश गांधी, प्रसिद्ध नाटककार प्रेमानंद गज्वी, ललित खोब्रागडे आदी मान्यवर उपस्थित होते. तेच ते लिखाण, रंगभूमीवर सातत्याने आल्यामुळे ही चळवळ क्षीण होत गेली. या कार्यशाळेच्या माध्यमातून चांगल्या संहिता निर्माण व्हाव्यात असे सांगून या चळवळीचा आरंभीच समारोप होऊ नये अशी अपेक्षा श्री. गिरीश गांधी यांनी व्यक्त केली. कुठल्याही तांत्रिक बाजुंची मदत न घेता जी संहिता किंवा त्याचे सादरीकरण रसिकांच्या मनाची पकड घेते ते खरे नाटक आहे. नाटकाचा मूळ उद्देश केवळ मनोरंजन नाही. सामान्यांच्या व्यथा आणि वेदनांना वाट मोकळी करून देणारा हा कलाप्रकार आहे असे राम माधव यांनी उद्घाटन-पर भाषणात आपले विचार व्यक्त केले. कार्यशाळेचे अध्यक्ष डॉ. सुरेश मेश्राम यांनी नाट्यचळवळीत समीक्षक तयार झाले नाहीत ही खंत व्यक्त केली. नागपूरचे महेंद्र सुके यांचे 'काळा झेंडा कुणाचा', मुंबईचे राजेश शिर्के यांचे 'चौकट', नाशिकचे भगवान हिरे यांचे 'एकदा पुन्हा नव्याने व चंद्रपूरचे श्रीपाद जोशी यांचे 'जा-तिच्याशिवाय काही अडत नाही'. या चार नाटकांचे वाचन करण्यात आले. या नाटकांवर निरीक्षक-चर्चक म्हणून गिरीश पतके, हरिश इथापे, रमेश लखनापुरे, निरंजन मार्कन्डेयवार, पराग घोंगे, अशोक जांभूळकर, संजय जीवने, कमल वाघधरे, ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत यांनी चर्चा केली.

# विभागीय केंद्र, औरंगाबाद
## कार्यवृत्त

**शनिवार व रविवार दि. २८ व २९ मार्च २००९,** यशवंतराव फिल्म फेस्टिव्हल फिल्म्स डिव्हिजन, सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंत फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन स. भु. नाट्यशास्त्र सभागृहात करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन शनिवार , दि. २८ मार्च ०९ रोजी सायं. ५ वा. प्रसिद्ध साहित्यिक मा. प्राचार्य रा. रं. बोराडे यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे, अध्यक्ष मा. नंदकिशोरजी कागलीवाल हे होते. यावेळी कोषाध्यक्ष मा. सचिन मुळे, सचिव मा. मुकुंद भोगले, मा. विजय कान्हेकर, मा. सुहास तेंडुलकर, मा. राहुल नरवडे आदींची उपस्थिती होती. या महोत्सवात एकूण चार फिल्म्स दाखविण्यात आल्या, त्यामध्ये पहिल्या दिवशी उद्घाटन सोहळ्यानंतर 'द लिटल टेररिस्ट' ही अश्विनकुमार दिग्दर्शित हिंदी फिल्म दाखविण्यात आली. या फिल्ममध्ये एक बारा वर्षांचा भारत-पाकिस्तान सीमेवरील गावामध्ये राहणारा पाकिस्तानी मुलगा, चुकून भारतीय हद्दीत प्रवेश करतो आणि एक भारतीय कुटुंब त्याची काळजी घेते. अशा तऱ्हेने पुढे वेगळे वळण घेणारी ही फिल्म होती यानंतर लक्ष्मीकांत शेटगावकर दिग्दर्शित 'अ सी साईड स्टोरी' या मराठी-इंग्रजी फिल्ममध्ये गोव्यातील एका छोट्या खेड्यात राहणाऱ्या एका शिक्षकाची कथा दाखविण्यात आली असून त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या विविध अनुभवांची मांडणी या फिल्ममधून करण्यात आली होती. फेस्टिव्हलच्या दुसऱ्या दिवशी 'हरवलेले इंद्रधनुष्य' ही धीरज मेश्राम दिग्दर्शित मराठी फिल्म आली. यामध्ये दोन भावांच्या गावाकडील आठवणींचा मागोवा घेण्यात आला. यानंतर अतुल पेठे दिग्दर्शित 'कचराकोंडी' ही अनेक अंगांनी सर्वांच्या चर्चेचा विषय ठरलेली मराठी फिल्म दाखविण्यात आली.

**गुरूवार दि. १८ जून ०९,** केंद्रातर्फे मराठवाडा विभागीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा महसूल प्रबोधिनीच्या मुख्य सभागृहात दुपारी २ ते ४ या वेळेत ही कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी मंचावर अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे, सहसंयोजक मा. विश्वास ठाकूर, राज्य संघटक नीलेश राऊत, केंद्राचे कोषाध्यक्ष मा. सचिन मुळे, समन्वयक मा. सुहास तेंडुलकर उपस्थित होते. यावेळी मा. सुप्रिया सुळे यांनी युवक-युवतींशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, राज्यातील युवांची पिढी सशक्त बनवायची असेल, तर राज्याला आदर्श युवा धोरण असणे आवश्यक आहे आणि त्यासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियान प्रयत्नशील आहे. यासाठी राज्य युवा धोरणाचा जाहिरनामा तयार करण्याचे कार्य हाती घेण्यात आले असून त्यामध्ये युवांशी संबंधित सर्वांगीण विकासासाठी आवश्यक तरतुदी करण्यासाठी शासनाकडे मागणीही करण्यात आलेली आहे. मा. सुळे यांनी युवा धोरण सर्वांना समान न्याय देणारे असावे, ही अपेक्षा व्यक्त केली.

कार्यशाळेचे प्रास्ताविक राज्य संघटक नीलेश राऊत यांनी केले. १३ ते ३५ वर्षे या वयोगटातील युवांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी युवा धोरणाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. मा. सचिन मुळे यांनी मराठवाड्यातील युवांच्या शैक्षणिक समस्यांकडे लक्ष वेधले. या अनुषंगाने युवा धोरणात विशेष तरतुदी असणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी उल्हास उढाण, शिवाजी गावंडे युवा धोरणाविषयी आपले मत, अपेक्षा व्यक्त केल्या. या कार्यशाळेला मराठवाड्यातील सुमारे १५० युवक-युवतींची उपस्थिती होती.

**गुरुवार, दि. १२ मार्च २००९,** धुरंधर राष्ट्रीय नेते व महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जयंतीनिमित्त गांधी भवन येथे विभागीय केंद्रातर्फे अभिवादनाचा कार्यक्रम आजोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी केंद्राचे कोषाध्यक्ष मा. सचिन मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मा. सचिन मुळे यांनी आदणीय चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला अभिवादन केले. आपल्या मनोगतात चव्हाण साहेबांच्या कर्तुत्वाचा

आढावा घेतला. यावेळी केंद्राचे संघटक सुबोध जाधव, सहसंघटक अभिजित विटोरे, महात्मा गांधी सेवा संघाचे राजेभाऊ गोकुळअष्टमी यांची उपस्थिती होती. आभार प्रदर्शन सुबोध जाधव यांनी केले.

**गुरुवार, दि. १८ जून २००९,** मराठवाड्यातील शालेय स्तरावरील प्राथमिक शिक्षणाच्या दर्जाबद्दल विचारमंथन करण्यासाठी औरंगाबाद येथे शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा विभागीय सर्वांगीण शिक्षण गुणवत्ता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शासकीय महाविद्यालयाशेजारी असणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्सच्या स्व. भानुदासराव चव्हाण सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही कार्यशाळा पार पडली. सकाळी ९ ते १० या वेळेत कार्यशाळेसाठी नाव नोंदणी करण्यात आली. १० वाजता कार्यशाळेचे उद्घाटन खा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. वि. वि. चिपळूणकर, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कुमुद बन्सल उपस्थित होते. ११.३० ते १२.३० या वेळेत विविध विषयांवर तज्ज्ञांचे सादरीकरण झाले. यामध्ये मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षण - सद्यःस्थिती व पुढील दिशा, मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणातील गळती, मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता, मराठवाड्यातील मुलींचे प्राथमिक शिक्षण, मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणातील गळती, मराठवाड्यातील स्थलांतरितांच्या मुलांचे प्राथमिक शिक्षण, अल्पसंख्याक आणि मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षण या विषयांचा अंतर्भाव होता. दुपारी १२.३० ते १ या वेळेत लोकप्रतिनिधी व मराठवाड्यातील जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रियांचे सादरीकरण झाले. दुपारी २ ते सायंकाळी ४ या वेळेत गटचर्चा पार पडली. यामध्ये मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणातील गळती, मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता, मराठवाड्यातील मुलींचे प्राथमिक शिक्षण, मराठवाड्यातील स्थलांतरितांच्या मुलांचे प्राथमिक शिक्षण, अल्पसंख्याक आणि मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षण या विषयांचा अंतर्भाव होता. ४ ते ५.३० या वेळेत गटांच्या अहवालांचे सादरीकरण झाले. या कार्यशाळेत मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाच्या सर्वांगीण विकाससंदर्भात संबंधित तज्ज्ञांचे सादरीकरण, गटचर्चा व लोकप्रतिनीधी, जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रियांचे सादरीकरण झाले. कार्यशाळेमध्ये शासनाच्या विविध अधिकाऱ्यांसह स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी व शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटनांच्या सुमारे २०० प्रतिनिधींचा सहभाग होता. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये गळतीचा प्रश्न गंभीर प्रमाणात आहे. प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेचाही प्रश्न गंभीर आहे. तसेच स्थलांतरितांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्नही भेडसावतो आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील प्राथमिक शाळांची गुवणत्ता वाढविण्यासाठी आतापर्यंत झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला. प्राथमिक विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणण्यासाठी कार्यशाळेमध्ये उपाययोजना सुचविण्यात आल्या. या कार्यशाळेस शिक्षक, संस्थाचालक, अभ्यासक, संघटनांचे प्रतिनिधी व पालक उपस्थित होते.

**दि. १८ जून व२५ जुलै ०९,** औरंगाबाद येथे मा. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्विनी अभियानाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. महसूल प्रबोधिनी, औरंगाबाद येथे दुपारी २ ते ४ या वेळेत संपन्न झालेल्या या बैठकीसाठी औरंगाबाद विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष मा. सचिन मुळे, मा. विश्वास ठाकूर, मा. सुहास तेंडुलकर, मा. आशा भिसे, नीलेश राऊत, मा. शकुंतला कदम, मा. वैशाली मोटे उपस्थित होते. यावेळी यशस्विनी अभियानाच्या सर्व विभागीय, जिल्हा व तालुका समन्वयिका उपस्थित होत्या. यामध्ये बचत गटामार्फत काम करताना झालेले उत्पादन, काम करताना येणाऱ्या अडचणी अधिकाधिक प्रमाणात उत्पादन कसे वाढवावे, या संबंधी विचारमंथन करण्यात आले. यावेळी मा. सुप्रिया सुळे यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला. मा. विश्वास ठाकूर, मा. सचिन मुळे यांनी आपले विचार मांडले. शनिवार, दि. २५ जुलै ०९ रोजी

विवेकानंद महाविद्यालय व नंदनवन कॉलनी येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या केंद्रावर यशस्विनी अभियानाची कार्यशाळा संपन्न झाली. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेमध्ये महिलांना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले. महिला सक्षमीकरणासाठी काय पावले उचलावी लागतील, या संदर्भात या कार्यशाळेमध्ये विचारमंथन करण्यात आले. कार्यशाळेसाठी ग्रामीण महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

**गुरूवार, दि. १८ जून ०९,** अपंग हक्क विकास मंचातर्फे शासकीय रुग्णालय व महाविद्यालय, औरंगाबाद येथे मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते कृत्रिम अवयव वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी घाटीचे अधिष्ठाता मा. नंदकुमार द्रविड, विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष मा. सचिन मुळे, अपंग हक्क विकास मंचाचे समन्वयक मा. विजय कान्हेकर, राज्य संघटक नीलेश राऊत, मा. सुहास तेंडुलकर यांची उपस्थिती होती.

यावेळी गरजू विकलांग व्यक्तींना मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते कृत्रिम अवयवांचे वाटप करण्यात आले. तसेच महाविद्यालयामध्ये चालणाऱ्या कृत्रिम अवयचव निर्मिती केंद्रालाही मा. सुप्रिया सुळे यांनी भेट दिली.

**दि. ७ व ८ मार्च ०९,** देवगिरी महाविद्यालयामध्ये आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जयंतीनिमित्त आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन विभागीय केंद्रातर्फे करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन मा. आ. उल्हास पवार यांनी केले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून आ. लक्ष्मण माने, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. मधुकर अण्णा मुळे यांची उपस्थिती होती. दोन दिवस चाललेल्या या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये राज्यभरातून विशेष वक्त्यांची चर्चासत्रे आयोजित करण्यात आलेली होती. पाच सत्रांपैकी पहिल्या दिवशी पद्मभूषण रामप्रधान यांचे बीजभाषण झाले. यानंतर खा. डॉ. के. एम. वाघमारे, प्राचार्य पी. बी. पाटील, डॉ. नंदकुमार नाईक यांची चर्चासत्रे पार पडली. दुसऱ्या दिवशी पत्रकार मा. मधुकर भावे, ज्येष्ठ पत्रकार मा. रामभाऊ जोशी आदींची चर्चासत्रे पार पडली. या राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपाला केंद्राचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल, कोषाध्यक्ष मा. सचिन मुळे, मा. बापुसाहेब काळदाते, मा. मधुकरअण्णा मुळे, मा. विठ्ठलराव लहाने यांची उपस्थिती होती. तसेच चर्चासत्रादरम्यान कराड विभागीय केंद्रातर्फे प्रदर्शन लावण्यात आले होते. चर्चासत्राला राज्यभरातून २०० हून अधिक प्राध्यापकांची उपस्थिती होती.

**शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट ०९,** स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला विभागीय केंद्रातर्फे जवाहर कॉलनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाच्या परिसरामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी वाचनालयाचे अध्यक्ष मा. के. के. जाधव, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत, संघटक सुबोध जाधव, सहसंघटक अभिजित विटोरे, जिल्हा संघटक मंगेश निरंतर यांची उपस्थित होती. यावेळी उपस्थिती मान्यवरांनी व उपस्थितांनी प्रत्येकी एक-एक रोपटे लावून त्याच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. मा. के. के. जाधव यांनी पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी उपस्थितांना मार्गदर्शन करुन वृक्षारोपणाचे आजच्या काळातील महत्त्व प्रतिपादन केले. जागतिक तापमानवाढ टाळायची असेल तर वृक्ष संवर्धन आवश्यक असल्यावर त्यांनी भर देत सर्वांनी किमान आपल्या परसबागेत तरी वृक्षारोपण करावे, असे सुचविले.

कार्यक्रमाचा समारोप सुबोध जाधव यांनी आभार प्रदर्शनाने केला.

# विभागीय केंद्र, पुणे आणि कृषी व सहकार व्यासपीठ
# कार्यवृत्त

**कृषी व सहकार व्यासपीठ :**

कृषी व सहकार व्यासपीठाचे कार्यक्रम प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे आणि श्री. अंकुश काकडे, माजी महापौर, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली चालतात. प्रतिष्ठानच्या सर्व कार्यक्रमांना पद्मविभूषण मा. मोहन धारियासाहेब यांचे प्रमुख मार्गदर्शन मिळते. दैनंदिन कामकाजात श्री. श. त्रिं. भिडे, प्रा. प्र. त्र्यं. पंडित यांचा सहभाग असतो. निमंत्रक डॉ. भागवतराव पवार यांच्या मार्गदर्शनाचा लाभ व्यासपीठाच्या कामकाजास उपलब्ध झाला आहे.

**क) कृषी विभाग :**

१. भूमाता कृषीमंच व कृषी व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्राच्या कृषी योजनांवर चर्चासत्र घेण्यात आले त्यात डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. मा. बापूसाहेब खैरे यांनी समायोचित समारोप केला. त्यात प्रा. पंडित यांनी विषय मांडणी केली. कर्जमाफीबद्दलही एक संयुक्त कार्यक्रम याप्रमाणेच घेतला.

२. श्री. आनंदराव पाटील यांचेशी श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी जलसंधारण व चिकोत्रा प्रकल्पाबाबत वेळोवेळी चर्चा केली. समन्यायी पाणी परिषदेच्या सर्व कार्यक्रमांना, कार्यकारिणी सभांना व वार्षिक सर्वसाधारण सभेस प्रतिष्ठानचे वतीने प्रा. पंडित यांनी सहभाग घेतला. (दि. १५.४.०९)

३. अर्थसंकल्पावर एक चर्चासत्र प्रतिष्ठानने, प्रबोधन मंच संस्थेच्या सहकार्याने गरवारे महाविद्यालयात आयोजित केले. त्यामध्ये फर्ग्युसन कॉलेजचे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. प्रदीप आपटे यांचे प्रमुख व्याख्यान आयोजिण्यात आले. श्री. मिरासदार यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले. चर्चासत्र मा. बापूसाहेब खैरे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. (दि. १० जुलै २००९)

४. कृषिविषयक शिक्षणावरील सद्यस्थितीबाबत एक चर्चासत्र 'बळीराजा' मासिकाचे सहकार्याने आयोजिण्यात आले. यावेळी श्री. प्रदीप पाटील यांचे मुख्य भाषण झाले.

५. दि. १२.२.०९ रोजी महाराष्ट्र वॉटर रिसोर्सिस रेग्युलेटरी ॲथारिटीची जी बैठक पुणे येथे आयोजिण्यात आली होती त्यामध्ये पाणीदर चर्चेचे अनुषंगाने संस्थाकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. याबाबत वनराईशी चर्चा करुन 'वनराई' व प्रतिष्ठान यांचे समान अभिप्राय श्री. भिडे यांनी तयार केले ते सादर करण्यात आले. त्या अनुषंगाने सदर ॲथारिटीचा इंटरनेटवर उपलब्ध अहवालाचा सारांश मराठीतून शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावा ही सूचना मान्य करण्यात आली आहे. सदर चर्चेत प्रा. पंडित यांनी प्रतिष्ठानचे प्रतिनिधित्व केले.

६. डॉ. भागवतराव पवार यांचे पुढाकाराने महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण भागात वनौषधी लागवडीबाबत एक कार्यशाळा घेण्यात आली. रत्नागिरी जिल्ह्यातील निवडक गावात वनौषधी प्रकल्प घेण्यात येत असल्याचे समजल्यावरुन त्याबाबतची माहिती श्री. राजाभाऊ लिमये यांचेकडून श्री. बापूसाहेब खैरे यांचे सूचनेनुसार मागविण्यात आली. ती प्राप्त झाली असून पुढील कार्यवाहीवर विचार चालू आहे.

७. दिल्ली येथील सिटा (Centre for International Trade in Agriculture) यासंस्थेच्या वतीने डॉ. भागवतराव पवार हे मराठी ''शरद कृषि'' या मासिकांचे संपादक म्हणून कामकाज पाहतात. व्यासपीठाचे निमंत्रक म्हणून त्यांनी वेळोवेळी प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयास भेट देऊन कार्यक्रमाचे आयोजनाबाबत चर्चा व मार्गदर्शन केले व कार्यक्रमांत सहभाग घेतला.

८. प्रा. पंडित यांनी खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल येथील कोकण कृषी विद्यापीठाचे मत्स्य विज्ञान शाखेच्या वतीने झालेल्या 'मत्स्यसंवर्धन' विषयक चर्चासत्रात उपस्थित राहून मार्गदर्शनपर विषयमांडणी केली व कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक कुलगुरु डॉ. मेहता व अन्य संबंधितांशी चर्चा केली.

९. 'पाणी' विषयावरील अभ्यासक व कात्रणसंग्राहक श्री. चंदनपूरकर यांनी वेळोवेळी (दि. १२.४.०९ इ.)

प्रतिष्ठानमध्ये येऊन त्यांचे लिखाण देऊन श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी चर्चा केली.

१०. ग्रामीण पतसंस्थांनी मिनी किसान बँकांप्रमाणे काम करावे असा प्रयोग कोल्हापूर जिल्हा म. स. बँकेने केला आहे. त्याबाबत कोल्हापूर विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. जुगळे तसेच सहकार विभागाशी मा. बापूसाहेब खैर यांनी पत्रव्यवहार चालू ठेवला आहे. (दि. ३१.७.०९) महाराष्ट्राचे सहकारी कृषिपंत संस्थांचे पुनरुज्जीवन कार्यक्रमामध्ये को ऑपरेटीव्ह व्हीन्सेज बँक / मिनी किसान बँक योजनेवर भर देण्यात यावा यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

**ख) सहकार:**

१. व्यासपीठातर्फे तज्ज्ञांचे अभ्यासमंडळ सर्वसाधारणपणे दरमहा भरविण्यात येते. यांचे काम श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे यांच्या अध्यक्षतेखाली म्हणून चालू आहे. त्यात आता मा. बी. डी. पवार यांचेही मार्गदर्शन मिळते. कार्यक्रमाचे आयोजन श्री. भिडे आणि प्रा. पंडित करतात. चर्चेत प्रा. रथसाहेब, श्री. कोरान्नेसाहेब, डॉ कामत, प्रा. नाडकर्णी, प्रा. घाणेकर व इतर तज्ज्ञमंडळी सहभाग घेतात. काही निवडक चर्चासत्रात भारत सरकारचे निवृत्त सचिव डॉ. पद्माकर दुभाषीसाहेब हे उपस्थित राहून सहभागी होऊन मार्गदर्शन करतात.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० यामध्ये केंद्रशासनच बहूराज्य सरकारी संस्था कायद्याप्रमाणे सहकाराची मूलतत्वे यांचा अंतर्भाव करण्याच्या प्रस्तावाबाबत वेगवेगळ्या स्तरावर व्यासपीठातर्फे पाठपुरावा चालू ठेवला आहे. त्याचप्रमाणे संसदेमध्ये सहकारी कायद्याबद्दल जे दुरुस्ती विधेयक पेश झाले आहे. त्याबाबत केंद्रशासनाशी पत्रव्यवहार चालू आहे.

३. वैद्यनाथन समिती शिफारशीवर महाराष्ट्र शासनाने सहकारी संस्था अधिनियमातील केलेल्या सुधारणांतील उणीवांबाबत श्री. भिडे यांनी तयार केलेल्या टिपणीवर मा. धारिया व श्री. खैरे यांच्या स्वाक्षरीने प्रस्ताव अनुक्रमे केंद्र व राज्य शासनास पाठविण्यात आले त्याचा पाठपुरावा चालू ठेवला आहे. या संबंधाने मा. प्रधान सचिव सहकार यांचेशीही पत्रव्यवहार चालू आहे.

४. मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने हाऊसिंग सोसायट्या संबंधात क्रांतिकारक निर्णय दिला आहे. या निर्णयामुळे समाजात दुफळी माजेल. हा निर्णय राज्याच्या निर्देशित धोरणाचे विरुद्ध आहे. या ज्वलंत विषयावर अभ्यास मंडळात सविस्तर चर्चा झाली आणि त्याप्रमाणे व्यासपीठामार्फत नाम सहकारमंत्री, मा. सहकार आयुक्त यांच्याशी जो पत्रव्यवहार केला आहे याचा पाठपुरावा मा. सहकार आयुक्त व शासन अशा वेगवेगळ्या स्तरांवर करण्याचे या कालावधीत चालू ठेवले. आता आत्मनिर्भर सह. संस्था कायदा गृहनिर्माण संस्थांना लागू करणेबाबतचा प्रस्ताव मा. हर्षवर्धन पाटील मंत्री महोदय (सहकार) यांना मा. बापूसाहेब खैरे विश्वस्त प्रतिष्ठान यांचे सहीने त्याचा पाठपुरावा सादर केला आहे.

५. 'सहकार भारती' च्या वतीने पतसंस्थांसाठी या कालावधीत जे अभ्यासवर्ग घेण्यात आला त्याला प्रा. पंडित यांनी सहभाग घेतला.

६. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या ९० व्या वर्धापन दिनी प्रतिष्ठानचे वतीने सर्वश्री भिडे व पंडित यांनी कृषि व सहकार व्यासपीठाचे प्रतिनीधीत्व केले व संघाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा केली.

७. नॅशनल लेबर कॉन्ट्रॅक्ट को ऑपरेटिव्ह सोसायटीज फेडरेशन, नवी दिल्ली यांचे वतीने पश्चिम विभागीय क्षेत्रातील मजूर सहकारी संस्थांचे संचालक मंडळाचे सभासदांसाठी कै. विठ्ठलराव विखे पाटील राष्ट्रीय सहकार प्रबंध संस्थान पुणे येथे दोन दिवसांची एक कार्यशाळा आयोजिण्यात आली होती. उद्घाटनाचे प्रमुख व्याख्याते नवी दिल्लीवरुन येणार होते, मात्र ऐनवेळी काही अडचणींमुळे ते येणार नसल्याने संस्थेचे प्राचार्य जोशी यांनी प्रतिष्ठानचे श्री. शंकर त्रिंबक भिडे यांना प्रॉब्लेम्स बिफोर दी मॅनेजमेंट बोर्डस् ऑफ लेबर कॉन्ट्रक्ट सोसायटीज या विषयावर कार्यशाळेचे उद्घाटनाचे व्याख्यान देण्यास आमंत्रित केले. त्यानुसार श्री. भिडे यांचे मजूर सहकारी संस्थांचे प्रतिनिधीसमोर व्याख्यान झाले. श्री. पंडितही या व्याख्यानास निमंत्रणावरुन हजर होते.

८. सहकारी घरबांधणी संस्थांच्या मा. सहकार आयुक्त यांच्या कार्यालयाने तयार केलेल्या उपविधींसंबंधी त्या कार्यालयातील अपर आयुक्तांनी श्री. शेळकेनी सुचविल्यानुसार सर्व

संबंधितांबरोबर तीन वेळा (दि. ३०.३०.०९, २०.४.०९३) चर्चासत्रे आयोजित करुन त्यासंबंधी सविस्तर सुधारणा/बदल याबाबत टिपण मा. सहकार आयुक्तांना श्री. भिडे यांनी सदर केले आहे.

९. सहकारी बँकांच्या ऑडीट बाबतीत रिझर्व्ह बँकेने काही पावले उचलावीत जेणे करुन ऑडिट अलॉटमेटच्या तक्रारी दूर होतील. यासाठी रिझर्व्ह बँकेच्या मा. (Dy. Governer) श्रीमती उषाताई थोरात, यांना मा. बापूसाहेब खैरे यांचे स्वाक्षरीने विनंतीपत्र सादर करण्यात आले. (दि. १९.३.०९)

१०. सहकार अधिनियमात काही सुधारणा करण्याचे विधेयक लोकसभेत मांडण्यात येत असल्याचे वृत्तपत्रातून कळल्यामुळे त्यासंबंधी मा. मोहन धारिया यांच्या स्वाक्षरीने मा. ना. शरद पवार यांना तसेच अन्य संबंधितांना लिहिण्यात आले असून (दि. २७.७.०९) त्याचा पाठपुरावा चालू ठेवला आहे.

११. विशेष वसुली अधिकारी यांनी सहकारी कर्ज वसुलीसाठी कर्जदाराकडून मालमत्ता ताब्यात घेणेसंबंधी मा. सहकार आयुक्त यांनी काढलेल्या दि. २०.०३.०९ च्या परिपत्रकासंबंधी काही संबंधितांचे व तज्ज्ञांचे अभिप्राय मागवले असून त्यासंबंधी पुणे जिल्हा फेडरेशन्स यांचेशी विचारविनिमय चालू आहे.

१२. मा. सहकार आयुक्त यांचे कार्यालयातील अतिरिक्त निबंधक यांनी त्यांचे श्री. भिडे व प्रा. पंडित यांचेशी झालेल्या भेटीत सहकारी गृहनिर्माण संस्थांसंबंधी मा. उपलोकआयुक्त यांच्या एका महत्त्वाच्या पत्रांतील सूचनांवर टिपण तयार करुन देणेची विनंती केल्यावर त्यासंबंधी एक संबंधितांची बैठक घेऊन एक विस्तृत टिपण श्री. भिडे यांनी तयार केले. ते अतिरिक्त निबंधक सहकारी संस्था पुणे यांना सादर करण्यात आले. यावर चर्चा होऊन सदर टिपण राज्यस्तरीय समितीसमोर विचारार्थ ठेवावे असे ठरविणेत आले.

१३. शेतकरी आत्महत्यासंबंधी श्रीमती इंगोले यांच्या पुस्तकासंबंधी एक साहित्यिक चर्चा घेण्याचे मा. श्री. बापूसाहेब खैरे यांनी सुचविल्यानुसार लेखिकेशी श्री. भिडे यांनी संपर्क साधला. तसेच श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष श्री. वि. भा. देशपांडे यांचेशी चर्चा केली व त्यांनी सुचविल्यानुसार साहित्य परिषदेला मा. बापूसाहेब खैरे यांचे सहीने प्रस्ताव पाठवला आहे. (दि. ७.८.०९)

१४. सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी, महाराष्ट्र आत्मनिर्भर सहकारी संस्था अधिनियम तयार करण्यासाठी मा. सहकार आयुक्त यांनी एक समिती गठित केली असून त्यावर मा. बापूसाहेब खैरे यांची नियुक्त केली आहे. (दि. १०.७.०९)

**ग) माहितीचा अधिकार :**

१. 'माहितीचा अधिकार' कायदा मंजूर झाल्यानंतर त्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने डॉ. जोशी, मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र शासन यांचेशी झालेल्या चर्चेचे अनुषंगाने प्रतिष्ठानचे वतीने श्री. भिडे यांनी माहितीचा अधिकार कायदा यावर एक पुस्तिका 'यशदा' व मा. निवृत्त इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस श्री. मुश्रीफ यांचे मार्गदर्शन घेऊन लिहिली. सदर पुस्तिका मा. बापूसाहेब खैरे यांनी 'विशाल सह्याद्री' ट्रस्टचे वतीने प्रसिद्ध केली असून वेळोवेळी या विषयावर घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये त्याचे वितरण केले जाते.

२. यशवंतराव चव्हाण अॅकेडमी ऑफ डेव्हलपमेंट अॅडमिनिस्ट्रेशनचे (यशदाचे) माहिती विषयक सल्लागार श्री. प्रमोद माने, माजी आयुक्त अमरावती विभाग यांचे सूचनेवरुन श्री. प्रमोद माने, माजी आयुक्त अमरावती विभाग यांचे सूचनेवरुन श्री. शं. त्रिं. भिडे संयोजक कृषि सहकार व्यासपीठ यांनी एक ९० पानी पुस्तक ''माहितीचा अधिकार व सहकारी संस्था'' या विषयावर तयार करुन शासनाच्या 'यशदा' या संस्थेस सादर केले आहे. त्या पुस्तकाचे छापील प्रारुप मा. मानेसाहेब यांनी सहकार खात्याचे प्रधान सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल यांचेकडे मान्यतेसाठी सादर केले. त्यावर शासनाचा अनुकूल प्रतिसाद आला आहे. आता या विषयावर एका अपिलांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल आला असून त्यानुसार पुस्तकामध्ये दुरुस्ती करुन यशदाचे मा. माने यांचे सूचनेनुसार दुरुस्त प्रत यशदाचे श्री. सुनिल पाटील यांना देण्यात आली आहे.

३. युवकांच्या ''दिशा उत्थान'' या संस्थेबरोबर माहितीचा अधिकार या विषयावर एक कार्यशाळा, विशाल सह्याद्री ट्रस्टच्या सहकार्याने प्रतिष्ठानचे वतीने आयोजित करण्यात

आली. त्यास मार्गदर्शन करण्यासाठी सजग नागरीक मंच, पुणे अध्यक्ष श्री. विवेक वेलणकर तसेच डॉ. बोकील यांना मुद्दाम पाचारण केले होते. या कार्यक्रमास ''दिशा उत्थानच्या'' कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. बापूसाहेब खैरे यांनी स्वीकारुन मार्गदर्शन केले. तर श्री. भिडे यांनी प्रास्ताविक व श्री. पंडित यांनी आभार प्रदर्शन केले. श्री. मुकुंद काकडे यांचा प्रेस वार्ताहर ग्रुप या कार्यक्रमास हजर होता.

**घ) महिला व्यासपीठ :**

१. काळाच्या गतिमान ओघामध्ये बदलणाऱ्या समाज-व्यवस्थेमुळे स्त्रियांवरचा मानसिक, शारीरिक ताण वाढत चालला आहे. यासाठी अनेक महिला व महिला संस्था यांच्या सहकार्याने कार्यक्रम, उपक्रमांच्या माध्यमातून हा ताण कमी करण्यासाठी, स्वबळावर स्त्रियांनी समर्थ होण्यासाठी केंद्राच्या महिला व्यासपीठाच्या प्रमुख शैला लिमये प्रयत्न करीत असतात. त्यात डॉ. शेवाळे यांची त्यांना मदत होत असते. तसेच मा. बापूसाहेब खैरे यांचे मार्गदर्शनाचा लाभ होतो आणि प्रा. पंडित यांचा सहभाग असतो.

२. महिला व्यासपीठ व 'माझी मैत्रीण चॅरिटेबल ट्रस्ट' च्या वतीने पोळ्या, पुरणपोळ्या, ठेपले यांचे प्रशिक्षण तसेच मार्केटिंग, ब्रँडींग यावर श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडीत यांनी जे मार्गदर्शन केले. त्याच्या तसेच नवीन गट विकसित करण्यास व त्यांना 'स्पेन्सर' या मॉलमध्ये तयार माल विक्रीची संधी देण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले. त्याचा उपयोग झाला.

३. सोस्वा (स्पार्टी) या संस्थेत मा. खा. सुप्रिया सुळे यांचे मार्गदर्शनानुसार बचतगट बैठका व प्रशिक्षण विषयक चर्चा सत्रांत श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित सहभागी झाले. महिला बचत गट वस्तूंना बिग बझार, स्पेन्सर व इतर मॉलमध्ये विक्रीसाठी व्यवस्था केली आहे. त्यानुसार आयोजित केलेल्या बचत गट पदार्थांचे दोन प्रदर्शनांना श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित यांनी बचत गट महिलांना प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले.

**ङ) नवमहाराष्ट्र युवा अभियान :**

१. दि. १८ फेब्रु. २००९ युवा धोरणानिमित्त एक विशेष परिषदेचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यास युवक विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद होता. त्यात श्री. भिडे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तसेच प्रा. पंडित यांना परिषदेतील अभिनव पद्धतीप्रमाणे फलकावर संदेशलेखन केले.

**च) प्रतिष्ठानचे विभागीय केंद्र पुणे :**

१. या केंद्राचे काम विश्वस्त श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे आणि मा. अंकुश काकडे, माजी महापौर, पुणे आणि माजी महापौर मा. शांतिलाल सुरतवाला हे पाहतात. सर्वश्री भिडे व प्रा. पंडित हे सहभाग घेतात. डॉ. राम ताकवले केंद्राचे अध्यक्ष म्हणून रुजू झाल्यापासून त्यांचे मार्गदर्शन घेतले जाते.

२. प्रतिवर्षाप्रमाणे दि. १८ जून ०९ रोजी पहाटे ५ ते सकाळी ९ या वेळेत वारकऱ्यांना अल्पोहाराचे व औषधांचे वाटप करण्यात आले. त्याचा लाभ अंदाजे ८००० वारकऱ्यांनी घेतला. यावेळी मा. अंकुश काकडे, शांतिलाल सुरतवाला, प्रल्हाद तापीकर, डॉ. अस्मिता शेवाळे, प्रा. पंडित इत्यादी उपस्थित होते.

३. केंद्राच्या बैठकीत मा. बापूसाहेब खैरे यांनी आपण 'सकाळ बालमित्र प्रबोधिनी' याचे सहकार्याने जसे इयत्ता आठवीचे विद्यार्थ्यांसाठी पुणे महापालिकेच्या वसंतराव पाटील विद्यानिकेतनमध्ये चर्चासत्राचे कार्यक्रम आयोजित करतो त्याच धर्तीवर सदर शाळेच्या राज्य प्रज्ञा शोध या परीक्षांसाठी तयार करण्यात येणाऱ्या गरीब, होतकरु, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी श्री. भिडे यांनी शाळेच्या मुख्याध्यापिकेंशी चर्चा करुन तयार केलेला प्रस्ताव मांडला. त्याला मा. शांतिलाल सुरतवाला व मा. अंकुशराव काकडे यांनी पाठिंबा दिल्यामुळे सदर शिक्षण विषयक प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सदर प्रकल्पाखाली इयत्ता ७वी चे परीक्षेत स्कॉलरशिप मिळविलेल्या विद्यार्थी तसेच सातवीच्या वार्षिक परीक्षेत ९०% दरम्यान गुण प्राप्त केलेल्या निवडक २७ विद्यार्थ्यांना महाराष्ट्र प्रज्ञा शोध या प्रथम स्तरावरील परीक्षेसाठी प्रत्येकी

रु. १६०/- ची पुस्तके मा. शांतिलाल सुरतवाला व मा. अंकुशराव काकडे यांनी ४०% डिस्काउंट मिळवून उपलब्ध करुन दिली. श्री. भिडे यांनी या विद्यार्थ्यांसाठी पहिला पेपर मेंटल एबिलिटी टेस्ट या विषयावर १८ व्याख्याने दिली 'नॅचरल सायन्सीस' या विषयावर श्री. अमित झोडगे तर इतिहास भूगोल व नागरिकशास्त्र या विषयांवर श्री. अविनाश आढाव यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजिण्यात आली. ही सर्व व्यवस्था शाळेचे श्री. वाघ जे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतात त्यांस शाळेचे व्यवस्थापनाचे मान्यतेनुसार पूरक म्हणून करण्यात आली. याशिवाय महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेचे मागील २००२ सालापासूनचे पेपर्स या विद्यार्थ्यांकडून सरावासाठी सोडवून घेण्याची जबाबदारी श्री. भिडे यांनी घेतली. यापैकी एका सराव चाचणीचे सुपरव्हीजन प्रा. पंडित यांनी पार पाडले.

४. भारती विद्यापीठाचे सोशल सायन्स सेंटरचे दोन विद्यार्थी, पुणे विभागीय कार्यालयास, संलग्न करणेत आले आहेत. श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम याकाळात चालू ठेवले आहे.

५. सहकार मुद्रणालयाच्या संयुक्त विदयमाने मा. अंकुशराव काकडे यांनी आयोजित केलेल्या आर्यभूषण पुरस्काराचे वितरण कॉसमॉस को. ऑप. बँकेचे अध्यक्ष श्री. मुकुंदराव अभ्यंकर यांना, तर नरुभाऊ लिमये पुरस्कार सकाळचे माजी संपादक श्री. एम. के. कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला.

६. नाट्यचित्रकला अकादमीने प्रतिष्ठानचे मा. बापूसाहेब खैरे यांचेशी चर्चा करुन एकपात्री प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटनास प्रा. पंडित हे मा. बापूसाहेबांचे सूचनेनुसार हजर होते.

७. 'नेचर वॉक' या संस्थेच्या वतीने भरवलेल्या प्रकाश चित्रांचे प्रदर्शनाचे उद्घाटन मा. खा. सुप्रिया सुळे यांचे हस्ते झाले. त्यास प्रा. पंडित उपस्थित होते. तेथे त्यांनी वन विभागाचे अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेत सहभाग घेतला.

८. कै. यशवंतराव चव्हाण यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त १२ मार्च ०९ रोजी प्रतिष्ठानच्या पुणे केंद्रातील पुतळ्यास मा. शांतिलाल सुरतवाला यांचे हस्ते पुष्पहार समर्पण करण्यात आला. त्यास सर्वश्री भय्यासाहेब खैरे, भिडे, पंडित व सेवकवर्ग उपस्थित होते.

तसेच त्यानिमित्त 'यशवंतराव चव्हाण व आजचा महाराष्ट्र' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. मा. पद्मविभूषण मोहन धारिया अध्यक्षस्थानी होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाराष्ट्राच्या जडण घडणीत समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन कै. यशवंतरावांनी राज्याच्या विकासाला नवी दिशा दिली असे मत व्यक्त केले. तसेच राज्याला एकत्र करण्याचे व सहकाराचे जाळे भक्कम करण्याचे व औद्योगिकरणाची गती वाढविण्यास त्यांनी प्राधान्य दिले असे सांगितले. मा. श्री. सा. रे. पाटील यांनी त्या मानाने आताचे चित्र असमाधानकारक आहे असे सांगितले. डॉ. आनंद पाटील यांनीही सभेस मार्गदर्शन केले. मा. श्री. काकडे यांनी प्रास्ताविक केले. मा. सुरतवाला यांनी आभार मानले.

९. 'अंटार्क्टिका सफर-अनुभव कथन' हा विशेष कार्यक्रम दि. २२ मे ०९ रोजी आयोजित करण्यात आला. पुणे ट्रेकर्सचे प्रमुख मा. शांतिलाल सुरतवाला वा सौ. प्रतिभा सुरतवाला यांनी केलेल्या या रोमहर्षक सहलीची ध्वनिचित्रफित व छायाचित्रण यासह मा. सुरतवाला यांनी कथन केले. याप्रसंगी इतिहासतज्ज्ञ श्री. निनादराव बेडेकर व श्री. पांडुरंग बलकवडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक मा. अंकुश काकडे यांनी केले.

# *विभागीय केंद्र, कराड*
# *कार्यवृत्त*

**दि. ७, ८ मार्च २००९,** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबादच्या देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त ''आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान'' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी अशा वाटचालीत स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचा सिंहाचा वाटा होता. संस्थापक सरचिटणीस स्व. विनायकराव पाटील त्याचप्रमाणे दादासाहेब सावंत (संस्थापक अध्यक्ष) आणि स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जिव्हाळ्याचे ऋणानुबंध बरीच वर्षे होते. मराठवाडा शिक्षण मंडळाने त्यांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आताचे अध्यक्ष मा. विठ्ठलराव लहाने, सरचिटणीस मा. मधुकरराव मुळे याशिवाय अन्य पदाधिकारी आणि सर्व कार्यकारी मंडळ व आजीव सदस्य यांनी हे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. यशवंतरावजींच्या निधनानंतर २५ वर्षांनी मराठवाड्यात होणारे चर्चा सत्र कुतूहल निर्माण करणारे होते.

चर्चासत्रातील सर्वच भाषणे चिंतनीय व अभ्यासपूर्ण होती. खुद्द स्व. यशवंतरावांचा दीर्घकाळ सहवास लाभलेले ज्येष्ठ पत्रकार मा. रामभाऊ जोशी त्याप्रमाणे मा. लक्ष्मण माने, मा. उल्हास पवार, मा. प्राचार्य पी. बी. पाटील, मा. डॉ. जनार्दन वाघमारे, मा. प्राचार्य आनंद पाटील, प्राचार्य बोराडे, प्राचार्य देवरे त्याचप्रमाणे वयोवृद्ध मा. खासदार बापुसाहेब काळदाते यांची चर्चासत्रात भाषणे झाली.

ग्रंथ प्रदर्शन आणि यशवंतरावजींचे दुर्मिळ फोटो यांचे यावेळी प्रदर्शन ठेवण्यात आले होते.

केंद्राच्यावतीने यशवंतराव चव्हाण यांच्या ९६ व्या जयंती निमित्त खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

''विरंगुळा'' या यशवंतरावजींच्या निवासस्थानी सकाळी ९ वाजता मा. श्री. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले यावेळी अनेक मान्यवर हजर होते.

यशवंतराव चव्हाण ऑफ सायन्स कॉलेज, कराड आणि सौ. वेणुताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, प्राचार्य, अन्य सेवक वर्ग यांनी सौ. वेणुताई चव्हाण सांस्कृतिक भवन ते संगमावरील समाधीस्थळ अशी पदयात्रा काढली.

आमदार बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, ज्येष्ठ पत्रकार मा. मधुकर भावे यांचे समाधी स्थळावरील प्रीतीसंगम बागेत सुश्राव्य भाषण झाले व जनता बँक समुहाचे प्रमुख मा. श्री. विलासराव पाटील (वाठारकर), मा.श्री. अशोकराव चव्हाण, मा.श्री. शशिकांत पाटील (संपादक) दैनिक प्रीतिसंगम, दैनिक लोकमतचे कराड विभाग प्रमुख जगदीश पाटील, प्रा. थोरात याशिवाय सौ. वेणुताई चव्हाण प. चॅ. ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

**२१ एप्रिल २००९,** शिवाजी विद्यापीठाच्या आणि प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तारकार्य विभाग, कोल्हापूर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र कराडच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालय व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या १३व्या बॅचचे उद्घाटन समारंभ मा. बी.एन. कालेकर प्राचार्य वेणुताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालय कराड यांच्या हस्ते सकाळी ९.३० वाजता सौ. वेणुताई चव्हाण महाविदयाल यांच्या ग्रंथालय विभागात संपन्न झाला. प्रमुख पाहुण्यांनी यशवंतरावजी चव्हाण व सौ. वेणुताई चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले व दिपप्रज्वलन झाले. श्री. अनिल पाटील यांनी या ग्रंथालय व्यवस्थापन अभ्यासक्रमाची माहिती दिली व विद्यार्थ्यांच्या वतीने सौ. चित्रा अभिजित कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. बाळकृष्ण पालेकर यांनी या ग्रंथालय अभ्यासक्रमाचे महत्त्व व उपयुक्तता तसेच व्यावसायिक

भूमिका विशद करून या अभ्यास क्रमाबद्दल संपूर्ण माहिती दिली. विद्यापीठाच्या परीक्षेत आता पर्यंत या केंद्राचे गुणानुक्रमाने विद्यार्थी सर्व प्रथम आले तसेच १०० टक्के यशाची परंपरा असल्याचे सांगितले व ही परंपरा यापुढे चालू ठेवावी असे प्रतिपादन केले.

मा. कालेकर प्रमुख पाहूणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथालयाचे महत्व सांगून व्यक्तिमत्त्व, सांस्कृतिक; संस्कारक्षम भावी पिढीसाठी वाचनाचे महत्व सांगितले. हल्ली वाचनास वेळच मिळत नाही. अशी सबब सांगितली जाते. परंतु आपल्या दैनंदिन जीवनात आपला काही वेळ वाचन, चिंतन व मनन यासाठी देणे कसे आवश्यक आहे हे सोदाहरण व उद्‌बोधक शैलीत सांगितले त्यासाठी त्यांनी अनेक दाखले व मनोरंजक गोष्टीच्या माध्यमातून आपले विचार प्रकट केले.

या अभ्यासक्रमासाठी आतापर्यंत ३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यामध्ये पदव्युत्तर, पदवी धारक व ग्रंथालय क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. याप्रसंगी सौ. कल्पना पाटील, राजू पाटील, योगेश मुळे, इत्यादी उपस्थित होते. सौ. उमराणी यांनी आभार मानले.

**२३ एप्रिल २००९,** सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयांच्या संयुक्त विदयमाने जागतिक पुस्तक दिनांचे आयोजन करण्यात आले यावेळी ग्रंथालय अभ्यासक्रम वर्गाचे विद्यार्थी - विद्यार्थीनी सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयातील वाचक उपस्थित होते.

श्री. मोहनराव कृ. डकरे यांनी मानवी जीवनातील ग्रंथाचे महत्व सांगितले ग्रंथ हेच गुरू आहेत. अलिकडे वाचन संस्कृति वाढवण्यासाठी सर्वच ग्रंथालयानी वाचकांना आकृष्ठ करणारे कार्यक्रम राबवण्याची आवश्यकता स्पष्ट केली. आभार सौ. सुषमा कोळेकर यांनी मानले यावेळी ट्रस्ट,प्रतिष्ठानचे सर्व सेवक, वाचक यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

**१ जून २००९,** देशनेते स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांची पत्नि सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण यांच्या २६व्या पुण्यतिथी दिना निमित्त सोमवार दि. १ जून ०९ रोजी सायंकाळी ६ वाजता सूरमणी सौ. माधवी नानल मुंबई यांचा स्वररंग हा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमास कराडकर रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला व स्मृती मंदिरात स्मृतिगंध दरवळला या प्रसंगी मा.आ. बाळासाहेब पाटील, मा. विलासराव पाटील वाठारकर बापू मा. अशोकराव चव्हाण मा. सुनिल पवार इत्यादी विविध मान्यवरांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

शास्त्रीय संगीत, भक्तिगीत व नाट्यसंगीत, भजन अशा बहुविध गीतांचा समावेश शास्त्रीय, उपशास्त्रीय, नाट्यसंगीताची मैफिलीची रंगत उत्तोरत्तर वाढतच गेली या मैफिलीत बडा ख्याल, नाट्यगीत, द्रत बंदीश, ठुमरी, दादरा, तराणा, भक्तिगीते असा विविधापूर्ण स्वरांचा खजीना सौ. वेणुताईंच्या स्मृति दिनाच्या निमित्ताने रसिकांना अनुभवता आला. मोहनराव डकरे यांनी प्रास्ताविक व आभार मानले.

**१३-६-२००९,** केंद्राच्या ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्गातील विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळा सकाळी ९ वाजता संपन्न झाली. विद्यार्थ्यांना ग्रंथालया विषयी जास्तीत जास्त आवड निर्माण व्हावी ग्रंथालय चळवळ जास्तीत जास्त वृध्दीगंत व्हावी व नवग्रंथपालांना ग्रंथालयाविषयी लायब्ररी ट्रेनिंग सर्टिफिकेट कोर्स विषयी अधिका अधिक मार्गदर्शन व्हावे. या भावनेने या कार्यशाळेचे आयोजन केले. न्यू कॉलेज कोल्हापूरचे ग्रंथपाल मा.श्री.पी.सी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रतिष्ठानचे सचिव श्री. मोहनराव कृ. डकरे, श्री. बाळकृष्ण पालेकर, श्री. श्रीधर कुलकर्णी, श्री. पवार, प्रकल्प अधिकारी, श्री. अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

**२३ जून २००९,** प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तारकार्य विभाग शिवाजी विद्यापीठ अंतर्गत व कराड विभागीय केंद्र द्वारा संचलित ''ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम'' वर्गाची शैक्षणिक सहल शिवाजी विद्यापीठ, महाविद्यालयीन ग्रंथालय व सार्वजनिक ग्रंथालय अभ्यास सहल आयोजित केली होती. या अभ्यास सहलीतील ग्रंथालय वर्गाच्या ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, सोबत सर्व अध्यापक शिक्षक उपस्थित होते.

कोल्हापूरच्या दक्षिणेला ८ किलोमीटर अंतरावर असलेल्या कणेरी या गावी प्रचित काडसिद्धेश्वर मठ आहे. सकाळी १०.३० वाजता मठाचे २७ वे मठाधिपती काडसिद्धेश्वर यांच्या दर्शनाने प्रारंभ झाला. याचठिकाणी ग्रामीण समाजाचे दर्शन घडणारे सिद्धगिरी म्युझियमची पाहणी केली. ग्रामीण संस्कृतीवर अधारीत असा हा आगळावेगळा प्रकल्प महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिलाच उपक्रम असावा. यामध्ये ग्रामीण संस्कृतीचे सर्व बारकावे टिपलेले आहेत. यानंतर सर्वजण विद्यापीठ ग्रंथालय पाहणेसाठी मार्गस्थ झाले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभागाचे प्रमुख मा. डॉ. भालबा विभुते यांचे विशेष व्याख्यान विद्यापीठाच्या प्रौढ निरंतर विभागामध्ये दुपारी २.३० वाजता संपन्न झाले. यावेळी मा. डॉ. भालबा विभुते यांनी प्रौढ निरंतर विभागाची विविध उपक्रमाची माहिती दिली. केंद्राची प्रौढ निरंतराच्या विविध सामाजिक उपक्रमाची माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या शैक्षणिक उपक्रमाची माहिती सांगितली व विद्यापीठाच्या ग्रंथालय अभ्यासक्रम वर्गाच्या उपक्रमाबाबत प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

**दि. १४ ते १८ ऑगस्ट २००९,** क्षेत्रिय प्रचार कार्यालय भारत सरकार रत्नागिरी, सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम मनावर सुसंस्कार होण्यासाठी ट्रस्ट व प्रतिष्ठानच्यावतीने बालचित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांचे उद्घाटन मा.श्री. राजेश पाटील चेअरमन कराड जनता सह. बँक व श्री. लालासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. मा. श्री. राजेश पाटील यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात क्षेत्रिय प्रचार कार्यालय भारतसरकार प्रतिष्ठान व ट्रस्टच्या समाजाभिमुख कार्यक्रमाचे कौतुक केले. तसेच मुलांना आवडणाऱ्या चित्रपटाच्या माध्यमातून ज्ञान विज्ञान आणि सुसस्कार भावी मुलांच्या मनावर मोठ्याप्रमाणात होत असल्याने अधिका अधिक शाळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय मनोगत श्री. लालासाहेब पाटील यांनी व्यक्त केले, श्री. दिलीपराव चित्रे क्षेत्रियप्रचार कार्यालय अधिकारी, सौ. शोभना रैनाक, सौ. निर्मला घोरपडे, श्री. मोहनराव डकरे यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. श्री. अनिल पाटील यांनी प्रास्ताविक व आभार मानले.

सलग पाच दिवस चालणाऱ्या बालचित्रपट महोत्सवामध्ये एकूण १० चित्रपट दाखवण्यात आले. शालेय मुलांच्यावर संस्कार घडवणारी संस्कार फिल्म, कलात्मक फिल्म, राष्ट्रभक्ती, मुल्यशिक्षणाचा, मनोरंजनाचा, अंतर्भाव असणारे चित्रपट दाखवण्यात आले त्यामध्ये प्रामुख्याने खालील चित्रपट दाखवण्यात आले.

| | |
|---|---|
| श्यामची आई | सेनानी साने गुरुजी |
| छोटा सैनिक | बाल शिवाजी |
| महात्मा गांधी | तेनाली रामन |
| विक्रम आणि वेताळ | |

या उपक्रमामध्ये एकूण ५८५० विद्यार्थ्यांनी चित्रपट महोत्सवाचा लाभ घेतला. या चित्रपट महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी क्षेत्रिय प्रचार कार्यालय अधिकारी श्री. दिलीपराव चित्रे, श्री. नामदेवराव नाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**दि. ११ ऑगस्ट २००९,** वारकरी संप्रदायातील थोर सत्पुरूष आणि कराडच्या मारूतीबुवा मठाचे मठाधिपती वैकुंठवासी भगवानमामा कऱ्हाडकर यांच्या स्मृतिस अभिवादन करण्यासाठी कऱ्हाड तालुक्यातील भजनी मंडळांचा भक्तिरंग कार्यक्रम सौ. वेणुताई चव्हाण सभागृहात संपन्न झाला आणि ललित भारती यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमात १८ भजनी मंडळांनी भजने आणि गवळणी सादर केल्या. प्रारंभी मारूती बुवा कऱ्हाडकर मठाचे विद्यमान मठाधिपती मारुतीबुवा साबळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजक ललित कला भारतीचे प्रमुख मोहन कुलकर्णी यांनी भक्तिरंग कार्यक्रमाच्या आयोजन मागील भूमिका विशद केली.

**दि. १५ ऑगस्ट २००९,** देशाचा ६२ वा स्वातंत्र्य दिन सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक टॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्यासमवेत मोठ्या उत्साहाने साजरा झाला.

श्री. मोहनराव कृष्णाजी डकरे यांच्या शुभहस्ते प्रतिष्ठानच्या ''विरंगुळा'' कार्यालयात व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड मध्ये ध्वजारोहण संपन्न झाला.

यावेळी श्री शिवाजी हायस्कूलचे बँडपथक, विठामाता हायस्कूल मधील विद्यार्थी-विद्यार्थीनी दोन्ही संस्थेतील सर्व सेवक वर्ग, विविध मान्यवर उपस्थित होते. ध्वजारोहण नंतर उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रमात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र-कराडचा निकाल १००% लागला असून या केंद्रात...

१) सौ. सुषमा कोळेकर - प्रथम क्रमांक - ७५.७१%

२) कु. तृप्ती बाळकृष्ण पालेकर - द्वितीय क्रमांक - ७३.७१%

३) कु. मेघना अशोक फाटक - तृतीय क्रमांक - ७२.२८%

उत्तीर्ण झाले

प्रती वर्षाप्रमाणे उत्कृष्ट निकालाची परंपरा या केंद्राने राखली आहे. या उपक्रमाच्या अभ्यासक्रमासाठी प्रा. बाळकृष्ण पालेकर, प्रा. अनिल पाटील, प्रा. श्रीधर कुलकर्णी, प्रा. अरुण पवार, प्रा. योगेश मुळे, प्रा. सौ. अबोली उमराणी यांनी मार्गदर्शन केले. श्री. अनिल पाटील यांनी प्रकल्पअधिकारी म्हणून या उपक्रमाचे कामकाज पाहिले.

**दि. १७-९-२००९,** आधुनिक कराडचे शिल्पकार आणि कराड उत्तर मतदार संघाचे भाग्यविधाते कै. पी.डी. पाटील साहेब यांच्या प्रथम स्मृतिदिनी स्थानिक कलावंतांचा अवघा रंग एक झाला या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र-कराड आणि ललित कला भारती यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचे आयोजन केले असून या कार्यक्रमात शहरातील १७५ गायकवाड कलावंतांचा कलाविष्कार रसिकांना पहावयास आणि ऐकावयास मिळणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना ज्येष्ठ पत्रकार मोहन कुलकर्णी यांची असून त्यांच्याच कुशल संयोजनाखाली हा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम होणार आहे असे सांगून प्रतिष्ठानचे सचिव मोहनराव कृ. डकरे म्हणाले शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, उपशास्त्रीय संगीत आणि लोकसंगीत असा संगीतातील सर्व प्रकारांचे दर्शन स्थानिक कलावंत घडविणार आहेत.

पक्ष चालतात ते निष्ठेने चालतात हे जरी खरे असले, तरी लोकशाही पक्ष हे विचारांच्या निष्ठेने चालले पाहिजेत असा तुमचा-आमचा आग्रह असला पाहिजे. व्यक्तीवरच्या निष्ठा चुकीच्या आहेत. त्या निष्ठा काम देत नाहीत. कारण व्यक्ती शेवटी चूक करू शकते. मनुष्य कितीही मोठा असला तरी त्याच्या हातून चूक होणार नाही असे विधान कोणीही करू शकणार नाही.

**स्व. यशवंतराव चव्हाण**

## विभागीय केंद्र, नाशिक
## कार्यवृत्त

**दि. १७ फेब्रुवारी २००९ :** नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे बी.वाय.के. कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक यांच्यातर्फे दि. १७ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी २००९ या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी 'युरेका-२००९' 'मॅनेजमेंट विक' साजरा करण्यात आला. या कालावधीत पुणे विद्यापीठातील १५ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला.

**दि. १३ मार्च, २००९ नवमहाराष्ट्र युवा अभियानाची**'युवा धोरण बैठक' शुक्रवार व शनिवार दि. १३ व १४ मार्च २००९ रोजी विश्वास फार्म, शिवाजीनगर रोड, गंगापूर नाशिक येथे संपन्न झाली. या बैठकीसाठी युवा नेते समीर भुजबळ, विश्वास ठाकूर, निलेश राऊत व महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले युवक व युवती उपस्थित होते.

**दि. २४ एप्रिल २००९** ''घाशीराम कोतवाल'' नाटकाने इतिहास घडविला. या नाटकाने आत्मविश्वास व प्रसिध्दी दिली आणि कला क्षेत्रातली पुढली वाटचाल करण्याचा राजमार्ग उघडून दिला २० वर्षे चाललेल्या या नाटकामुळे जग बघता आले. माणसे जोडली. अनेक मित्र मिळाले,'' असे प्रतिपादन डॉ. मोहन आगाशे यांनी केले. कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिध्द अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांचे 'घाशीराम कोतवाल ते शेवरी' नाट्य-चित्रपट प्रवास या विषयावर दृकश्राव्य व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी त्यांनी आपला सिनेनाट्य प्रवास कथन केला ते पुढे म्हणाले की, आमच्या धडपडीच्या काळात अनुभव हे शिक्षणाचे केंद्र होते. माहिती व तंत्रज्ञान विकसित झाले नसल्याने शिक्षणाचे मर्यादित मार्ग उपलब्ध होते. पूर्वी शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांच्या अनुभवाचे पृथकरण होत असे. मात्र सध्याच्या काळात इंटरनेटमुळे होणाऱ्या माहितीच्या महाजालामुळे कोणती माहिती घ्यावी आणि कोणती घेऊ नये असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडतो. 'आई' हे माहितीचे महत्वाचे माध्यम माझ्या जीवनात मुलभूत ठरले.

१६ डिसेंबर १९७२ला 'घाशीराम कोतवाल' या विजय तेंडूलकरांनी लिहिलेल्या नाटकाचा पहिला प्रयोग झाला १९९२ साली कोलकत्यात झालेल्या शेवटच्या प्रयोगापर्यंत २० वर्षे या नाटकाचे अनेक प्रयोग झाले. त्याने प्रगल्भता आली. 'अशी पाखरे येती' या नाटकापासून जब्बार पटेल दिग्दर्शक म्हणून प्रकाशझोतात आले. घाशीराममुळे मला चित्रपट क्षेत्राचे दरवाजे सहजपणे उघडे झाले. 'सामना' हा सिनेमापेक्षा नाटकच जास्त होता. तेंडूलकरांचे संवाद, सकस अभिनय यामुळे सामना चित्रपट गाजला. निशांत, मंथन ते शेवरी या चित्रपटातील वेगवेगळ्या आठवणी ताज्या करीत काही दृश्ये दाखवून आगाशे यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. मानसिक अपंगांसाठी शासनाने वेगळे ध्येयधोरण आखावे. यासाठी आपण पाठपुरावा केल्याचे डॉ. आगाशे यांनी नमूद केले. याप्रसंगी प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव ॲड. विलास लोणारी यांनी केले. व परिचय कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केला. याप्रसंगी अध्यक्ष विनायकदादा पाटील, माधवराव पाटील, डॉ. वसंत पवार, लोकेश शेवडे, डॉ. रामदास बरकले इ. मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

**दि. २५ एप्रिल, २००९,** आदिवासींच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या 'वारली चित्रकला' या अनोख्या चित्रशैलीचा परिचय व्हावा, यासाठी नाशिक येथे वारली चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रात्यक्षिक कार्यशाळा, चित्रप्रदर्शन व मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. विश्वास को-ऑप. बँक लि., ओकार्ड हॉस्पिटल, शब्दश्री प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा दि. २५व २६ एप्रिल २००९ रोजी कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक येथे संपन्न

झाली. कार्यशाळेचे उद्‌घाटन विभागीय केंद्राचे अध्यक्ष विनायकदादा पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर व अभिनेत्री इंद्राणी मुखर्जी उपस्थित होत्या.

**दि. २७ जून २००९,** फिल्म डिव्हीजन, भारत सरकार व दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'यशवंतराव चव्हाण फिल्म फेस्टीव्हल २००९' संपन्न झाला. मुंबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील लघुपट विभागात सन्मानीत करण्यात आलेल्या चित्रपटांचा महोत्सव दि इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअर्सच्या उंटवाडी रोडवरील सभागृहात आयोजित करण्यात आला व लघुपटावर मुक्त चर्चाही आयोजित करण्यात आली.

धिरज मेश्राम दिग्दर्शित 'हरवलेले इंद्रधनुष्य' या लघुपटात गत आयुष्यात शोध लावणारे हुरहुर आणि रंजक प्रवास दाखविण्यात आले आहेत. लक्ष्मीकांत शेरगांवकर दिग्दर्शित 'दि सी साईड स्टोरी' मध्ये गोव्यात येणाऱ्या परदेशी पर्यटकांमुळे होणाऱ्या व्यावसायिकीकरण आणि एका शिक्षकाच्या मनात उठलेल्या लाटांचा वेध घेण्यात आला. अश्विनकुमार दिग्दर्शित 'लिटिल टेररीस्ट' राजस्थानात घडतो. पाकीस्तानच्या बाजुने लहान मुलगा क्रिकेट खेळतांना सिमा ओलांडून भारतात येतो. सिमा सुरक्षादलाकडून या छोट्या अतिरेक्याचा शोध सुरु होतो. राजकीय सीमारेषा जपतांना सिमा परदेशात राहणाऱ्या जनसामान्यांची होणारी घालमेल, या लघुपटाने अधोरेखीत केली आहे.

**दि. ११ व १२ जुलै २००९,** गौतमी प्रकाशन, नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने भारती ठाकूर लिखीत 'नर्मदा परिक्रमाः एक अंतर्यात्रा' या पुस्तकाचे प्रकाशन सोहळा दि. ११ जुलै २००९ रोजी संपन्न झाला.

यावेळेस कवयित्री व लेखिका डॉ. अरूणा ढेरे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. या वेळेस बोलतांना डॉ. अरूणा ढेरे म्हणाल्या की, ''कोणतीही नदी ही माताच असते मात्र नर्मदेची गोष्ट जरा वेगळी आहे. तिला पाहण्यासाठी पाहणाऱ्याकडे उत्तम दृष्टी हवी. भारती ठाकूर यांच्याकडे ती असल्याने 'नर्मदा परिक्रमा : एक अंतर्यात्रा' या त्यांच्या पुस्तकाची निर्मिती अत्यंत सजग उर्मीतून झाली आहे. त्यात स्त्रीच्या वेगवेगळ्या अंतःशक्ती पहायला मिळतात. तेच या पुस्तकाचे बलस्थान आहे.''

भारती ठाकूर मनोगत व्यक्त करतांना म्हणाल्या की, ''नर्मदा तिच्या काठावरची असंख्य माणसे आणि संपूर्ण निसर्ग यांचे मैत्र परिक्रमेमध्ये आम्ही जपले आणि तेच शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकात आहे.'' गौतमी प्रकाशनाचे निषाद देशमुख यांनी प्रास्ताविक केले. ॲड. विलास लोणारी यांनी स्वागत केले. कार्यक्रमास आ. हेमंत टकले, विश्वास ठाकूर, माधवराव पाटील, लोकेश शेवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

**दि. १२ जुलै २००९ रोजी,** डॉ. आत्माराम पवार यांचे 'औषधांची ऐशी की तैशी' या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळेस बोलताना डॉ. पवार म्हणाले की, ''सामान्य माणसाला असलेली औषधांविषयीची निरक्षरता त्याच्या आरोग्याकरीता घातकच आहे, त्यासाठी त्याच्यातील फायदे व तोटे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. औषध शास्त्राविषयी जनजागृती होणेही महत्त्वाचे आहे.''

**दि. २७ जुलै २००९,** विभागीय केंद्रातर्फे सुप्रसिद्ध कवी रामदास फुटाणे, कवी फ. मु. शिंदे व कवी सुरेश शिंदे यांच्या 'गालातील हास्य-गालावरील धारा' हा कवितांचा जाहीर कार्यक्रम संपन्न झाला.

अवतीभोवती घडणारे राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक घडामोडी यातील व्यंगावर प्रहार करीत व त्यातील विरोधाभासावर विनोद भाष्य करुन त्यांनी रसिकांना अंतर्मुख केले. वीजेचे प्रश्न, भारनियमन, खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती यांचा वेध घेतांनाच सरकारचे शिक्षणाचे धोरण आणि त्यामुळे शिक्षणाची झालेली हेळसांड, सामान्य माणसाचे प्रश्न आणि राजकारण्यांना असलेले त्यांचे वावडे यांचा परखड वेधच त्यांनी आपल्या कविता व वात्रटिकांमधून घेतला.

याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार विजेती धावपटू कविता राऊत व शासनाचा एकलव्य पुरस्कार प्राप्त जलतरणपटू हंसराज पाटील यांचा सत्कार कवि रामदास फुटाणे यांच्याहस्ते करण्यात आला. रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हेही या मैफीलीचे वेगळेपण ठरले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन विश्वास ठाकूर यांनी केले. कार्यक्रमासाठी विभागीय केंद्राचे अध्यक्ष विनायक पाटील, महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री ना. डॉ. शोभाताई बच्छाव तसेच माधवराव पाटील, गुरुमित बग्गा, अश्विनी बोरस्ते, दिपाली मानकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**दि. २९ व ३० जुलै २००९,** संस्कृति वैभव, कुसुमाग्रज वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. निनाद बेडेकर **'नाशिकचं वाढतं महत्त्व'** या विषयावर बोलातांना पहिल्या दिवशी म्हणाले की, नाशिक ही इतिहासाने ओथंबिलेली नगरी आहे. नाशिकचा इतिहास जागृत ठेवण्याची गरज असून सुजाण नागरिकांनी नवीन पिढीत त्याबाबत जाणिवा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. नाशिक नगरी ही मुंबईची खिडकी बनली आहे. या नगरीत राम, लक्ष्मण व सीता यांच्या पावलाने मानवता प्रवेशिली. सह्याद्रीवरुन श्रीकृष्ण व बलराम गेल्याची कथा आहे. साल्हेर किल्ल्यावर परशुरामाची पावले आहेत. टॉलेमीने नाशिकचा उल्लेख धर्मपीठ असा केलेला आहे. नाशिक ही यक्षनगरीसुध्दा आहे. मोठा इतिहास लाभलेल्या नाशिक शहरात पर्यटन वाढविण्यासाठी महापालिकेने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले पाहिजे. त्यासाठी रस्ते, ड्रेनेज यासारख्या सुविधांवर भर दिला पाहिजे. जिल्ह्यात अनेक किल्ले आहेत. या किल्ल्यांना एक इतिहास आहे. ट्रेकिंग करणाऱ्या संस्था तसेच इतिहास शिक्षक यांनी नाशिकचा इतिहास जागृत ठेवण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.

दुसऱ्या दिवशी कुमुदिनी भार्गव 'बदलती सामाजिक परिस्थिती आणि आपली भूमिका' या विषयावर बोलतांना म्हणाल्या की, समाजात झालेल्या चांगल्या-वाईट बदलांशी सामना करताना आपली फरफट होत असली तरी त्याकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीतून न बघता शांतपणे बघावे. समाज म्हणजे संघयुगाचे प्रतिबिंब, ताकद आणि शक्ती असे सांगत त्या पुढे म्हणाल्या की, जागतिक मंदी, दहशतवाद, उद्‌ध्वस्त झालेली मने, चीड, संताप, शिक्षण आणि विज्ञान क्षेत्र, पर्यावरण, स्त्रियांच्या जीवनातील स्थित्यंतरे असे कितीतरी बदल नियमितपणे होत असतात. किराणा व्यवसायापासून ते अंतरिक्षापर्यंतच्या अनेक चांगल्या-वाईट बदलांशी आपण सामना करीत असतो असे बदल होत असतानाही आपण त्यातून तग धरुन असतो. आपल्यात जे बदल घडतात तेच समाजातही घडत असतात. तो निसर्गाचा नियम आहे. मुल्यांचा ऱ्हास होऊन बदल घडत असतील, तर त्याचा उपयोग नाही. पिढी वेगाने बदलते तसा काळही वेगाने बदलत जातो. बदलांशी सामना करतांना फरफट होत असली तरी स्वतःचे, कुटुंबाचे आणि समाजाचे स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी बदल होणे आवश्यकच आहे. या व्याख्यानासाठी विनायक पाटील, पोलिस आयुक्त विष्णु देव मिश्रा, राधाकिसन चांडक, अतुल चांडक, नंदन दीक्षित, विश्वास ठाकूर आदि मान्यवर उपस्थित होते.

**दि. १५ ऑगस्ट २००९** कोका-कोला लि. व विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने अंबड येथील सामाजिक वनीकरण विभागाने कोका-कोला कंपनीला दिलेल्या जागेत स्वातंत्र्यदिनानिमित्ताने वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पर्यावरण संतुलनाकडे प्रत्येकाने मुलभूत जाणीवेतून बघणे गरजेचे असून त्यासाठी वृक्षारोपणासारखे उपक्रम हाती घेणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे 'ग्लोबल वार्मिंग' सारख्या संकटावर आपण निश्चित मात करू. म्हणूनच तर पर्यावरण रक्षणाची जनचळवळ उभी राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले.

**दि. १५ ऑगस्ट २००९** सर्वत्र भीती निर्माण केलेल्या 'स्वाईन-फ्लू' विषयी सामाजिक भावनेतून या संसर्गजन्य आजाराविषयी शास्त्रीय दृष्टीकोनातून जनहितार्थ माहितीपत्रक

विश्वास को.ऑप. बँक लि., नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित करण्यात आले. या माहितीपत्रकातून 'स्वाईन-फ्लू' विषयी असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होईल व खबरदारीचे उपाय म्हणून यातील माहितीचा निश्चितच उपयोग होईल, असे विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी सांगितले आहे.

सुमारे तीन लाखं माहितीपत्रके वाटपाचे काम झाले आहे. नाशिकमधील विविध शाळा-महाविद्यालये, डॉक्टर्स, औषधांची दुकाने, एस.टी.स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन, सामाजिक संस्था यांना याचे वाटप करण्यात आले. यास नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'स्वाईन-फ्लू' विषयीच्या जनजागृती चळवळीत जास्तीत-जास्त नागरिकांनी सहकार्य करावे तसेच अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन केंद्राचे अध्यक्ष विनायक पाटील, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे कार्यवाह ॲड. विलास लोणारी व विश्वास को-ऑप. बँकेचे अध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले.

**दि. २७ ऑगस्ट २००९,** सुप्रसिध्द चित्रपट अभिनेते अतुल कुलकर्णी यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. अभिनेते अतुल कुलकर्णी यांची मुलाखत घेण्यासाठी प्रतिष्ठानने अभिनेते किशोर कदम उर्फ कवी सौमित्र यांना निमंत्रित केले होते.

विचार हृदयाने नव्हे तर डोक्याने करायचा असतो. मोठ्यांचा आदर जरुर करावा पण संस्कारांना तार्कीकता असली पाहिजे. अध्यात्माचा देवाशी, कर्मकांडाशी अजिबात संबंध नाही. संक्रमणावस्थेत जुनेच पकडून ठेवले तर आपली फरफट होतच राहील, असा जगण्याविषयीचा मोलाचा संदेश त्यांनी आपल्या मुलाखतीद्वारे उपस्थितांना परखडपणे दिला. अतुल कुलकर्णी म्हणाले की, घरची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल झाल्यामुळे वयाच्या सत्तावीसाव्या वर्षी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये प्रवेश घेऊन डॉक्टर/इंजिनिअर होण्यापेक्षा अभिनयसंपन्न कलावंत होण्याचं शिक्षण घेण्याचं ठरविलं. लौकीकअर्थाने व्यक्तिरेखा रंगविण्यापेक्षा माहित नसलेली व्यक्तिरेखा रंगवणं हे खरं कौशल्य असतं. 'दम' चित्रपटातील एन्काऊन्टर शंकरची भूमिका रंगवतांना कौशल्य वाढवलं, असे सांगून अभिनेता म्हणून चित्रपटांसह नाटकांत केलेल्या भूमिकांचा प्रवास कथन केला. यावेळी किशोर कदम यांनी त्यांना कलाप्रवासाबरोबरच राजकारण, समाजकारण, शिक्षण व्यवस्था, संस्कृति इत्यादी विषयांवर बोलते केले. तत्पूर्वी अतिथींचे स्वागत प्रतिष्ठानच्या नाशिक विभागीय कार्यालायचे अध्यक्ष विनायकदादा पाटील व सौ. अश्विनी बोरस्ते यांनी केले. प्रा. डॉ. वृंदा भार्गवे यांनी परिचय करुन दिला. सचिव ॲड. विलास लोणारी यांनी प्रतिष्ठानची माहिती दिली. सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन विश्वास ठाकूर यांनी केले.

**दि. ३० ऑगस्ट २००९,** गणेशोत्सवातील ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण टाळण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढे येण्याची गरज असून उत्सवाच्या नावाखाली होणाऱ्या बाजारीकरणाला आळा बसण्यासाठी विचारमंथन होणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जे.एच.पाटील यांनी केले.

विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक वन अर्थ फॅमिली, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्युट यांच्या सहकार्याने आयोजित छायाचित्र प्रदर्शनाच्या समारोपाप्रसंगी व 'गणेशोत्सव की प्रदुषणाचा उत्सव' या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. पाटील बोलत होते. या प्रसंगी गरीब विद्यार्थ्यांना विश्वास ठाकूर यांचे हस्ते वह्या व शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आ. डॉ. वसंत पवार, माधवराव पाटील, समन्वयक दिपाली मानकर, छायाचित्रकार प्रसाद पवार तसेच 'वन अर्थ' चे शिल्पा मेंदडकर, सम्राट धाडणकर, निनाद सोनवणे, अंकुश मगजी, मयुरी बिरारी, हर्षल रूपारेल, सुमेध कुलकर्णी आदी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केंद्राचे समन्वयक विनायक रानडे यांनी केले.

# विभागीय केंद्र, लातूर
## कार्यवृत्त

१. प्रथम सत्र : दि. १९/०२/२००९ रोजी शिवछत्रपती यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या राजा शिवछत्रपतीच्या अश्वरूढ पुतळ्याला विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

द्वितीय सत्र : दुपारी २.०० वाजता विभागीय केंद्र कार्यालयात राजा शिवछत्रपती यांच्या जीवनावर प्राध्यापक डॉ. श्रीराम गुंदेकर, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्राचार्य डॉ. व्ही.एन.इंगोले यांचा परिसंवाद ठेवण्यात येऊन हा परिसंवाद संपल्यानंतर शिवप्रेमींना चहा व अल्पोपहार देण्यात आला.

२. दि. २३/०२/२००९ रोजी ग्रामस्वच्छतेचे साक्षात महर्षी संत गाडगेबाबा यांच्या जयंती उत्सवाचा कार्यक्रम दीनदलितांचे कैवारी राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्याला साक्ष ठेवून राजर्षी शाहू चौकात संत गाडगे महाराज यांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी थोर स्वातंत्र्यसेनानी मुरगप्पा खुमसे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून लातुरातील ज्येष्ठ समाजसेवक विधीज्ञ ॲड. कमलाकरराव कुलकर्णी यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात मा. श्री. हरिभाऊ जवळगे गुरुजी यांनी विभागीय केंद्रांतर्गत मागे झालेल्या व पुढे चालू असलेल्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुक्त पत्रकार रामकुमार रायवाडीकर यांनी केले. तर आभार मा. श्री. शंकर भारती यांनी मानले. दुपारच्या सत्रात लातूर शहराच्या पूर्व भागातील झोपडपट्टीत जाऊन तेथील रहिवाशांना स्वच्छेतेचे महत्त्व सांगून पुढील वर्षी विभागीय केंद्राच्या वतीने स्वच्छतेबाबत बक्षिस जाहीर करण्यात आले.

३. दि. ०८/०३/२००९ रोजी मागे ठरल्याप्रमाणे विभागीय केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर शहरातील थोर स्वातंत्र्यसेनानी मुरगप्पा खुमसे हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांची उपस्थिती होती. या प्रसंगी खा. डॉ. जर्नादन वाघमारे म्हणाले की, सामाजिक प्रश्न समजून घेऊन समस्येच्या मुळापर्यंत जायला हवे. माळाकोळीच्या महिलांनी उभारलेला लढा प्रेरणादायी आहे. यापुढे दारूविक्रीच्या परवान्यासाठी महिलांची अनुमती मागावी तशी कायद्यात तरतूद करावी. जागतिक महिला दिनानिमित्त हा कार्यक्रम एक आगळावेगळा प्रतिष्ठानच्या वतीने साजरा केला जातो आहे. याप्रसंगी ॲड. मनोहरराव गोमारे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार वगैरेंची भाषणे झाली. डॉ. वाघमारे सर पुढे म्हणाले की, सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या थेट सत्ता आमच्यासाठी नको आहेत तर मनुष्यप्रधान समाजसत्ता घडविण्याचा संकल्प महिला दिनी करायला हवा. आंदोलनाच्या प्रमुख्या चंद्रकला कागणे म्हणाल्या, दारुबंदी आंदोलन पहिल्यांदा सोपे वाटलेले काम नंतर कठीण होते गेले. प्रसंगी लाठ्या खाल्या. तीन दिवस तुरुंगवासही भोगला. सहा महिन्यापासून प्रत्यक्ष आंदोलनाला सुरूवात केली. जेव्हा कष्टकऱ्यांचे संसार दारूपायी उध्दवस्त होताना पाहिले. प्रयत्न केल्यावर कोणतीही गोष्ट साध्य होते. जालिंदर कागणे यांनी आंदोलनाच्या कक्षा वाढत गेल्यामुळे तरूणांच्या एकीतले बळ संचारले व तरूणवर्ग दारूबंदीसाठी पेटून उठल्याचे सांगितले. घराच्या बाहेर पडताना मुळाशी गेले पाहिजे, वरवर पाहिले तर त्या प्रश्नांचा गुंता सुटत नाही. कुठल्याही वाईट गोष्टीची मुळे पराकाष्टेने तोडावी लागतात. नेमकी हीच गोष्ट माळाकोळीच्या महिलांनी जाणून घेतली. त्यांना तरूणांनी पाठिंबा दिला. यापुढे स्त्रीप्रधान अथवा पुरूषप्रधान न डगमगता काम केल्यानेच यश मिळाल्याचे ज्योती कागणे

म्हणाल्या. सर्वांचे आभार श्री. हरिभाऊ जवळगे यांनी मानले. याप्रसंगी शिवाजीराव माळे, सूर्यकांत वैद्य, जी.एन.लातूरे, के.ई.हरिदास इ. मान्यवर मंडळी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

४. प्रथम सत्र : दि. १२/०३/२००९ रोजी सकाळी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या लातूर नगर परिषदेसमोरील पूर्णाकृती पुतळ्याला खा. डॉ. जनार्दन वाघमारे, कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे जागतिक किर्तीचे नेत्रतज्ञ पद्मभूषण डॉ. तात्याराव लहाने व खरेखूरे यशवंत भक्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांच्या उपस्थितीत स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे हार घालून व फुले वाहून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

द्वितीय सत्रात लातूर नगर परिषदेच्या शिवछत्रपती वाचनालयाच्या ग्रंथालय सभागृहात स्व. यशवंतराव चव्हाण यांची ९६वी जयंती कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. डॉ. जनार्दन वाघमारे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. तात्याराव लहाने व डॉ. सर्जेराव निमसे हे होते. याप्रसंगी डॉ. तात्यारावजी लहाने यांनी यशवंतरावाच्या जीवनासोबतच लातूरकरांना आरोग्याविषयी सविस्तर माहिती सांगितली. तर दुसरे प्रमुख अतिथी डॉ. सर्जेराव निमसे यांनी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचे शैक्षणिक विचार किती दूरगामी होते याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. डॉ. जनार्दन वाघमारे यांनी यशवंतरावांच्या चरित्रासोबत आरोग्य, शिक्षण व सध्याचे देशासमोरील मौलिक प्रश्न याला यशवंतरावांचे त्यावेळचे विचार कसे उपयुक्त ठरतात याबाबत सभागृहाला उद्बोधीत केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात हरिभाऊ जवळगे यांनी विभागीय केंद्राच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. एस. एस. भांडवलकर यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनी मानले.

१२. दि. १ मे २००९ गेल्या ५० वर्षात महाराष्ट्राने काय कमवले व काय गमवले या विद्वजनाच्या चर्चेत सहभाग नोंदवून वर्षभर कार्यक्रम घेण्याचे ठरले. महाराष्ट्र राज्य स्थापन झाले मात्र संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला नाही. खऱ्या अर्थाने तत्कालीन या लढ्यास हेच अपेक्षित होते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मधूकर मुंडे यांनी केले. ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने लातूर येथे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. केंद्राचे विभागीय अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. सुशिला पिंपळे, प्रा. डॉ. सूधीर देशमुख व अॅड. मनोहरराव गोमारे आर्दीची उपस्थिती होती. अध्यक्षपदावरून बोलताना खा. डॉ. जनार्दन वाघमारे यावेळी म्हणाले की, यशवंतरावजीसारखा एक सुसंस्कृत माणूस या राज्याचा मुख्यमंत्री झाला. त्यांनी केवळ अडीच वर्षाच्या आपल्या काळात या राज्याच्या एकूण जीवनाला अतिशय संपन्न व समर्पक असे वैचारिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. त्यांची बांधिलकी ही अतिशय सामान्य घटकांशी होती. सत्ता विकेंद्रीकरणाच्या प्रयोगातून त्यांनी येथील सामान्य जनतेतील नेतृत्व निर्मितीच्या वेधाचे एक स्वप्न पाहिले असे सांगून खा. वाघमारे पुढे म्हणाले की, आपले राज्य हे समाजवादाची एक प्रयोगशाळा व्हावी अशी यशवंतरावांची प्रबळ इच्छा होती. आता प्रत्येकांनी आपला सहभाग व योगदानाचाही हिशोब ठेवणे अनिवार्य झाल्याचे त्यांनी सांगितले, प्रास्ताविक हरिभाऊ जवळगे यांनी केले तर सूत्रसंचालन रामकुमार रायवाडीकर यांनी व आभार प्रदर्शन गणपतराव तेलंगे यांनी मानले. याप्रसंगी नितीन गायकवाड, दयानंद कुंभार, प्रा. दिनकर कांबळे, वलीसाहेब शेख, हिराताई कळसायत, संजीवनी चिकाटे, संजय व्यवहारे, लातूर शहर व परिसर आर्दीची उपस्थिती होती.

१३) दि. १०/०५/०९ रोजी लातूर येथील प्रसिध्द इतिहास लेखक प्रा. डॉ. श्रीराम गुंदेकर यांची सातारा येथे दि. ३० व ३१ मे २००९ रोजी होणाऱ्या अखिल भारतीय सत्यशोधिकी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड

झाल्याबद्दल त्यांचा व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्राच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहूणे म्हणून जेष्ठ पत्रकार शरद कारखानीस यांची उपस्थिती लाभली. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. श्रीराम गुंदेकर म्हणाले की, सत्यशोधिकी साहित्य हे शेतकरी, कष्टकरी, बलुतेदारांचे साहित्य आहे. यामध्ये अस्सल बोलीभाषेचा जोश आहे. ग्रामीण साहित्यकांनी सत्यशोधक साहित्याची तत्त्वे आत्मसात करून लिखाण केल्यास जागतिक पातळीवरील अतिउच्च दर्जाची साहित्य निर्मिती होऊ शकेल असे मत व्यक्त केले. यावेळी शरद कारखानीस, विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे इत्यादींनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे प्रमुख माधव बावगे यांनी माडंले. तर आभार प्रदर्शन शिवाजी काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्राचार्य पी.जी.भिसे यांनी केले.

१५) दि. १७ जून २००९ रोजी, राष्ट्रमाता जिजाऊ यांचा विभागीय केंद्राच्या वतीने नांदेड शहरात भव्य दिव्य असा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द लेखिका तथा प्राध्यापिका सौ. सिंधू तिडके या होत्या. प्रमुख पाहूणे म्हणून या विभागीय केंद्राचे सदस्य तथा नांदेड शहारातील नामांकित पिपल्स कॉलेजचे प्राचार्य श्री. व्ही.एन.इंगोले हे होते. याप्रसंगी प्राचार्य इंगोले म्हणाले की, राजमाता जिजाऊमध्ये कणखर बाणा होता. प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्वराज्य निर्माण करण्यासाठी त्यांनी योग्य ते नियोजन व त्याप्रमाणे कृती केली. त्यांच्या निर्धार निष्ठेमुळे शिवबा स्वराज्य स्थापन करू शकले. शहाजी आणि जिजाऊ हेच छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे गुरू होते. डॉ. इंगोले पुढे म्हणाले की, मोगलांच्या राज्यात महिलांचे शोषण होत होते. विषमतेमुळे समाज जर्जर झाला होता. सरंजामशाहीतून मराठी माणसावर सातत्याने प्रहार होत होते. जिजाऊंनी राज्य स्थापनेमागे एक भूमिका स्वीकारली होती. सर्व जाती धर्माचे मावळे एकत्र करून आपल्या पुत्रामध्ये आत्मविश्वास रूजविला. त्यांनी शेतकरी कष्टकरी यांच्यासाठी स्वराज्य निर्माण केले. त्या राजनीतिज्ञ होत्या, मुत्सद्दी होत्या. म्हणूनच स्वराज्य निर्माण करू शकल्या. सिंधू तिडके म्हणाल्या, जिजाऊ लोकमाता होत्या, वीरमाता होत्या. कर्तव्य हेच नशीब मानणाऱ्या होत्या. त्यांनी समाजातील अंधश्रध्दा व दहशतवाद गाडून स्वराज्य निर्माण केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. पी. बी. डावळे, प्रा. राम देशमुख, तानाजी हुस्सेकर, व्ही. एम. जाधव, आ.वि. शिंदे, प्राचार्य डॉ. गोपाळराव कदम, डॉ. विकास सुकाळे, प्रा. डी.बी.जांभरूणकर, प्रा. संभाजी तिडके आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रभाकर जाधव यांनी केले. हरिभाऊ जवळगे यांनी आपले यथोचित विचार मांडले, प्रा. डॉ. ए. एन. सिध्देवाड यांनी आभार मानले.

१७) दि. २६/०६/२००९, आखाडा बाळापूर येथे महिला बचत गटाचा मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याला मराठवाड्यातील प्रसिध्द लेखक व वक्ते प्राचार्य सोमनाथ रोडे यांची उपस्थिती लाभली होती. त्याचबरोबर प्रसिध्द स्वातंत्र्यसैनिका कवयित्री शांताबाई शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख पाहुणे प्राचार्य सोमनाथ रोडे म्हणाले की, महिलांचे आता केवळ चूल व मूल असे दिवस संपले असून महिला सर्व स्तरात पुरूषांच्या पुढे कामावर आहेत. त्या विमान चालवतात, रेल्वे चालवतात. आर्मीमध्ये महिला सक्रिय आहेत तेव्हा महिलांचे हे योगदान स्वतःच्या संसारासोबत देशाला उपयोगी ठरणार आहे. या कार्यक्रमाला आखाडा बाळापूर कळमनुरी आजूबाजूच्या बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मुख्य संयोजक प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनी केले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी सर्वांचे आभार मानले.

१८) दि. २६/०६/२००९, शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या युवक मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य सोमनाथ रोडे यांनी राजर्षी शाहू महाराज

यांच्या जीवन चरित्रासोबतच आजच्या युवकासमोरील बिकट आव्हानाचे सविस्तर चर्चा केली. महाराजांनी दलितांसाठी त्या काळात किती मोलाचे कार्य केले याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला हिंगोली शहरातील शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, पत्रकार उपस्थित होते.

२०) दि. ०१/०७/२००९, जागतिक डॉक्टर्स डे या दिवशी तीन हजार मोफत शस्त्रक्रिया संकल्पपूर्तीनिमित्त लातूर येथे डॉ. विठ्ठलराव लहाने यांचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूर व एम. डी. प्रतिष्ठान लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हृदयसत्कार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अमरनाथ सोलपूरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ञ विचारवंत प्राचार्य अनिरूध्द जाधव यांची उपस्थिती लाभली. याप्रसंगी डॉ. गोपाळराव पाटील म्हणाले की, समाजात सज्जनशक्ती आहे परंतु ती आणखी वाढली पाहिजे. शिवाय ती नुसती वाढुन चालणार नाही तिला कृतीची जोड मिळाली पाहिजे. नेमके हेच कार्य डॉ. विठ्ठल लहाने यांनी मोफत शस्त्रक्रिया करताना घडवून आणले.

२२) दि. १९/७/२००९, अहिल्यादेवी होळकर स्मृतीदिन साजरा करण्यात आला. त्या काळातील इतिहासात होऊन गेलेल्या महिला अहिल्यादेवी होळकर या कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई युवा अभियानाच्या स्वयंकार्यकर्त्या सौ. आशाताई भिसे तर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्रा. कमलताई ठकार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी ठकार म्हणाल्या की, राजघराण्यात अहिल्यादेवी होळकर जन्म घेऊनही लोकोपयोगी कार्य कसे करता येईल याबद्दल त्या सतर्क राहिल्या. राष्ट्रमाता जिजाऊ, अहिल्या होळकर तळागाळातील वर्गाला शिक्षण देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचा आदर्श आजच्या महिलांनी घेणे अगत्याचे आहे.

२४) दि. ०९/०८/२००९, ज्ञानेश्वर विद्यालय, लातूर येथे जुनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर विभागीय केंद्राच्या वतीने ९ ऑगस्ट या क्रांतीदिनाचे महत्त्व प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी विशद केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील प्राचार्य श्री. कोमटवार हे होते.

२५) दि. १५/०८/२००९, भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने ध्वजारोहण करून स्वातंत्र्यनिमित्त युवकांशी चर्चासत्र व आजच्या युवकासमोरील प्रश्न या विषयावर चर्चा झाली. या चर्चासत्रात लातूर शहरातील मा. जी.एन.लातूरे, के.ई.हरिदास, प्रसिध्द पत्रकार अतुल देऊळगावकर इत्यादींनी सहभाग नोंदविला.

२७) दि. ३१/०८/२००९, जिल्हा हिंदी साहित्य परिषद, संत कबीर प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने २००८/०९ या वर्षात देशातील चार पुरस्कारांचे मानकरी ठरलेले हिंदी साहित्यिक डॉ. सुर्यनारायण रणसुभे यांचा सत्कार साहित्यिक व खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. वाघमारे म्हणाले की, डॉ. रणसुभे यांनी चार दशकापासून वाचन, लेखन, चिंतन, भाषणात कार्यमग्न राहून समाजाची उंची वाढविली आहे. त्यामुळे लातूरकरांचा सन्मान झाला आहे. या सत्कारास उत्तर देताना रणसुभे म्हणाले की, लातूरकरांचे प्रेम तसेच मित्र डॉ. चंद्रभान सोनवणे, प्रा. भूदेव पाटील, डॉ. नागोराव कुंभर यांच्या प्रेरणेमुळे मी साहित्य लेखनाकडे वळलो, पुरोगामी विचारांचा खंबीर पाठिंबा असल्याने संघर्षाच्या क्षणी डगमगलो नाही. परिश्रमामुळे मला इथपर्यंत पल्ला गाठता आला. सत्कारानंतर रणसुभे यांचा जीवनपट उपस्थितांसमोर मांडला गेला. योगिराज माने व प्रा. विजयकुमार शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. सतीष यादव यांनी आभार मानले.

## Yashwantrao Chavan Pratishthan's Academy of Information Technology (February 09 To August 09)

### PG Diploma in Advanced Computing (DAC)

1) DAC course is a 6 Months full-time course. Students will be admitted to the course on the basis of Common Entrance Test (CET). Free Common Entrance Test Training was provided by YCP's AIT. Technical abilities and HR Interview (stage II and III) are part of their admission procedure of DAC Course.

2) A batch of the Advanced Computing Course February 09 was conducted and 11 students successfully completed training the DAC February 2009 Course was concluded on 08th August 2009. And farewell was organized for the students.

3) The entrance Tests for DAC August 09 were conducted on 27th June 09 and 29th June 09. Total 36 candidates appeared for the tests.

4) Stage II and III of the DAC August 2009 was conducted from 27th July 2009 to 31st July 09, 20 students are admitted for DAC August 2009 Batch. The Batch commenced on 01st September 2009 and will conclude on 12th February 2010.

### Diploma in Information Technology (DIT)

5) Diploma in Information Technology is Three months part-time Course. This course helps candidates to get introduction to Computers as well as it helps to understand Office Automation Tools.

6) Seven Batches of the Diploma in Information Technology (DIT) course were conducted YCP's AIT announced Special Summer Vacation Batches for school students and got better response.

7) YCP's AIT conducted the Certificate Course In Information Technology. The course is for Three months. This course specially conducted for working people. Seven batches for this course were conducted till date.

### Diploma in Multimedia Creations (DMC)

8) Diploma In Multimedia Creation is a Four months part-time course. Six Batches of the Diploma in Multimedia Creations (DMC) course were conducted.

9) As per the students request YCP's AIT conducted Special summer Vacation Batches for school students as well as conducted Weekend batches for the students and working people. The response to this training is good.

10) YCP's AIT conducted a course, Certificate course in Multimedia Creations (CCMC) for four months. This course was specially conducted for working professionals.

### PG Diploma in Advanced Computer Arts (DACA)

11) DACA Course is a 6 months full-time course. Students will be admitted to the course on the basis of Common Entrance Test (CET). Free Common Entrance Test Training was provided by YCP's AIT. Technical abilities and HR Interview (state II and III) are part of the admission procedure for the DACA Course.

12) The Batch commenced on 01st September 2009 and will conclude on 12th February 2010. Five students are admitted in August 09 batch.

**Certificate course in Programming using C(CCPC)**

14) A Special Course, Certificate Course in Programming using 'C' (CCPC). It was launched by YCP's AIT for students who are interested to improve their knowledge of C language. Six batches were conducted for this course.

**Certificate Course in Web Designing**

15) Certificate Course in Web Designing is one-month part-time course. This course helps students to design his or her own web site.

**Certificate Course in Database Technology and Visual Basic (CCDBT)**

16) Certificate Course In Database Technology and Visual Basic (CCDBT) is four-month part time course. It helps the students to be a software programmer. We conducted 3 batches for this course.

17) Conducting special batch for 'Certificate Course in Database Technology and Visual Basic' for Pratham. Start date 26th August to 29th December 2009.

**Modular Courses**

18) As per the students request YCP's AIT conducted Modular Courses for Visual Basic, Share Point, Ms Dot Net, Ms office, Image Editing, C-programming.

**Corporate Training**

19) Two days special Computer Awareness Programme was conducted for E.S.I.C.'s 36 employees on 16th and 17th February 2009.

20) Conducted 'Certificate Course in Computer Operations' (CCCO) Course for D.G.N.P.'s 10 employees 09th To 20th March 09.

21) Computer Awareness Programme was conducted for Chief Engineer, Navy.

22) Special batch for Certificate Course In Ms Access was conducted for officers of Chief Engineer, Navy.

23) Certificate Course in IT Security was conducted for Department of Atomic Energy, Government of India. Twenty-five employees were trained.

24) Conducting special course for under privileged students for Door Step School. The course was started on 1st and would be concluded on 29th September 2009

**Database Administration (DBA)**

25) As per the request for our DAC Alumni, YCP's AIT started a new course i.e. Database Administration (DBA). The course was started on 02nd August and would be concluding on 29th November, 2009.

**Free Workshop conducted by YCP's AIT**

26) YCP's AIT conducted a one-day free workshop for Senior Citizens on 03rd May 2009. Thirty participants were present for the workshop. Appreciation for conducting this workshop was received from senior member.

27) Conducted 3 workshops for Diploma in Multimedia Creations and got better response. The workshops were held on 06th June 09, 30th May 09 and 05th September, 2009.

## विशेष उपक्रम
## वसुंधरा - पर्यावरण संवर्धन शिक्षण मंच

पर्यावरण संवर्धनाची जाणीव आपल्या संस्कृती आणि परंपरांमध्ये रूजलेली आहे. ती आपल्याला बाजारात भाजी आणायला जाताना कापडाची पिशवी घेऊन जाण्यापासून ते देवराईच्या रूपात देवाच्या नावाने शेकडो एकर जंगल राखून ठेवण्यापर्यंत दिसून येते.

पर्यावरण संवर्धनासाठी आपल्या भारतीय राज्यघटनेपासून ते कायदे-धोरण-योजना-आंतरराष्ट्रीय करारांपर्यंत कित्येक तरतूदी आहेत. संविधानाच्या भाग चार कलम ४८ क मध्ये राज्य हे, देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहील असे नमुद केले आहे. तसेच, पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, राष्ट्रीय जैवविविधता अधिनियम अशा कायद्यांची निर्मिती केली आहे. आपल्या औपचारिक शिक्षणव्यवस्थेमध्ये, पर्यावरण विषयावरील अभ्यासक्रम प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत विविध पातळ्यांवर सुरू आहेत. शाळेतील मुलांना पर्यावरण संवर्धनाच्या कामात सहभागी करून घेणारी राष्ट्रीय हरित सेना नावाची योजना आहे. आपल्या देशात, पर्यावरण संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती-संस्था-संघटनांची मांदीयाळी आहे. यामध्ये, चिपको आंदोलनापासून ते गडचिरोलीतील मेंढा-लेखाचे आमच्या गावात आम्हीच सरकार आंदोलन आणि जोहडवाले राजेंद्रसिंहपासून ते हिवरे बाजारचे पोपटराव पवारांपर्यंत अनेकांचा समावेश आहे. दुसऱ्या बाजुला, पर्यावरणीय प्रश्नांची व्याप्ती पाहता आपण एका पर्यावरणीय अरिष्टाकडे जात आहोत असे वाटते. पर्यावरणीय परंपरा-कायदे-अभ्यासक्रम-व्यक्ती किंवा संस्थांचे कार्य अजूनही तोकडे पडताना दिसते. नव्याने पुढे आलेल्या क्लायमेट चेंज किंवा ग्लोबल वॉर्मिंगसारख्या संपूर्ण जगाला ग्रासून टाकणाऱ्या प्रश्नांचा आपापल्या देश-राज्य-जिल्ह्यातील पूर किंवा दुष्काळाशी संबंध लक्षात घेऊन त्यामधून मार्ग काढण्याचे आव्हान पुढे ठाकले आहे.

अशा वेळी, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, सृष्टीज्ञान संस्थेच्या सहकार्याने पर्यावरण संवर्धन शिक्षण क्षेत्रात आपले योगदान देण्याचा निर्णय जाहीर करीत आहे. **वसुंधरा पर्यावरण संवर्धन शिक्षण मंच** नावाने सदर कामाची उभारणी करण्यात येणार आहे. गावपातळीवरील जमीन-जंगल-हवा-पाणी पासून ते जगाला भेडसावणाऱ्या ग्लोबल वॉर्मिंगसारख्या विषयापर्यंत विविध मुद्यांवर जाणीव-जागृतीपासून धोरणात्मक बदलापर्यंत बरच काही होण्याची गरज आहे. हवामान बदलाबाबत डिसेंबरमध्ये डेन्मार्क देशातील कोपनहेगन येथे होणाऱ्या जागतिक क्लायमेट कॉन्फरन्सकडून काही भरीव मार्गदर्शक तत्वे समोर येतील अशी अपेक्षा आहे. त्यानुसार वसुंधरा पर्यावरण संवर्धन शिक्षण मंचाची पुढील वाटचाल निश्चित होणार आहे. आपला सहभाग, सहकार्य व सूचना अपेक्षित आहेत.


> मतभेद केवळ मतभेदांसाठीच असू नयेत. तसे ते असले तर त्यांना वैयक्तिक व पक्षीय हेव्यादाव्याचे स्वरूप येते आणि त्याने कार्यहानी होते. विकास कार्याच्याद्वारे लोककल्याण साधावयाचे या ध्येयासंबंधी अर्थातच मतभेद असण्याचे कारण नाही. मार्गासंबंधी मतभेद असू शकतील हे मी मान्य करतो. पण तसे मतभेद लोकशाहीच्या मार्गानेच सोडविले पाहिजेत.
>
> स्व. यशवंतराव चव्हाण

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने :

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग १<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळ भाग २<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय. बी. चव्हाण खंड १ ते ४<br>संपादन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | ३.५० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६. | म. ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ०८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन - अण्णासाहेब शिंदे | ६०.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टीकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन - दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन - पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास - संशोधक /लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलासंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन - राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाऊंटीफूल बनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक - ना.धो. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई' बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य/फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन | २००.०० |

## व्हिडिओ कॅसेटस

- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु.ल. वृत्तांत : पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडीओ कॅसेटस्ची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शन - श्री. राम गबाले
- येस् आय एम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शन - विनय नेवाळकर


AN OPPORTUNITY ARISES FOR THE ASPIRING
SOFTWARE AND MULTIMEDIA PROFESSIONALS
Post-Graduate Diploma in
Advanced Computing (DAC)
Advanced Computer Arts (DACA)
Diploma in
Information Technology (DIT)
Multimedia Creations (DMC)
Certificate Course in
Information Technology (CCIT)
Programming Using C (CCPC)
Multimedia Creations (CCMC)
Database Technology & Visual Basic (CCBT)
Web Designing
Data Base Administration 10g/11g (DBA)
सी डैक CDAC
ॲक्टस acts
Authorized Training Center
Authorised Training Centre of C-DAC
Yashwantrao Chavan Pratishthan's
Academy of Information Technology
5th Floor, Y. B. Chavan Centre, Gen. J. Bhosale Marg,
Opp Mantralaya, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel. No. 022-22817975 / 22043619. Mobile : (91) 9769256343
Email : ycpait@vsnl.com # Web site : www.ycpait.org/ait

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
# नवमहाराष्ट्र युवा अभियान

**महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरणामध्ये आपला सहभाग हवाच! आपल्या सहकार्यानेच राज्याचे युवा धोरण ठरविण्यात येणार आहे. त्यामुळे आपला सहभाग, सूचना व प्रतिक्रिया अपेक्षित असून त्या महत्वाच्या आहेत...**

## महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रम

Website: www.ybchavanpratishthan.org
Blog: navmaharashtra.co.in
Email: navmaharashtra@gmail.com
Contact: 9892211669,9833023847
9823067879




PRINTOGRAPHY SYSTEMS (INDIA) PVT. LTD., MUMBAI-13. (C-186-07)